विदर्भ संशोधन मंडळ ग्रंथमाला, क्रमांक ११

मेघदूतांतील रामगिरि

अर्थात्

रामटेक

या पुस्तकांत रामटेक येथील देवालयें, तीर्थें व मूर्ति यांचें सविस्तर वर्णन देऊन नंतर रामटेक हाच कविकुलगुरु कालिदासाच्या मेघदूतांत वर्णिलेला रामगिरि होय, हें सप्रमाण सिद्ध केलें आहे. तसेंच रामगिरिविषयक अन्य मतांचेंहि चिकित्सक परीक्षण केलें आहे.

"पूर्वग्रहदूषित नसलेले सुज्ञ वाचक हें पुस्तक वाचल्यावर डॉ. मिराशी यांच्याशी सहमत होतील, असा मला विश्वास आहे."

डॉ. यशवंत खुशाल देशपांडे

लेखक

वा. वि. मिराशी

किंमत तीन रुपये

विदर्भ संशोधन मंडळ ग्रंथमाला, क्रमांक ११

मेघदूतांतील रामगिरि

अर्थात्

रामटेक

★

लेखक

महामहोपाध्याय **डॉ. वासुदेव विष्णु मिराशी**, एम्. ए., डी. लिट्.

माजी प्राचार्य, मॉरिस कॉलेज, नागपूर आणि

विदर्भ महाविद्यालय, अमरावती;

संस्कृत आणि प्राचीन भारतीय इतिहास

व संस्कृति या विभागांचे अध्यक्ष,

नागपूर विश्वविद्यालय.

★

विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर

[प्रथमावृत्ति]   किंमत तीन रुपये   [१९५८]

प्रकाशक :

देवीदास गोविंद लांडगे,

बी. ए., एल्एल्. बी.

चिटणीस, विदर्भ संशोधन मंडळ,

नागपूर.

मुद्रक :

वि. ना. वाडेगांवकर,

उद्यम कमर्शियल प्रेस,

वेस्ट हायकोर्ट रोड धर्मपेठ, नागपूर १.

लोकनायक

डॉ. माधव श्रीहरि ऊर्फ बापूजी अणे,

माजी राज्यपाल, बिहार,

यांस

परमादरपूर्वक अर्पण

अनुक्रमणिका

पुरस्कार

'मेघदूतांतील रामगिरि अर्थात् रामटेक' या महामहोपाध्याय डॉ. वा. वि. मिराशी यांनी लिहिलेल्या ग्रंथास पुरस्कार लिहितांना मला आनंद होत आहे.

डॉ. वा. वि. मिराशी नागपूर येथे गेल्या पंचवीस वर्षांपासून भारताच्या, विशेषत: विदर्भाच्या, प्राचीन इतिहासासंबंधीं संशोधनकार्य करीत आहेत. त्यांनी अनेक शिलालेख, ताम्रपट व नाणीं मिळवून ती सामग्री एपिग्राफिया इंडिका या सरकारी नियतकालिकांत आणि अन्यत्र प्रसिद्ध केली आहे. त्यामुळे त्यांना आन्तरराष्ट्रीय प्रसिद्धि मिळाली आहे. माजी मध्यप्रदेशाच्या शासन साहित्य परिषदेने राष्ट्रपति डॉ. राजेन्द्रप्रसादजी यांच्या हस्तें त्यांस त्यांच्या गौरवपर लेख संस्कृतमध्ये लिहिलेला ताम्रपट देऊन त्यांचा सत्कार केला आहे. भारत सरकारने कलचुरि संवताचे नवे जुने सर्व लेख एकत्रित करून प्रकाशित करण्याचें काम त्यांच्यावर सोंपविलें होतें. अनेक वर्षें परिश्रम करून व त्या लेखांवर विद्वत्तापूर्ण प्रबंध लिहून त्यांनी एक प्रचंड ग्रंथ लिहून दिला तो भारत सरकारने तीन वर्षांपूर्वी प्रसिद्ध केला. त्याचप्रमाणें वाकाटक वंशाचे आजवर उपलब्ध झालेले सर्व कोरीव लेख संकलित करून चिकित्सकपणें लिहिलेला त्यांचा ग्रंथ नागपूर विद्यापीठाने गतवर्षींच प्रकाशित केला. त्यांनी प्राचीन इतिहासासंबंधीं केलेल्या कामगिरीवरून अखिल भारतीय प्राच्यविद्यापरिषदेने पुढील अधिवेशनाकरितां त्यांस अध्यक्ष नियोजित करून त्यांचा गौरव केला आहे. गेल्या महिन्यांतच सागर विश्वविद्यालयाने सन्मान्य डी. लिट्. पदवी देऊन त्यांस गौरविलें आहे.

डॉ. मिराशी यांनी सुमारें पंचवीस वर्षांपूर्वी प्राचीन इतिहासाच्या संशोधनक्षेत्रांत पदार्पण केलें, हें वर सांगितलें आहेच. त्याच्या पूर्वीपासून

मी संशोधनक्षेत्रांत कार्य करणारा अभ्यासु असल्यामुळे त्यांच्याशी माझा निकट संबंध आला आहे. त्यांनी केलेल्या संशोधनात्मक लिखाणाकडे माझें कुतूहलपूर्ण लक्ष जात असे. त्यांच्या संशोधनविषयक लेखांबद्दल अनेकदा त्यांच्याशी चर्चा करण्याचा योग आला. त्यावरून मी असें निःसंदिग्धपणें सांगू शकतो कीं, त्यांनी नेहेमी प्रमाणें याहि ग्रंथांत ज्या विधानांना आधार आहे तीं विधानें निश्चितपणें पुढे मांडलीं आहेत, आणि जेथे पुराव्याची कमतरता आहे तीं मांडणें अवश्य वाटल्यास तीं अनुमानें असल्याबद्दल स्पष्ट खुलासा केला आहे. रामटेक हाच रामगिरि या विधानास पोषक असे आधार त्यांनी दिले आहेत. ते सर्व यापूर्वी माझ्या अवलोकनांत आले होते. रामटेक हाच रामगिरि आणि तेथेच रामचंद्र वनवासांत आले होते, ही परंपरेने चालत आलेली लोकवार्ता येथे दिलेल्या आधारांवरून दृढ होते. रामटेक येथील देवळांत राम व लक्ष्मण यांच्या पुरातन मूर्ति विद्यमान आहेत, त्या वनवासी वेषांतील आहेत. इतरत्र सामान्यतः किरीटधारी असतात, तशा येथे नाहीत. यावरूनहि डॉ. मिराशींनी काढलेल्या निष्कर्षास पुष्टि मिळते.

जेथे श्रीरामचंद्र वनवसांत आले व जेथून कालिदासाने मेघदूतास आरंभ केला तें स्थान रामटेक नसून दुसरेंच आहे अशीं जीं मतें हल्ली नव्यानेच कांही विद्वानांनी प्रसृत करण्याचा प्रयत्न केला आहे तीं चुकीचीं आहेत हें डॉ. मिराशींनी याच पुस्तकांत साधार दाखविलें आहे. त्यांसंबंधी मी या पुरस्कारांत चर्चा करीत नाही. सुज्ञ वाचकांनी या ग्रंथांत तीं मुळांतून वाचावीं म्हणजे डॉ. मिराशींनी काढलेल्या निर्णयासंबंधीं त्यांस आपलें मत बनवितां येईल. मला असा विश्वास आहे कीं, पूर्वग्रहदूषित नसलेले सुज्ञ वाचक हें पुस्तक वाचल्यावर डॉ. मिराशी यांच्याशी सहमत होतील. मला प्रामुख्याने उल्लेख करावासा वाटतो कीं, मुंबई शासनाने रामटेक येथे कालिदासाचें स्मारक करण्याचा निर्णय घेतला आहे आणि हें कार्य कोणत्या प्रकारचें असावें याबद्दल तज्ज्ञांची समितिहि नियुक्त केली आहे.

यापूर्वींच असा ग्रंथ प्रसिद्ध होणें अवश्य होतें. पण डॉ. मिराशी म्हणतात त्याप्रमाणें ते अन्यकार्यव्यापृत असल्यामुळें हें काम दिरंगाईवर पडलें होतें. हल्ली पुण्याचे श्री. वा. कृ. परांजपे यांनी 'मेघदूतावर नवीन प्रकाश' या नांवाचा, मध्यप्रदेशांतील रामगड हाच रामगिरि असें प्रतिपादणारा, ग्रंथ लिहिला आहे. त्यामुळे डॉ. मिराशी यांनी हा ग्रंथ लिहावयास घेतला. हा ग्रंथ तातडीने प्रकाशित करण्याचें दुसरें कारण असें कीं, नागपूर येथे कांग्रेस अधिवेशनानिमित्त प्रचंड मेळावा येत्या जानेवारीमध्ये भरावयाचा आहे. त्यावेळीं अखिल भारतांतून अनेक विचारी जन जमतील. त्यांचे हातीं हा ग्रंथ पडावा, हाहि हेतु याच वेळीं हा ग्रंथ प्रकाशित करण्यांत आहे. या ग्रंथांत जीं साधकबाधक प्रमाणें दिलीं आहेत त्यांचा विचार करून सुज्ञ व विचारी वाचकांनी आपला निर्णय घ्यावा अशी त्यांस विनंती करून हा पुरस्कार पूर्ण करतों. इति शम्.

नागपूर
ता. १५–१२–१९५८.

यशवंत खुशाल देशपांडे
अध्यक्ष, शारदाश्रम, यवतमाळ.

लेखकाचें हृद्गत

सुमारें दहा वर्षांपूर्वी भारत सरकारचे मंत्री डॉ. कैलासनाथ काटजू हे नागपूर विश्वविद्यालयाच्या पदवीदानप्रसंगीं दीक्षान्त भाषण करण्याकरितां आले होते. त्यावेळीं त्यांना कालिदासाच्या मेघदूतांतील रामगिरि (सध्यांचें रामटेक) येथील पुरातन स्थळें दाखविण्याकरितां निमंत्रणावरून मी गेलों होतों. तेव्हा त्यांनी रामटेकवर्णनपर पुस्तक उपलब्ध आहे काय, अशी पृच्छा केली. तसें पुस्तक कोणीं लिहिलें नाही, असें समजतांच त्यांनी मला त्या प्रकारचें पुस्तक लिहून प्रकाशित करण्याची सूचना केली. पण इतर अनेक कार्यांमुळें तें काम मला हातीं घेतां आलें नाही. गेल्या जुलै महिन्यामध्ये पुण्याचे श्री. वा. कृ. परांजपे यांनी 'मेघदूतावर नवीन प्रकाश' नामक पुस्तक प्रसिद्ध करून मेघदूतांतील रामगिरि हा रामटेक नसून तो मध्यप्रदेशांतील पूर्वीच्या सरगुजा संस्थानांतील रामगड होय, असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. त्या पुस्तकांतील विचारसरणी भ्रामक असून सत्यान्वेषणार्थ तिचें खंडन करणें जरूर असल्यामुळे मी महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या गेल्या अंकांत तद्विषयक लेख लिहून त्यांचीं प्रमाणें कशीं आभासात्मक आहेत तें सविस्तर दाखविलें. तथापि रामटेक हाच मेघदूतांतील रामगिरि हें सिद्ध करणारा सर्व पुरावा एकत्र मांडणें जरूर होतें. तशांत, मुंबई शासन रामटेकास कालिदासाचें स्मारक करण्याचा विचार करीत असल्याने या प्रश्नाचें महत्त्व जास्तच वाढलें. म्हणून विदर्भ संशोधन मंडळाच्या सूचनेवरून रामटेकचें सविस्तर वर्णन करणारें आणि रामटेकच मेघदूतांत वर्णिलेला रामगिरि होय, हें सिद्ध करणारा सर्व पुरावा एकत्र देणारें पुस्तक लिहिण्याचें काम मी हातीं घेतलें. तें आज पुरें होत आहे यावद्दल मला आनंद वाटत आहे.

सुमारें चाळीस वर्षांपूर्वी नागपुरास संस्कृताध्यापक म्हणून माझी नियुक्ति झाल्यावर लौकरच मला रामटेकास जाण्याचा योग आला. त्यावेळीं

एक पुण्यक्षेत्र म्हणूनच रामटेकची ख्याति होती. त्याला ऐतिहासिक महत्त्व नव्हतें. लक्ष्मणाच्या देवळांत एक खंडित शिलालेख आहे खरा, पण हिंदूशिवाय इतरांस त्या देवळांत प्रवेश मिळत नसल्याने तो युरोपीय संशोधकांस वाचतां आला नव्हता. त्याचा एक अस्पष्ट छाप सुप्रसिद्ध पुरातत्त्वज्ञ डॉ. कील्हॉर्न याजकडे पाठविण्यांत आला होता. त्यांतील कांही नांवांवरून त्याला तो रायपूरच्या हैहयवंशी राजाचा असावा, असें वाटलें व त्यावरून त्याने कलचुरि संवताच्या आरंभाविषयी कांही चुकीचीं अनुमानें केलीं होतीं. कै. रा. ब. हीरालाल यांनी हा लेख पाहिला होता; पण त्यांनी त्याचा पूर्ण अभ्यास न केल्यामुळें कील्हॉर्नचें मतच ग्राह्य धरलें होतें. सुमारें पंचवीस वर्षांपूर्वी या शिलालेखाचा पेन्सिलने घेतलेला छाप मॉरिस कॉलेजांतील इतिहासाचे प्राध्यापक डॉ. हंटर यांनी वाचण्याकरितां मला दिला. तेव्हा त्याकडे माझें लक्ष गेलें. त्यानंतर अनेकदा माझे मित्र प्रा. ल. रा. कुळकर्णी यांचेसह रामटेकास जाऊन मी त्या लेखाचें वाचन व अभ्यास केला, तेव्हा तो लेख कोणा हैहयवंशी राजाचा नसून ख्रिस्तोत्तर तेराव्या शतकांत होऊन गेलेल्या रामदेवराव यादवाच्या काळचा आहे, असें दिसून आलें आणि रामटेकच्या ऐतिहासिकत्वावर नवीन प्रकाश पडला. त्यानंतर वाकाटकांचे अनेक ताम्रपट सांपडल्यामुळे त्यांची राजधानी रामटेकजवळ नन्दिवर्धन येथे होती, हें सिद्ध झालें. ऋद्धपूरच्या ताम्रपटांतील 'रामगिरि-स्वामिनः पादमूलात्' या उल्लेखाने तर रामगिरीच्या भौगोलिक स्थानावर फारच महत्त्वाचा प्रकाश पडला. वाकाटकांच्या इतिहासाचा जस जसा जास्त अभ्यास होऊं लागला तस तसें त्यांतील कालिदासाचें स्थान जास्त जास्त स्पष्ट होऊं लागलें. तशांत महानुभावीय ग्रंथांतले रामटेकविषयक उल्लेख ज्ञात होऊन रामटेकचें प्राचीनत्व व त्याचें रामगिरीशीं ऐक्य सिद्ध करण्यास महत्त्वाचें साहाय्य झालें. हा सर्व पुरावा या पुस्तकांत एकत्र दिला आहे. तो ध्यानांत घेतल्यास रामटेक हाच मेघदूतांतील रामगिरि, याविषयी कोणासहि संशय राहू नये.

प्रस्तुत पुस्तकाचीं तीन प्रकरणें आहेत. पहिल्या प्रकरणांत रामटेक येथील देवालयें, तीर्थें, व मूर्ति यांचें सविस्तर वर्णन दिलें आहे. नागपूरला

सभासंमेलनांच्या निमित्ताने प्रतिवर्षी अनेक लोक येतात आणि त्यांपैकी बहुतेक रामटेक पाहण्यास जातात. त्यांना या प्रकरणांतील माहिती उपयुक्त वाटेल. दुसऱ्या प्रकरणांत रामटेक हाच कालिदासाच्या मेघदूतांत वर्णिलेला रामगिरि हें सिद्ध करणारा पुरावा सविस्तर दिला आहे. तिसऱ्या प्रकरणांत रामगिरीच्या भौगोलिक स्थानाविषयी अन्य मतें देऊन त्यांचें चिकित्सक परीक्षण केलें आहे. हीं दोन्ही प्रकरणें जिज्ञासु वाचकांस महत्त्वाचीं वाटतील, अशी आशा आहे. शेवटीं चार परिशिष्टें देऊन त्यांत रामगिरि ते विदिशा या मार्गाविषयी मराठी अनुवादासहित मेघदूतांतील श्लोक, रामगिरिविषयक शिलालेख व ताम्रपट आणि महानुभावीय ग्रंथांतील रामटेकसंबंधी उतारे दिले आहेत. जिज्ञासु वाचकांस या विषयाचा स्वतंत्रपणें अभ्यास करण्यास त्यांचें साहाय्य होईल, अशी अपेक्षा आहे. शेवटी रामगिरि ते दशपुर या मेघमार्गाचा नकाशा जोडला आहे.


विदर्भाचे सुविख्यात पुढारी लोकनायक डॉ. माधव श्रीहरि ऊर्फ बापूजी अणे यांच्याशी माझा परिचय होण्याचा योग पुष्कळ वर्षांपूर्वी आला होता. तेव्हापासून त्यांनी माझ्या संशोधन कार्याविषयीं कुतूहल दाखवून मला वारंवार उत्तेजन दिलें आहे. विद्वत्ता, धार्मिकपणा, सच्चारित्र्य, भारतीय संस्कृतीविषयीं नितान्त आदर, सार्वजनिक कार्याविषयी सक्रिय कळकळ इत्यादि त्यांच्या गुणांविषयी मला सदैव वाटत असलेला परमादर हें पुस्तक त्यांना विनम्र भावाने अर्पण करून मी व्यक्त करीत आहे.

विदर्भातील ख्यातनाम संशोधक डॉ. य. खु. देशपांडे यांनी माझ्या विनंतीवरून आपल्या पुरस्काराने या पुस्तकास भूषविलें, याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानतों. त्यांनी व डॉ. वि. भि. कोलते यांनी महानुभाव वाङ्मयांतील उताऱ्यांचा अर्थ लावण्यांत मदत केली, याबद्दल मी दोघांचाहि आभारी आहे. भारत सरकारचे भूतपूर्व अर्थमंत्री डॉ. चिं. द्वा. देशमुख यांनी मेघदूताच्या आपल्या अनुवादांतून पहिल्या चौवीस श्लोकांचें मराठी भाषांतर घेण्यास परवानगी दिली, याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

नागपूर संग्रहालयाने रामटेक येथील देवळांचा फोटो पुरविला याबद्दल त्या संग्रहालयाचे क्यूरेटर डॉ. शं. श्री. पटवर्धन व असिस्टंट क्यूरेटर श्री. वि. प्र. रोडे यांचा मी फार आभारी आहे. विदर्भ संशोधन मंडळाने प्रस्तुत पुस्तकाचें प्रकाशन करण्याचें साहस केलें आहे, याबद्दल त्याचेहि आभार मानले पाहिजेत.

१६ डिसेंबर १९५८.

वा. वि. मिराशी



रामटेक येथील देवळें

मेघदूतांतील रामगिरि

अर्थात्

रामटेक

प्रकरण पहिलें

रामटेक

रामटेक हें नागपूर जिल्ह्याच्या रामटेक तहसिलीचें मुख्य गांव असून नागपूरच्या उत्तरेस २७ मैलांवर वसलें आहे. गांवाला लागूनच असलेल्या टेकडीवर श्रीरामचंद्राचें पुरातन देवालय असल्याने या गांवाला रामटेक असें नांव पडलें आहे. टेकडीचें पुरातन नांव रामगिरि होतें हें पुढे दाखविलें आहे. गांवांत व टेकडीवर अनेक तीर्थें व देवालयें असल्याने याची पुण्यक्षेत्र म्हणून फार प्रसिद्धि आहे. चैत्र व कार्त्तिक महिन्यांत येथे मोठी यात्रा भरते. तेव्हा दूरदूरच्या प्रदेशांतून हजारों लोक भगवान् रामचंद्राच्या दर्शनास येतात. कार्त्तिकांतील त्रिपुरी पौर्णिमेस भगवान् शंकराने त्रिपुरासुराचा वध करून त्याचीं तीन पुरें जाळलीं. त्याच्या स्मृत्यर्थ दरवर्षी त्या पौर्णिमेस रामचंद्राच्या देवळाच्या शिखरावर पीतांबर जाळण्यांत येतो. तें दृश्य पाहण्यास लोकांची अलोट गर्दी जमते.

रामटेकची विड्याच्या पानांबद्दल अनेक वर्षें ख्याति आहे. हीं पानें अत्यंत नरम व स्वादिष्ट असल्यामुळे तीं पुणें, मुंबईसारख्या दूरदूरच्या

शहरीं विक्रीकरितां नेलीं जातात. मध्यंतरीं एक प्रकारच्या कीडीमुळे तेथील बरेचसे पानमळे उद्ध्वस्त झाले होते. ते आता सावरूं लागले आहेत. रामटेकला सन १८६७ त नगरपालिका स्थापन झाली. गांवामध्ये सात मराठी व उर्दू प्राथमिक शाळा, चार माध्यमिक शाळा आणि दोन हायस्कुलें आहेत. एक संस्कृत शाळाहि कालिदासाच्या नांवाने अलीकडे स्थापन झाली आहे. गांवांत टपाल व तार कचेऱ्या, पोलिसचौकी वगैरे आधुनिक सुखसोईचीं व संरक्षणाचीं साधनें आहेत. कांही वर्षांपूर्वी कलिपा व सूर या नद्यांना बांध घालून खिडसी नामक तलाव बनविला आहे. त्याचें पाणी कालव्याच्या योगें शेतीकरितां उपयोगांत आणण्यांत येतें. या कालव्याने सोळा हजार एकर जमिनीला शेतीकरिता पाण्याचा पुरवठा होतो. बांधावर प्रवाशांकरितां सुरेख डाकबंगला आहे. तेथून सभोवारचें रमणीय निसर्गदृश्य दृष्टीस पडून मनाला फार आनंद होतो.

रामटेक गांवाला लागूनच पूर्वेच्या बाजूस अंबागड नामक पर्वतराजींतील पश्चिमेकडची टेकडी 'रामगिरि' या नांवाने निदान दीड हजार वर्षे सुप्रसिद्ध आहे. तिचा ऐतिहासिक वृत्तांत अन्यत्र दिला आहे. टेकडीवरील रामलक्ष्मणांच्या देवळांच्या उत्तुंग शिखरांना आज अनेक वर्षें सफेतीचीं पुटें बसल्यानें तीं प्रकाशांत चकाकत असतात आणि दूरवरून रामगिरीचें निश्चित स्थल दाखवितात. टेकडीवर जाण्याला अनेक वाटा आहेत. उत्तरेच्या बाजूने बराचसा रुंद रस्ता आहे. त्याने तटाच्या उत्तर दरवाजापर्यंत जातां येतें. पश्चिमेच्या बाजूने दोन वाटा आहेत. त्यांपैकी एक फरसबंदी पायऱ्यांची असून ती अगदी देवळांजवळ जाते. ही जवळची पण चढण्यास कठीण अशी वाट आहे. दुसरी मध्यम चढाची पश्चिमेच्याच बाजूने धूम्रेश्वराच्या देवालयाजवळ जाऊन नंतर पूर्वेकडून येणाऱ्या फरसबंदी वाटेस मिळते. तिसरी पूर्वेच्या बाजूने अंबाळा तळ्याजवळून गडावर जाते. ही वाट सर्वांत लांब पण चढण्यास सोपी असल्याने यात्रेकरू बहुधा याच वाटेने गडावर चढतात. ही फरसबंदी केली आहे. वाटेने वृक्षराजीचें व तांबूस रंगाच्या दगडांचें दृश्य मनोहर दिसतें. भगवान् रामचंद्राच्या इतर निवासस्थानांप्रमाणें याहि ठिकाणीं

वानरसेना दृष्टीस पडते आणि तिचा खाद्य पदार्थ घेऊन गडावर चढणाऱ्या निष्काळजी यात्रेकरूंना व मुलाबाळांना क्वचित् उपसर्गहि होतो.

गडाची तटबंदी

पूर्वीच्या काळीं रामटेकला लष्करी दृष्टयाहि बरेंच महत्त्व होतें असें दिसतें. कारण तिची तटबंदी केली होती आणि गडावर भोसल्यांच्या काळीं दारुगोळाहि ठेवण्यांत येत असे. दक्षिण व पश्चिम बाजूंनी कडा तुटलेला असल्याने नैसर्गिक तटबंदी झाली आहे. पण उत्तेरच्या व पूर्वेच्या बाजूने चढाव कमी असल्यामुळे एकांत एक असे दोन तट पूर्वीपासून उभारलेले दिसतात. त्यांपैकी बाहेरचा तट लांबच लांब असून त्या बाजूंनी टेकडीला वळसा घालून अंबाळा तळयास जाऊन पोंचतो. हा तट अत्यंत प्राचीन पण ओबड धोबड रीतीने बनविलेला असून सध्या भग्न स्थितींत आहे. प्राचीन काळीं विदर्भांत गवळयांचें राज्य होतें अशी दन्तकथा आहे. तदनुसार हा तट गवळयांच्या राजवटींत बांधला होता, असें म्हणतात, पण गवळयांच्या राज्याला ऐतिहासिक आधार नाही. प्राचीन काळीं रामटेकजवळ सुमारें तीन मैलांवर वाकाटकांची राजधानी नन्दिवर्धन (सध्यांचे नन्दरधन अथवा नगरधन) येथे होती. हें नन्दिवर्धन अगदी सपाट प्रदेशांत वसलें असल्याने त्याच्या संरक्षणाकरिता एखाद्या किल्ल्याची जरूरी भासली असणें साहजिक आहे. रामटेक जवळील गडाची दोन बाजूंची नैसर्गिक तटबंदी आणि त्याचें राजधानीशी सानिध्य लक्षांत घेतां वाकाटकांनी रामटेकच्या टेकडीला तट बांधून तें ठिकाण लष्करी दृष्टया सुरक्षित केलें असलें तर आश्चर्य नाही. या तटाच्या आंत एक गांव वसलें होतें त्याचे अवशेष अद्यापि आढळतात. या बाहेरील तटाच्या आंत पहिले रघूजी भोसले यांनी अठराव्या शतकांत बांधलेला दुसरा उंच तट आहे तो सध्याहि चांगल्या स्थितींत आहे.

धूम्रेश्वराचें देवालय

अंबाळा तलावाच्या बाजूने गडावर चढूं लागलें असतां डाव्या बाजूस धूम्रेश्वराचें लहानशा चबुतऱ्यावर बांधलेलें छोटें देऊळ लागतें. यासंबंधी अशी आख्यायिका आहे की येथे शम्बूक नामक शूद्र मुनि तपश्चर्या करीत होता.

तत्कालीन धर्मसमजुतीप्रमाणें त्याला तपश्चर्या करण्याचा अधिकार नव्हता. याच काळांत अयोध्येस एक ब्राह्मणपुत्र अकालीं मृत्यु पावला. भगवान् रामचंद्राच्या आदर्श राज्यांत कोणासहि अकालीं मृत्यु येणें असंभवनीय असल्याने तो मृत्यु कोणाच्या तरी अधार्मिक आचरणामुळें आला असावा असें वाटून रामचंद्र त्याच्या शोधार्थ निघाले. त्यांना या गडावर शंबूक तपश्चर्या करीत असलेला दिसला. तेव्हा त्यांनी मृत ब्राह्मणपुत्रास जिवंत करण्याकरितां आपल्या चंद्रहास खड्गाने शंबूकाचा शिरच्छेद केला. त्यावर त्याला दिव्य स्वरूप प्राप्त झालें. तेव्हा त्याने रामचंद्राजवळ तीन वर मागितले. ते हे की, (१) माझ्या देहाचें या ठिकाणीं शिवलिंग व्हावें; (२) श्री रामचंद्रांनी या गिरीवर सदोदित वास्तव्य करावें व (३) यात्रेकरूंनी श्री रामचंद्राचें दर्शन घेण्यापूर्वी माझें दर्शन घ्यावें. त्याप्रमाणें अद्यापि यात्रेकरू या गडाच्या दक्षिण टोकावर असलेल्या धूम्रेश्वर नामक शिवलिंगाचें प्रथम दर्शन घेऊन नंतर श्रीरामाच्या दर्शनास जातात. ही आख्यायिका निदान सातशें वर्षांइतकी जुनी आहे. गडावरच्या लक्ष्मणाच्या देवळांत रामदेवराव यादव (सन १२७१–१३१०) याच्या काळचा भग्न शिलालेख अद्यापि विद्यमान आहे. तो इतरत्र दिला आहे. त्याच्या ४५ व्या ओळींत या देवळाचा उल्लेख आहे. त्या काळीं त्यांतील लिंगाचें नांव धूम्राक्ष असें होतें. पुढील श्लोक पाहा–

श्रीरामचंद्रस्य करेण चंद्रहासाद्धतः प्राप्य पदं मुरारेः ।
स शम्बुकः शूद्रमूनिर्महीध्रराजेऽत्र धूम्राक्ष इति प्रसिद्धः ।।

(भगवान् रामचंद्राच्या हाताने चंद्रहास खड्गाच्या प्रहाराने ज्याला विष्णुपद प्राप्त झालें तो शम्बूक नामक शूद्र मुनि या पर्वतश्रेष्ठावर धूम्राक्ष नांवाने प्रसिद्ध आहे.)

शम्बूक या गिरीवर तपश्चर्या करीत होता म्हणून त्यास तपोगिरि असें नांव पडलें होतें. हें नांव लक्ष्मणाच्या देवळांतील शिलालेखांत (ओळ २२) 'तपंगिरि' या किंचित् अशुद्ध रूपाने आलें आहे—

⏑–⏑––⏑ ⏑ वायुपुत्रयुक्तो वसत्युत्तमयोगिचिन्त्यः ।
महीधरस्यास्य तपंगिरेस्तं प्रभावमग्र्यं किमुदाहरामि ।।

(ज्या पर्वतावर श्रेष्ठ योगींनी ज्यांचें चिंतन करावें असे भगवान् रामचंद्र वायुपुत्र हनुमानासहित राहत आहेत त्या या तपोगिरीचा श्रेष्ठ महिमा मी काय वर्णन करावा ?)

रामायणांतील शैवलगिरि

रामायणाच्या उत्तर कांडांत शंबूक ज्या पर्वताच्या उत्तरेस एका तलावाच्या कांठीं तपश्चर्या करीत होता त्याचें नांव शैवल असें दिलें आहे.[१] या शैवल पर्वताचा इतर कोठे निर्देश सापडत नाही. तथापि रामायणांतच या पर्वताच्या भौगोलिक स्थितीचें जें वर्णन आलें आहे त्यावरून कांही अनुमान करतां येतें. त्यांत म्हटलें आहे की विंध्य व शैवल पर्वतांमधील देशांवर दण्ड या नांवाचा राजा राज्य करीत होता.[२] त्याने एका ब्राह्मण कन्येवर बलात्कार केल्यामुळे शैवल पर्वताच्या आसपासचा शंभर योजनें प्रदेश उद्ध्वस्त झाला व त्यालाच पुढे दण्डकारण्य म्हणूं लागले.[३] या दण्ड किंवा दाण्डक्य राजाला इतर ठिकाणीं भोज म्हटलें आहे.[४] भोज हे प्राचीन विदर्भावर राज्य करीत होते हें प्रसिद्ध आहे. तेव्हा शंबूक हा विंध्याच्या

१ पाहा–'दक्षिणां दिशमाक्रामत्ततो राजर्षिनन्दनः । शैवलस्योत्तरे पार्श्वे ददर्श सुमहत्सरः ।। तस्मिन् सरसि तप्यन्तं तापसं सुमहत्तपः । ददर्श राघवः श्रीमांल्लम्बमानमधोमुखम्'' रामायण, उत्तरकांड, अ. ७५, श्लो. १३–१४. शैवलपर्वताविषयी टीकाकार राम म्हणतो–शैवलस्य शैवलाख्यस्य विन्ध्यसमीपदक्षिणभागवर्तिगिरेः ।

२ रामायण, उत्तरकांड, अ. ७९, श्लो. १६.

३ पूर्वोक्त, अ. ८१, श्लो. ८.

४ पाहा–दाण्डक्यो नाम भोजः कामाद् ब्राह्मणकन्यामभिमन्यमानस्स-बन्धुराष्ट्रो विननाश । कौटिलीय अर्थशास्त्र, अ. १, प्र. ३.

दक्षिणेस विदर्भांतच तपश्चर्या करीत असावा. शम्बूकाला ठार मारल्यानंतर विमानांत बसून श्रीरामचंद्र देवांसह गोदातीरीं अगस्त्याश्रमास गेले असें रामायणांत वर्णन आहे.[१] तेव्हा विंध्यपर्वताच्या दक्षिणेस व गोदावरीच्या उत्तरेस विदर्भांत कोठेतरी शम्बूकाच्या तपश्चर्येचें स्थान होतें, यांत संशय नाही. रामायणांतील या स्थानाचें वर्णन रामटेकास जुळेल असें आहे. कारण रामटेकास टेकडीच्या पायथ्याशी अंबाळें नांवाचा तलाव अद्यापि विद्यमान आहे. या भागांत रामटेकाइतकें शंबूककथेशी संबद्ध असें प्राचीन स्थान दिसत नाही. म्हणून उत्तरकांडाच्या कर्त्यासहि रामटेक हेंच शम्बूकाच्या तपश्चर्येचें स्थान म्हणून विवक्षित होतें, असें मानण्यास हरकत नाही. विशेष उल्लेखनीय गोष्ट ही की ४५ अध्यायांच्या रामटेकविषयक बृहत्सिंदूरगिरिमाहात्म्यांत या गडाच्या तपोगिरि व सिंदूराद्रि या दोन नांवाशिवाय महाशैवल या नांवाचाहि उल्लेख आहे.[२]

नरसिंहाचीं देवालयें

याशिवाय अंबाळा तलावाकडून रामलक्ष्मणांच्या देवळांकडे जातांना डाव्या बाजूस नरसिंहाचीं दोन देवळें लागतात. त्यांतील नरसिंहाची मूर्ति भव्य असून तिच्या हातांत चक्र आहे. लक्ष्मणाच्या देवळांतील शिलालेखांत याचा उल्लेख पुढील श्लोकांत आला आहे--

अतीव तेजःप्रसरप्रतप्तं जगत्समग्रं कृपया ररक्ष ।
योऽयं चतुर्थोऽवतरोऽच्युतस्य श्रीमान्नृसिंहोऽपि वसत्यमुष्मिन् ।।

[भगवान् विष्णूचा चौथा अवतार नृसिंह हाहि या गिरीवर राहतो. त्याने आपल्या अत्यंत प्रखर तेजाने प्रतप्त झालेल्या जगाचें (जळून जाण्यापासून) कृपेने रक्षण केलें.]

१ रामायण, उत्तरकांड, अ. ७६, श्लो. १६–२०.
२ सरदेसाई स्मारक ग्रंथ, पृ. १२३.

नृसिंहावतारांत भगवान् विष्णूने हिरण्यकशिपूचें वक्षःस्थल आपल्या नखांनी याच पर्वतावर फाडलें. त्याच्या रक्ताने हा सर्व पर्वत भरून जाऊन तांबडा लाल झाला असें पूर्वोक्त शिलालेखांत म्हटलें आहे--

प्रागत्र देवो नृहरिः सुरारेर्बिभेद वक्षः करजैः शितानैः ।
तद्रक्तपूरारुणितस्ततोऽयं – –⏑– –⏑ ⏑–⏑– – ।।

तेव्हापासून या पर्वताला सिंदूरगिरि किंवा सिंदूराचल असें नांव मिळालें. त्याचा उल्लेख त्या शिलालेखाच्या ५९ व ६१ या ओळींत आला आहे. रामटेकचीं 'सिंदूरगिरिमाहात्म्य' या नांवाचीं दोन संस्कृत माहात्म्यें (लघु व बृहत्स्वरूपांत) उपलब्ध आहेत त्यांतहि ही कथा दिली आहे. वास्तविक या गिरिवरचे दगड तांबूस रंगाचे शेंदरासारखे असल्यामुळे त्याला हें नांव आरंभीं मिळालें असावें. नंतर वरील आख्यायिका प्रचलित झालेली दिसते. हिरण्यकशिपूला मारल्यावर नरसिंहाने ज्या ठिकाणीं आपली गदा फेकली तेथे मोठा खड्डा पडून जलाशय झाला व त्याला सिंदूरवापी असें नांव मिळालें. ही वापी नृसिंहमंदिराच्या ईशान्येस आहे. सध्याहि पिण्याच्या पाण्याकरितां हिचा उपयोग केला जातो. हिचाहि उल्लेख पूर्वोक्त शिलालेखांत आला आहे--

श्रीरामचंद्रस्य समीपतो हि सिंदूरवापी सुकृतप्रपा सा ।
यस्या विशुद्धेन विलोकनेन विजित्य नाकं समुपैति मुक्तिम् ।।

(भगवान् रामचंद्राच्या जवळच सिंदूरवापी नामक पुण्याईची पाणपोई आहे. तिच्या विशुद्ध दर्शनाने मनुष्य स्वर्ग जिंकून मुक्ति पावतो.) या सिंदूरवापीचा उल्लेख महानुभावांच्या स्थानपोथींत 'भोगरामाच्या देवळाच्या ईशान्येस आणि रामाच्या देवळाच्या पूर्वेस' असा आला आहे. (परिशिष्ट ४ पाहा).

त्रिविक्रमाची मूर्ति

सिंदूरवापीच्या बाजूने उजवीकडे कांही अंतर गेल्यावर उत्तरेकडच्या टेकडीवर त्रिविक्रमाचें देवालय लागतें तें विशेष उल्लेखनीय आहे. कारण तें गडावरच्या सर्व देवालयांत प्राचीन, गुप्त–वाकाटक काळांतलें, आहे.

या ठिकाणीं पूर्वी एक बरेच मोठें देवालय होतें असें दिसतें, पण त्यापैकी आता एक लहानसा मंडप तेवढा जीर्णावस्थेंत उभा आहे. तो बाजूंनी उघडा आहे. त्याला सहा खांब असून त्यांपैकी चारांवर पद्मबंधाचें कोरीव काम आहे. मंडपाचें छत इतर ठिकाणच्या गुप्तकालीन मंदिराप्रमाणे सपाट आहे. ह्या मंडपांत पूर्वी कोणत्या मूर्तीची स्थापना केली होती हें समजण्यास आता साधन नाही. पण तें विष्णूच्याच एखाद्या अवताराचें असावें यांत संशय नाही. कारण समोरच चतुर्भुज त्रिविक्रमाची सुंदर मूर्ति भग्नावस्थेंत विद्यमान आहे. त्याच्या शिरावर किरीट मुकुट असून सभोवतीं तेजोवलय आहे. कानांत कुंडलें आणि गळ्यांत पदकासहित मुक्ताहार आहे. वैजयंतीमाला दोन्ही पायांवर लोंबती दाखविली आहे. कमरेला उदरबंध असून अधोवस्त्र रशनेने बांधलें आहे आणि त्याचे सोगे खाली सुटले आहेत. त्रिविक्रमाचे सर्व हात आता भग्न झाले आहेत पण त्यांचे रत्नजडित अंगद (बाहुभूषणें) अद्यापि दिसत आहेत. त्रिविक्रमाचा डावा पाय भूमीवर रोवला आहे. उजवा पाय आकाश व्यापण्याकरिता वर उचलला होता, पण तो आता भग्न झाला आहे. त्रिविक्रमाची उभी राहण्याची ढब त्याचा निश्चय व्यक्त करीत आहे. त्याच्या मुद्रेवरहि तो दिसत असावा, पण ती मुद्रा आता अस्पष्ट झाली आहे. त्रिविक्रमाच्या पायांजवळ बलिराजा त्रिभंग अवस्थेमध्ये उभा आहे. जवळच त्याच्या राणीची मूर्ति होती. पण ती आता अस्पष्ट झाली आहे. या त्रिविक्रमाचें शिल्प शाबूत असतें तर गुप्तकालीन शिल्पांमध्ये तें अत्युत्कृष्ट गणलें गेलें असतें, यांत संशय नाही.

मेघदूतांतील पुढील श्लोक रचतांना कालिदासाच्या दृष्टीसमोर यासारखें त्रिविक्रमाचें शिल्प असावें–

> **प्रालेयाद्रेरुपतटमतिक्रम्य तांस्तान्विशेषान्**
> **हंसद्वारं भृगुपतियशोवर्त्म यत्क्रौञ्चरन्ध्रम् ।**
> **तेनोदीचीं दिशमनुपतेस्तिर्यगायामशोभी**
> **श्यामः पादो बलिनियमनाभ्युद्यतस्येव विष्णोः ॥ मेघ. ५९.**

(हिमालयाच्या तटाजवळ तीं तीं प्रेक्षणीय दृश्यें पाहत पुढे गेल्यावर तुला परशुरामाच्या कीर्तीचें द्वार असें क्रौञ्चरन्ध्र लागेल. त्या मार्गाने हंस

उत्तरेकडे जातात. त्या रन्ध्रांतून तिरकस लांबट आकार धारण करून तूं उत्तरेकडे जावें. तसें करतांना तूं बलीला शासन करण्याकरितां भगवान् विष्णूने उचलेल्या श्यामवर्ण पायासारखा दिसशील.)

वराहाचें देवालय

अंबाळ्याकडून गडावर चढतांना प्रथम एक मशीद लागते. ती अवरंगजेबाच्या काळीं त्याच्या कोणी दरबाऱ्याच्या स्मरणार्थ बांधली होती, असें म्हणतात. तेथून पुढें गेलें की आंतल्या तटबंदीचा एक विशाल दरवाजा लागतो. हा तट व दरवाजा पहिले रघूजी राजे यांनी बांधला होता, असें म्हणतात. याच्या आंत गेलें असतां उजव्या बाजूस वराहाची भव्य मूर्ति लागते म्हणून याला वराहदरवाजा असें नांव आहे. वराह हा विष्णूचा अवतार होता. या अवताराच्या दोन प्रकारच्या मूर्ति भारतांत आढळतात. पहिल्या प्रकारच्या मूर्तीत वराह चतुष्पाद दाखविला असतो. सागर जिल्ह्यांतील एरण नामक गांवीं गुप्तकालीन वराहाची अशा प्रकारची मूर्ति आहे. तिच्या अंगावर अनेक देवांच्या व ऋषींच्या मूर्ति कोरल्या आहेत. दुसऱ्या प्रकारच्या मूर्तीत वराह पृथ्वीला समुद्रांतून उचलून आपल्या हातावर धारण करणारा असा दाखविला असतो. या तऱ्हेची सर्वोत्कृष्ट गुप्तकालीन मूर्ति विदिशेजवळच्या उदयगिरीच्या (प्राचीन नीचैर्गिरीच्या) लेण्यांत कोरली आहे. रामटेक येथील गडावरील मूर्ति पहिल्या प्रकारची आहे. ही मूर्ति चतुष्पाद असली तरी प्रमाणबद्ध असल्यामुळें सुंदर दिसते. हिच्या अंगावर देव, ऋषि वगैरेंच्या आकृति नाहीत. त्यावरून ही फार प्राचीन असावी. लक्ष्मणाच्या देवळांतील शिलालेखांत तिचा उल्लेख खालील श्लोकांत आला आहे–

> सप्ताम्भोनिधिपूरदूरपिहितां बिभ्रद्धरां दंष्ट्रया
> योऽयं भाति सरोजिनीदलनिभो दन्तेन यद्वर्तयन् ।
> यं रोमान्तरगुप्तवाससुखिनो देवर्षयस्तुष्टुवुः
> कल्पान्ते दशकंधरारिसदने सोऽत्रादिकोलः प्रभुः ॥

(सप्त सागरांना पूर आल्यामुळें खोल बुडालेल्या पृथ्वीला आपल्या दंताने वर काढून धारण करणारा कमलपत्रासारखा कृष्णवर्ण हा आदि-वराह–ज्याच्या रोमरन्ध्रांत प्रलयकालीं देव व ऋषि सुखाने वास करते झाले तो–येथे भगवान् रामचंद्राच्या सदनांत (गडावर) राहत आहे.)

हें वर्णन देवरूपी वराहाचें आहे. या तऱ्हेची मूर्ति यादवकाळीं गडावर होती काय हें माहित नाही.[१]

सध्याच्या प्राणिरूपी वराहाविषयी एक कुतूहलोत्पादक समजूत प्रचलित आहे. या मूर्तीच्या पोटाखालून आरपार ज्यांस जाता येत नाही ते पापी होत असें मानलें जातें. त्यामुळे दर्शनास येणारे बहुतेक यात्रेकरू आपल्या पापपुण्याचा अंदाज घेण्याकरितां वराहाच्या पोटाखालून जाण्याचा प्रयत्न करतात. बहुतेक या कसोटीस उतरतात; पण एखादा लठ्ठ मनुष्य वराहाच्या पोटाखालून जाऊं शकला नाही म्हणजे त्याची थट्टा होते.

भोगरामाचें देवालय

याच्यापुढे गेलें असतां डावीकडे भोगरामाचें पूर्वाभिमुख मंदिर लागतें. या भोगरामाचें वर्णन उपरिनिर्दिष्ट शिलालेखांत येणेप्रमाणें केलें आहे–

श्रीभोगराममभिरामतनुं निरीक्ष्य
क्षीणाखिलाघसरणिः शरणे मुरारेः ।
भोगानभंगुररसान्सुचिरं विचित्रान्
प्राप्नोति कल्पशतमलिप्तदेवराजः ।।

(श्रीभोगरामाचें सुंदर रूप पाहिल्यावर मनुष्याचीं सर्व पातकें नष्ट होऊन तो साक्षात् इंद्राच्यापेक्षांहि अधिक अशा विविध प्रकारच्या चिरकाल टिकणाऱ्या भोगांचा अनुभव शेकडो कल्पांपर्यंत विष्णुलोकांत घेत असतो.)

---

१ एरण येथील मूर्ति येथल्यासारखीच असतांहि तिचें वर्णन तेथील कोरीव लेखांत देवरूपानेच केलें आहे. फ्लीट, गुप्त इन्स्क्रिप्शन्स, पाहा.

तेराव्या शतकांत महानुभाव पंथाचे संस्थापक श्रीचक्रधर यात्रा करीत करीत रामटेकास आले होते, तेव्हा त्यांचा निवास कांही काळ भोगरामाच्या देवळाजवळ होता असें लीळाचरित्रांतील एकांकावरून समजतें. स्थानपोथींतहि भोगरामाच्या देवळाचें वर्णन आहे. तो उतारा अन्यत्र दिला आहे.[१]

अंबाळचाकडून चढतांना डावीकडे एक भिंत लागते. तिच्या दरवाजांतून आंत गेले असतां पूर्वाभिमुख अशीं दोन देवळें व त्यांच्यामध्ये मोकळी जागा दिसते. त्यांपैकी डावीकडचें देऊळ भोगरामाचें होय. सध्या भोगरामाच्या देवळांत रामाची मूर्ति नसून चतुर्भुज विष्णूची आहे. तिच्या उजवीकडच्या हातांत शंख व रुद्राक्षमाला आणि डावीकडच्या हातांत चक्र व गदा आहेत. उजवीकडच्या देवळांत देवीची मुकुटधारी चतुर्भुज मूर्ति आहे. तिचा खालचा उजवा हात आता भग्न झाला आहे. वरच्या उजव्या हातांत कमल आणि डावीकडील हातांत पाश व पात्र आहेत. या दोन देवळांमधील मोकळ्या जागेंत श्रीचक्रधरांचें दहा महिने वास्तव्य होतें असें स्थानपोथीवरून दिसतें. येथे महानुभावी लोकांची मोठी यात्रा भरते.

रामझरोका

यानंतर आंतील तटाचा सिंहपुर दरवाजा लागतो; तो ओलांडल्यावर दुसऱ्या चौकांत प्रवेश होतो. हा भाग अत्यंत जुना आहे. याच भागांत भोसल्यांचा तोफखाना व दारुगोळा ठेवला जात असे. याच्या पलीकडे भैरव दरवाजा नांवाचा सुंदर दरवाजा लागतो. त्यामध्ये भैरवाची म्हणून एक मूर्ति दाखवितात.[२] तो ओलांडल्यावर तिसऱ्या चौकांत प्रवेश होतो. या

---

१ परिशिष्ट चौथें पाहा.

२ शिलालेखांत महाभैरवाचें वर्णन ४८–४९ ओळींत आलें आहे. याचें मंदिर उत्तरेस होतें असें सिंदूरगिरिमाहात्म्यांत (१६,६५) म्हटलें आहे. भैरवाचें मंदिर भोगरामाच्या मंदिराजवळ होतें असें स्थानपोथीवरून समजतें.

चौकांच्या तटबंदीला सभोवार माऱ्याच्या जागा केल्या आहेत. तटबंदीचा हा भाग अद्यापि चांगल्या स्थितींत आहे. या भागांत देवळांच्या सेवकांची घरें आहेत. डाव्या बाजूस नगारखाना व जवळच राधाकृष्णांचें मंदिर आहे. या मंदिराचा उल्लेख उपरिनिर्दिष्ट शिलालेखांत गोपालाचें मंदिर असा केला आहे. पुढील श्लोक पाहा–

गोपीजनानन्दसमुद्रपूर्णचन्द्रो विनिद्रोज्ज्वलपद्मनेत्रः ।
गोपालमूर्तिर्जगदेकमूर्तिर्व्वसत्यसावत्र धराधरेन्द्रे ॥

(ज्याप्रमाणें पूर्णचन्द्राच्या उदयाने समुद्राला भरती येते त्याप्रमाणें ज्याच्या दर्शनाने गोपींच्या आनंदाला भरती येत असे, प्रफुल्ल व उज्ज्वल अशा कमलाप्रमाणें ज्याचे नेत्र आहेत असा सर्व जगतांत असामान्य असा गोपालमूर्ति विष्णु या पर्वतश्रेष्ठावर येथे वास करीत आहे.)

याच्या पुढे गोकुळ दरवाजा लागतो. त्याच्या पलीकडे हिंदूंशिवाय इतरांस जाता येत नाही. कनिंग्ह्याम्‌चा सहाय्यक बेग्लरसाहेब सन १८७३ मध्ये रामटेकास आला होता. त्याला आंत प्रवेश न मिळाल्यामुळे लक्ष्मणाच्या देवळांतील शिलालेखाविषयी त्याला कांहीच माहिती देतां आली नाही. आंतील देवळांविषयींहि त्याने कांही मजेचीं विधानें केलीं आहेत. उदाहरणार्थ, रामझरोक्याविषयीं त्याचें विधान पाहा. रामाच्या देवळाच्या मागे एक सज्जा (बाल्कनी) आहे त्याला रामझरोका म्हणतात. तेथून भोवतालचा सुंदर देखावा दिसतो. पण बेग्लरला रामझरोक्याचा अर्थ न समजल्यामुळें 'रामझरोका हो कोण देव, बुवा !' असें म्हणून त्यानें आपलें आश्चर्य व्यक्त केलें आहे. गोकुळ दरवाज्यांत पहारेकरी असतात. ते यात्रेकरूंस आपलीं पदत्राणें व सामान बाहेर ठेवावयास लावून नंतर त्यांस पुढे जाऊं देतात. या दरवाजांतून आंत गेल्यावर एक तोरण लागतें. त्याच्या पश्चिमेच्या अर्ध्या भागांत गणपतीची मूर्ति बसविली आहे, पण पूर्वेच्या अर्ध्या भागावर कबीरपंथी आपला हक्क सांगतात.

रामलक्ष्मणांचीं देवालयें

सामान्यतः रामाच्या देवळांत राम, लक्ष्मण व सीता यांच्या मूर्ति एकत्र असतात. पण गडावर लक्ष्मणाचें देऊळ स्वतंत्र असून तें राम व सीता यांच्या देवळाच्या समोर आहे, हा विशेष आहे. राम, लक्ष्मण व सीता यांनी वनवासांत असतां या गिरीवर कांही काळ वास केला, याचें तें द्योतक असावें. वनवासांत राम, लक्ष्मण व सीता कसा प्रवास करीत असत याविषयीं रामायणांतील वर्णन पाहा–

राम लक्ष्मणास म्हणतो–

अग्रतो गच्छ सौमित्रे सीता त्वामनुगच्छतु ।
पृष्ठतोऽनुगमिष्यामि सीतां त्वां चानुपालयन् ।।

(अयोध्या., ५२, ९५–९६)

वनवासांत असतां लक्ष्मण नेहेमी पुढे चालत असे आणि मागाहून सीता व राम जात असत. त्याला अनुसरूनच गडावरील देवळांची रचना केलेली दिसते. तसेंच रामलक्ष्मणांचा वेश वनवासांतील आहे. त्यांच्या मस्तकांवर मुकुट नसून जटा आहेत.

लक्ष्मणाच्या व सीतारामांच्या देवळांचे बाहेरील दरवाजे पितळेने व आंतील गर्भगृहाचे दरवाजे चांदीने मढविले आहेत. दोन्ही देवळांत सभा-मंडप, अंतराल व गर्भगृह असून दोन्हीवर उत्तर भारतीय पद्धतीचीं उंच शिखरें आहेत. [१] सभागृह आठ मजबूत खांबांवर उभारलें आहे.

---

१ बेग्लर या देवळांविषयी म्हणतो–'I cannot describe the great main temple, but from a bird's eye view of a part of it which I obtained from one of the towers, I believe it to be a complete temple in the style of the superb Khajuraha ones.' Cunningham's Arch. Surv. of India Reports, Vol. VII, p. 112.

अतिप्राचीन काळीं, वाकाटक राजवटींत, गडावर रामचंद्राच्या पादुकांची पूजा केली जात असे. वाकाटकराज्ञी प्रभावतीगुप्तेचा अमरावती जिल्ह्यांतील ऋद्धपूर गांवीं सापडलेला ताम्रपट 'रामगिरिस्वामिनः पादमूलात्' म्हणजे रामगिरि (रामटेक) वरील भगवान् रामचंद्राच्या पादुकांजवळ दिला होता. (परिशिष्ट तिसरें पाहा.) तिच्या दुसऱ्या ताम्रपटांत तसेंच तिचा पुत्र द्वितीय प्रवरसेन याच्याहि कांही ताम्रपटांत 'भगवत्पादमूलां'चा उल्लेख आहे तोहि रामटेकवरच्याच पादुकांस उद्देशून असावा. कालिदासाच्या मेघदूतांतील निर्वासित यक्ष रामगिरीच्या (रामटेकाच्या) आश्रमांत राहत होता. त्या काव्यांत रामगिरीचें वर्णन 'वन्द्यैः पुंसां रघुपतिपदै रङ्कितं मेखलासु' (भगवान् रामचंद्राच्या पूज्य पादुकांनी अंकित झालेला) असें केलें आहे (मेघ.१२). त्यावरूनहि त्याकाळीं गडावर पादुकांचीच पूजा केली जात असे हें उघड आहे. नंतरच्या काळांत तेथे राम, सीता व लक्ष्मण यांच्या मूर्ति स्थापण्यांत आल्या, असें दिसतें. त्या मूर्तींचा उल्लेख पूर्वोक्त शिलालेखांत आला आहे. अवरंगजेबाच्या काळांत इतर ठिकाणांप्रमाणें येथील मूर्तिहि भग्न होण्याचा संभव उत्पन्न झाल्यामुळें त्या सूरनदींत (कांहींच्या सांगण्याप्रमाणें रामटेक येथील दुधाळें तळ्यांत) लपविल्या होत्या. विदर्भांतील मेहकरसारख्या कांही इतर ठिकाणींहि मूर्तींच्या रक्षणार्थ ह्यासारख्या उपायांचा अवलंब केला होता. त्यांपैकीं कांही मूर्ति आता सापडल्या आहेत.

नागपूर राज्याचे संस्थापक पहिले रघूजी राजे यांनी रामटेकास इ. स. १७३६ च्या सुमारास भेट दिली तेव्हा देवळांत मूर्ति नव्हत्या, असें दिसतें. त्यावेळीं ते देवगडावर स्वारी करण्याच्या उद्योगांत होते. त्यांनी नवस केला कीं आपणांस जय मिळाल्यास आपण गडावर भगवान् रामचंद्राची स्थापना करूं. पुढे त्या स्वारींत यश प्राप्त झाल्यावर त्यांनी जयपुराहून संगमरवरी मूर्ति आणवल्या. पण त्यांस दृष्टांत झाला कीं त्या मूर्ति न स्थापतां सूरनदींतील प्राचीन मूर्तींची स्थापना करावी. त्याप्रमाणें रघूजीने फसली सन ११६३ (इ. स. १७५३) मध्ये त्या मूर्तींची स्थापना केली. त्यावेळीं रामटेक कसबा व परगणा देवस्थान, तीर्थोपाध्ये वगैरेंस दिला असें

नागपूरकर भोसल्यांच्या शकावलीवरून समजतें.[१] या मूर्ति काळचा पाषाणाच्या मध्ययुगीन कालांतील असून सुंदर आहेत. रघूजीने जयपूरहून आणलेल्या संगमरवरी मूर्ति रामटेकासच सुरक्षित ठेवल्या आहेत, असें समजतें.

लक्ष्मणाच्या देवळांतील शिलालेख

लक्ष्मणाच्या देवळाच्या सभामंडपांत गर्भगृहाच्या पुढील भिंतींत दरवाजाच्या उजव्या बाजूस एक यादवकालीन शिलालेख बसविला आहे. तो आता भग्न स्थितींत असला तरी रामटेकाच्या इतिहासाच्या दृष्टीनें अत्यंत

---

१ शकावलींतील माहिती आम्हांस डॉ. य. खु. देशपांडे यांचे कृपेने मिळाली. यासंबंधी नागपूरकर भोसल्यांच्या बखरींतील खालील उल्लेख पाहा--

तेथून कूच करून रामक्षेत्रास फौजेसुद्धा आले. तेथें आंब कुंडावर स्नान करून नवस केला जे 'आमची कार्यसिद्धि झाल्यास गडावर रामचंद्रजीची स्थापना करून जागा ब्राह्मणास अग्रहार धर्मादाय देऊं.' असा निश्चय करून निघाले.

(नागपूरकर भोसल्यांची बखर, द्वितीयावृत्ति, पृ. ४८–४९.)

यानंतर रघूजीने देवगडावर स्वारी करून गोंड राजा वलीशहा याचा पराजय केला. त्यानंतर गोंड राणी रतनकुंवर हिने रघूजीला दहा लक्ष रुपये स्वारीखर्च आणि नागपूर, भंडारा वगैरे प्रांत दिला. या विजयानंतर कांही वर्षांनी रघूजीने रामादिकांच्या मूर्ति गडावरील देवळांत स्थापन केल्या असें दिसतें. भोसल्यांचें मूळ दैवत महादेवाचें. पण रघूजीपासून रामचंद्राची उपासना या घराण्यांत सुरूं झाली. भोसल्यांच्या कारकीर्दींत रामटेकचें महत्त्व पुष्कळ वाढलें. (कै. या. मा. काळे–नागपूर प्रांताचा इतिहास पृ. ७३ व १०५). भोसल्यांनी रामटेकवरील देवालयांची दुरुस्ती, देवांची पूजाअर्चा वगैरेकरितां करून ठेवलेली व्यवस्था अद्यापि चालू आहे.

महत्त्वाचा आहे. हा लेख सविस्तर चर्चेसह अन्यत्र[१] दिला आहे. आरंभीं हा लेख फार मोठा होता, पण आता त्याच्या फक्त ७५ ओळी दिसतात. या लेखाचे दोन भाग होतात. पहिल्यांत तेराव्या शतकांतील यादवनृपति रामचंद्र याची वंशावळ, त्यांच्या पूर्वजांचे विजय, त्याच्या राघव नामक अधिकाऱ्याची वंशावळ, नंतर रामटेकच्या चार बाजूंच्या घंटेश्वर, सुधेश्वर, केदार व आंजनेय या देवळांचा उल्लेख वगैरे माहिती आली आहे. हा भाग अतिशय खंडित झाला असल्यामुळे कीलहॉर्न व हीरालाल यांना तो खिस्तोत्तर चौदाव्या पंधराव्या शतकांत छत्तीसगडांत रायपुर येथे राज्य करणाऱ्या हैहयवंशी रामचंद्र नामक राजाचा असावा असें वाटलें. पण हें मत चूक असून हा लेख तेराव्या शतकाच्या अखेरीस झालेल्या रामदेवराव यादवाच्या काळचा आहे हें सुमारें वीस वर्षांपूर्वी आम्ही प्रथम सिद्ध केलें.[२] हें मत आता सर्वमान्य झालें आहे.

प्रस्तुत शिलालेखाच्या दुसऱ्या भागांत गडावरील व त्याच्या सभोवतालच्या देवळांचें व तीर्थांचें वर्णन आलें आहे.[३] त्यापैकी कांही श्लोक मागे उद्धृत केले आहेत. या शिलालेखाचा उद्देश पूर्वोक्त राघव नामक अधिकाऱ्याची रामटेक येथील कांही कामगिरी, कदाचित् लक्ष्मणाच्या देवळाचा जीर्णोद्धार, नमूद करण्याचा दिसतो. ७० व ७१ या ओळींत माइदेव नामक अधिकाऱ्याचा उल्लेख आहे. तो पूर्वोक्त राघवाने रामटेकला नेमलेला अधिकारी असावा.

धर्मेश्वराचें देवालय

राम व लक्ष्मण यांच्या देवळांना प्रदक्षिणा घालतांना डाव्या बाजूस अनेक लहान लहान देवकुली आढळतात. त्यांत धर्मेश्वर, मुक्तीश्वर, दशरथ, कुशलव इत्यादिकांच्या मूर्ति होत्या, त्यांचा उल्लेख वरील शिलालेखांत

१ परिशिष्ट तिसरें पाहा.

२ सरदेसाई स्मारक ग्रंथ, पृ. ११५ इ.

३ परिशिष्ट तिसरें पाहा.

आला आहे. त्यांतहि धर्मेश्वर याच्या खालील वर्णनांत या गडाचें रामगिरि हें प्राचीन नांव आलें असल्याने तो श्लोक अत्यंत महत्त्वाचा आहे.

आस्ते धर्मेश्वरो नित्यं स रामस्य गिराविह।
पीडितं कलिना धर्मं यः कृपालुरपालयत्॥

(येथे रामगिरीवर तो धर्मेश्वर नित्य वास करतो, ज्याने कलीने पीडिलेल्या धर्माला संरक्षण दिलें)

धर्मेश्वराचें लहान देवालय लक्ष्मणाच्या देवालयाच्या दक्षिणेस आहे. प्रस्तुत शिलालेखांत उल्लेखिलेल्या कांही देवांच्या मूर्ति गेल्या सातशें वर्षांत बदललेल्या दिसतात. उदाहरणार्थ, दशरथ व कुशलव यांच्या देवळांत सध्या अनुक्रमें हरिहरांच्या व लक्ष्मी–नारायणाच्या मूर्ति बसविल्या आहेत. कांही नवीन देवांचीहि स्थापना यादव कालानंतर झालेली दिसते. उदाहरणार्थ, प्रदक्षिणेच्या मार्गावर लागणाऱ्या सत्यनारायण (वास्तविक लक्ष्मीनारायण) महिषासुरमर्दिनी, कौसल्या, व्यंकटेश इत्यादिकांच्या देवळांचा उल्लेख लक्ष्मणाच्या देवळांतील शिलालेखांत–निदान त्याच्या अवशिष्ट भागांत-दिसत नाही. रामाच्या देवळाच्या पश्चिमेस लक्ष्मीनारायणाचें देवालय आहे. त्याच्यावर रामझरोका नांवाचा सज्जा आहे. तेथून रामटेक गांवाचें आणि त्यांतील तलावांचें व तीर्थांचें मनोरम दृश्य दिसतें. डाव्या बाजूस ३–४ मैलांवर वाकाटकांची प्राचीन राजधानी नन्दिवर्धन सध्याच्या नन्दरधन ऊर्फ नगरधन नामक गांवाच्या रूपाने झाडींतून डोकें वर काढत असलेली दिसते. ईशान्येस कलिपा व सुर नद्यांचीं पात्रें दृष्टीस पडतात. पूर्वेस अंबाळा तळें व त्याच्या पलीकडे त्या नद्यांच्या संगमाजवळ बांध घालून बसविलेला विशाल खिंडसी तलाव व त्याच्या कांठचा डाक बंगला दृष्टिपथांत येतो. पश्चिमेस मँगेनीजच्या खाणी व नंतर रेल्वे स्टेशन दिसतें. राम झरोक्यांतून दिसणारा रामटेकच्या सभोवतालच्या प्रदेशाचा देखावा अत्यंत नयनमनोहर व चिरकाल स्मृतींत राहणारा असा आहे.

सीतेची न्हाणी

लक्ष्मण मंदिराच्या डाव्या बाजूस कांही पायऱ्या उतरल्यावर सीतेची न्हाणी म्हणून एक कुंड दाखवितात. तिचा उल्लेख महानुभावांच्या स्थानपोथींत आला आहे (परिशिष्ट ४ पाहा). त्यावरून तें कुंड निदान सातशें वर्षांइतकें जुनें आहे यांत संशय नाही. कालिदासाने रामगिरीवरील आश्रमांचें वर्णन 'जनकतनयास्नानपुण्योदकेषु' (ज्यांमधील जल सीतादेवीच्या स्नानामुळें पवित्र झालें आहे) अशा शब्दांत केलें आहे. त्याला जुळणारी अशी ही सीतेची न्हाणी आहे.

रामटेकच्या पंचक्रोशींत अनेक तीर्थें आहेत. त्यांचें वर्णन सिंदूरगिरिमाहात्म्यांत आलें आहे. त्यांपैकी कांही पूर्वोक्त शिलालेखांतहि आढळतात. रामटेकच्या चार बाजूंस घंटेश्वर, सुधेश्वर, केदारेश्वर व आंजनेय (हनुमान्) यांचीं मंदिरें होतीं. यांचा निर्देश त्या लेखांत आला आहे.

गुप्तरामाचें देवालय

याशिवाय 'गुप्तराम' म्हणून एक प्रसिद्ध देवालय रामटेक येथे होतें. त्याचें वर्णन त्या शिलालेखांत येणेप्रमाणें केलें आहे–

दृष्ट्वा प्रकृष्टमहिमानमनन्तभक्त्या
तं गुप्तराममतिगुप्तपदं च किंचित् ।
प्राप्नोति यत्तदिह किं ननु देवराजो
– – ⏑ – ⏑ ⏑ ⏑ – ⏑ ⏑ – ⏑ – – ॥

(ज्याचीं पाउलें अत्यंत गुप्त आहेत त्या अतिप्रभावी गुप्तरामाचें अतिशय भक्तीने दर्शन घेतल्यावर मानवाला जें पद प्राप्त होतें त्यासारखें खरोखर इंद्रालाहि लाभत नाही.)

महानुभावांच्या स्थानपोथींतहि या गुप्तरामाच्या देवळाचा उल्लेख आहे. 'गुपीतरामू भोगरामा ईसान्ये' असा त्याच्या स्थानाचा निर्देश केला आहे. सिंदूरगिरिमाहात्म्यांत याचें देऊळ पुष्कर तीर्थाजवळ आहे असें

म्हटलें आहे. सध्या या नांवाचें देऊळ गडावर नाही. रामटेकगांवांतून धूम्रेश्वराच्या मंदिराला गेलेल्या वाटेवर कपटरामाचें देऊळ लागतें तेंच गुप्तरामाचें देऊळ असावें असें म्हणतात. याशिवाय शंखतीर्थ, अग्नितीर्थ, अंबतीर्थ, वरुणतीर्थ, शुक्लतीर्थ, नृसिंहतीर्थ, कुरुक्षेत्र, लक्ष्मीतीर्थ, हंसतीर्थ, चक्रतीर्थ, धनुस्तीर्थ, पितृतीर्थ, वाजिमेध (अश्वमेधतीर्थ), कर्पूरवापी इत्यादि अनेक तीर्थें त्या शिलालेखांत वर्णिलीं आहेत त्यांवरून रामटेकचा आसमंतात् भाग प्राचीन काळापासून कसा पवित्र गणला गेला होता याची कल्पना येईल.

कर्पूरवापी आणि जवळचीं देवालयें

गडाच्या उत्तरेस पायथ्याशी कांही हेमाडपंती देवळें होतीं. सध्या त्यांपैकी एक देऊळ बऱ्या स्थितींत असून जवळच दुसऱ्या दोन देवळांचे अवशेष दिसतात.[१] या देवळांत पूर्वाभिमुख पांच देवकुली आहेत. त्यांपैकी तीन मुख्य आणि दोन गौण दिसतात. सर्वांवर लहान लहान शिखरें असून, सर्वांच्या समोर खांबांवर उभारलेला व्हरांडा आहे. हा व्हरांडा समोरच असलेल्या चौकोनी कुंडाच्या सभोवार गेला आहे. या जलाशयाची लांबी व रुंदी सुमारें ४५ फूट आहे. देवळांच्या समोर जलाशयाच्या पूर्व बाजूस लहानसें गोपुर असावें. पण तें आता भग्न झालें आहे. या कुंडाला सध्या कपूरबावली असें म्हणतात.

हीं देवळें कोणत्या देवतेचीं होतीं हें समजण्यास आता मार्ग नाही. तथापि त्यांत सप्तमातृकांचा आता भग्न झालेला शिल्पपट्ट आहे त्यावरून तीं शैव संप्रदायाचीं असावीं असें वाटतें. हीं देवळें चुन्याचा उपयोग केल्याशिवाय चौकोनी फोडीव दगड लावून बांधलीं आहेत. या स्थापत्यपद्धतीस हेमाडपंती असें नांव आहे. पण ती यादवांचा 'करणाधिप' (सचिवालयाचा मुख्य) हेमाद्रि ऊर्फ हेमाडपंत याने प्रथम उपयोगांत आणली होती, असें दिसत नाही. त्याच्याहि काळच्या पूर्वीचीं विदर्भांतील कांही देवालयें याच

---

१ यांचें वर्णन कनिंग्ह्यामच्या आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया रिपोर्ट, व्हॉ. ७, पृ. ११३–११४ वर पाहा.

पद्धतीचीं आहेत. बेग्लरच्या मतें हीं देवालयें मुसलमानी अमलांतील अकबराच्या काळांतील असावीं. कारण त्यांवर मुळीच शिल्प दिसत नाही. पण हें मत बरोबर नाही. कारण वर उल्लेखिलेल्या जलाशयाचा उल्लेख कर्पूरवापी (सध्याची कपूर बावली) या नांवाने लक्ष्मणाच्या देवळांतील शिलालेखांत आढळतो. पुढील श्लोक पाहा–

कर्पूरवापी सुकृतप्रवाहपूरेण पूर्णा किमु वर्णनीया ।
देवस्य सीतादयितस्य पार्श्वे दास्यं हि यस्याः कुरुतेऽपि मुक्तिः ।।

(सीतेचा प्रिय पति भगवान् रामचंद्र याच्या जवळच असलेल्या आणि पुण्यप्रवाहाने भरलेल्या कर्पूरवापीचें कसें वर्णन करावें ? कारण, मुक्ति सुद्धा तिचें दास्य करते.) कर्पूरवापीचा उल्लेख महानुभावांच्या स्थानपोथींत पुढीलप्रमाणें आला आहे–'सेंदुरवावी उत्तरें कापुरवावि.'

नागार्जुनाची गुहा

रामटेक हिंदुधर्मासारखे बौद्ध व जैन धर्माचेंहि पवित्र क्षेत्र झालें आहे. गडाच्या पूर्वेस सुमारे एक मैलावरच्या दुसऱ्या टेकडींत नागार्जुनाची गुहा आहे. हा सुप्रसिद्ध बौद्ध तत्त्वज्ञ विदर्भांत ब्राह्मणकुलांत जन्मला होता.[१] याला सातव्या वर्षीं अपमृत्यु येईल असें ज्योतिष्यांनी भविष्य वर्तविल्यामुळें तो अत्यंत दुःखद प्रसंग आपल्या डोळ्यांसमोर येऊं नये म्हणून त्याच्या मातापित्यांनी त्याला कांही सेवकांसह रामगिरीजवळच्या अरण्यांत पाठविलें. त्यांनी पूर्वोक्त गुहेंत वास केला आणि ते त्या बालकाच्या अंतकालाची प्रतीक्षा करूं लागले. पण जवळच्या आश्रमांतील एका बौद्ध भिक्षूच्या कृपेने तो प्रसंग टळला. नंतर त्या भिक्षूने त्या सेवकांस नागार्जुनास नालंदा येथे घेऊन जाण्याचा सल्ला दिला. पुढे नागार्जुनाने विविध विद्यांत व शास्त्रांत प्रावीण्य मिळविलें. त्याला वैद्यकशास्त्र, ज्योतिषशास्त्र,

१ जर्नल ऑफ दि एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगाल, व्हॉ. ५१, पृ. ११५ इ.

किमया व नेत्रचिकित्सा वगैरेंची उत्तम माहिती होती. त्याची कीर्ति चीन-पर्यंत पसरली होती. नागार्जुनाने श्रीपर्वत किंवा श्रीशैल येथेहि कांही काल वास केला होता. तें ठिकाण पुढे नागार्जुनीकोंड या नांवाने सुप्रसिद्ध झालें व तेथे खिस्तोत्तर तिसऱ्या शतकांत इक्ष्वाकुवंशी राजांच्या मातांनी व राण्यांनी अनेक चैत्य व विहार उभारले. हें ठिकाण आता नागार्जुनसागरांत मग्न होणार असल्यामुळे पुरातत्त्वखातें तेथे त्वरेने उत्खनन करून तेथील अवशेष उंच ठिकाणीं टेकडीच्या टोकावर नेण्याच्या प्रयत्नांत आहे. नागार्जुन हा माध्यमिक तत्त्वज्ञान किंवा शून्यवाद याचा संस्थापक म्हणून जगद्विख्यात झाला आहे.

नागार्जुनगुहेंत आतां एक नागाचें शिल्प व एक मनुष्याचें दगडाचें मस्तक एवढ्याच वस्तु राहिल्या आहेत. त्या विश्वविख्यात बौद्ध तत्त्व-ज्ञान्याचें त्याच्या कीर्तीला साजेसें स्मारक रामटेकास नागार्जुन टेकडीवर होणें जरूर आहे.

जैनमंदिर

रामटेक गांवाच्या उत्तरेस एक विस्तृत जैन मंदिर आहे. त्यांतील जैन तीर्थंकर पार्श्वनाथाची मूर्ति भव्य, १८ फूट उंचीची, आहे. तिच्या बैठकीवर त्या तीर्थंकराचे लांछन हरिण कोरलें आहे. ही मूर्ति या ठिकाणीं खोदताना सापडली असें म्हणतात. मंदिराचीं आवारें विस्तृत व स्वच्छ असून आंत प्रवेश केल्यावर मन सुप्रसन्न होतें.

अंबाळें

गडाच्या पूर्वेस पायथ्याशीं अंबाळें नामक विस्तृत तलाव आहे. याचा घाट पहिल्या रघूजीने बांधला होता. त्याच्या सभोवार अनेक लहान लहान देवळें आहेत. या तळ्यासंबंधी अशी आख्यायिका सांगतात कीं फार प्राचीन काळीं अंब नांवाचा राजा सूर्यवंशांत होऊन गेला. त्याला महारोग झाला होता. एके दिवशीं मृगया करीत असतां तो या ठिकाणीं आला. त्यावेळी त्याला अतिशय तहान लागल्यामुळे त्याने येथील झऱ्याच्या पाण्याने आपलें

हात पाय धुतले आणि नंतर पाणी आकंठ प्राशन केलें. आश्चर्याची गोष्ट अशी कीं त्या पाण्याचा जेथे जेथे स्पर्श झाला त्या त्या अवयवावरचें कुष्ट नाहीसें झालें. तें पाहून त्या राजाने त्या झऱ्याच्या जागीं खोदलें तों त्याला पातालांतून भोगवती नदी किंवा पातालगंगा वर येऊन वाहू लागलेली दिसली. तेव्हापासून हें तळें गंगेसारखें फार पवित्र गणलें जातें. मृतांची और्ध्वदैहिक कृत्यें याच्या तीरावर करून याच्या पाण्यांत अस्थिविसर्जन करतात. याच्या भिन्न भिन्न भागांना शंखतीर्थ, अग्नितीर्थ, अंबतीर्थ, वरुणतीर्थ, शुक्लतीर्थ, नृसिंहतीर्थ अशीं नांवें आहेत.

मनसर

रामटेकच्या पश्चिमेस मनसर हें फार प्राचीन स्थान आहे. येथे बरेच प्राचीन अवशेष आहेत. मध्यभागीं मोठा तलाव असून त्याच्या कांठावर प्राचीन काळीं बौद्ध विहार व स्तूप बांधले असावे असा पुरातत्त्वज्ञांचा कयास आहे. येथील जुन्या इमारतींच्या भिंतीकरिता फार मोठ्या आकाराच्या विटा उपयोगांत आणल्या होत्या त्यांवरून त्यांचें प्राचीनत्व अनुमानितां येतें. येथे एके ठिकाणीं खडकावर शंखाकृति प्राचीन लिपींत (Shell characters मध्ये) लेख कोरला आहे तो अद्यापि वाचला गेला नाही. लक्ष्मणाच्या देवळांतील शिलालेखांत येथील तीर्थाला मणिकालकुंड असें म्हटलें आहे. सिंदूरगिरिमाहात्म्यांतहि याचा उल्लेख आहे. त्यांत म्हटलें आहे कीं मणिकालांत स्नान करून हिंडिंबेची पूजा करावी. 'मणिकालसर:' किंवा 'मणिसर:' या शब्दापासून 'मनसर' हें नांव निघालेलें दिसतें. सध्या मनसर येथे हिंडिंबेचें मंदिर नाही, पण तेथील तीर्थाला हिंडिबातीर्थ म्हणतात. मनसरला श्रीचक्रधरस्वामींनी भेट दिली होती. स्थानपोथींत त्याचें नांव 'मनसीळ' असें येतें. (परिशिष्ट चौथें पाहा.)

मनसर येथील मॅंगनीजच्या खाणी फार प्रसिद्ध आहेत. नागपूरचे सुप्रसिद्ध दानशूर नागरिक कै. राव बहादूर डी. लक्ष्मीनारायण यांनी येथील खाणींवर अलोट संपत्ति मिळविली होती. ती त्यांनी पुढे नागपूर विश्वविद्यालयास आपल्या मृत्युपत्राने दिली. तिचा उपयोग त्यांच्या नांवे

स्थापलेल्या 'लक्ष्मीनारायण टेक्नॉलॉजिकल इन्स्टिटचूट' मध्ये तांत्रिक शिक्षण देण्याकडे करण्यांत येतो.

नन्दरधन किंवा नगरधन

रामटेकजवळचें दुसरें प्राचीन स्थल नन्दिवर्धन होय. हें रामटेकच्या दक्षिणेस सुमारें तीन मैलांवर आहे. प्राचीन काळीं हें वाकाटक राजवंशाच्या ज्येष्ठ पातीच्या राजधानीचें नगर होतें. वाकाटक राज्ञी प्रभावतीगुप्ता हिचा सर्वांत प्राचीन ताम्रपट नन्दिवर्धनाहून दिला होता,[१] त्यानंतर तिचा मुलगा द्वितीय प्रवरसेन याच्या कारकीर्दीच्या अकराव्या वर्षापर्यंतचे ताम्रपटहि याच नगराहून दिले होते. पुढे द्वितीय प्रवरसेनाने आपल्या नांवे प्रवरपुर (वर्धा जिल्ह्यांतील पवनार) हें नगर स्थापून तेथे आपली राजधानी नेली. तथापि नन्दिवर्धनाचें महत्त्व कमी झालें नाही. द्वितीय प्रवरसेनाचा पुत्र नरेन्द्रसेन याच्या कारकीर्दीत बस्तर संस्थानांतील नलवंशी राजांनी विदर्भावर स्वारी करून त्याचा कांही भाग काबीज केला व नन्दिवर्धन येथेच आपली गादी स्थापली. नलवंशी भवदत्तवर्म्याचा ऋद्धपुर ताम्रपट नन्दिवर्धनाहूनच दिला होता.[२] पुढे वाकाटकांनी नल नृपतींना विदर्भांतून हांकून लावलें, पण त्यांनी आपली राजधानी नन्दि-वर्धनास आणली नाही. वाकाटकांच्या ऱ्हासानंतर राष्ट्रकूट नृपति स्वामिराज याचा कलचुरि संवत् ३२२ (इ.स. ५७३) चा ताम्रपट नन्दिवर्धनाहून दिला होता, तो कांही वर्षांपूर्वी नगरधनास सापडला आहे. तो आम्ही इतरत्र प्रसिद्ध केला आहे.[३] त्यानंतर राष्ट्रकूट सम्राट् तृतीय कृष्ण याच्या वर्धा जिल्ह्यांतील देवळी गांवी सांपडलेल्या ताम्रपटांत नागपूर–नन्दिवर्धन या विषयाचा (जिल्ह्याचा) उल्लेख आहे.[४] भोसल्यांच्या काळापर्यंत राम-

१ वा. वि. मिराशी–वाकाटक नृपति आणि त्यांचा काळ, पृ. १८५ इ.

२ पूर्वोक्त, पृ. ५१.

३ वा. वि. मिराशी–कलचुरि नृपति आणि त्यांचा काळ, पृ. १२८.

४ एपिग्राफिया इंडिका, पु. ५, पृ. १८८ इ.

टेकापेक्षा नन्दिवर्धनासच जास्त महत्त्व होतें. दुसरे रघुजी भोसले यांच्या कारकीर्दीत त्यांचे मंत्री देवाजीपंत चोरघडे यांच्या आश्रयास असलेल्या कृष्णदत्त नामक मैथिली पंडिताने 'पुरञ्जनचरित' हें संस्कृत नाटक लिहिलें होतें. त्याच्या प्रस्तावनेंत नागपूरजवळच्या नन्दिवर्धनाचा उल्लेख आहे.[१] या सर्व उल्लेखांवरून ख्रिस्तोत्तर चौथ्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंतचा नन्दिवर्धनाचा इतिहास स्थूल रूपाने ज्ञात होतो. रामटेक हें तहसिलीचें मुख्य ठिकाण झाल्यापासून मात्र नन्दरधनला दुय्यम स्थान प्राप्त झालें आहे.

कोटेश्वराचें देवालय

नन्दिवर्धनास कोटेश्वर महादेवाचें देवालय हेमाडपंती पद्धतीचें आहे. त्यांतील लिंगाला तीन फूट खोल भेग आहे. तिजविषयी खालील आख्यायिका सांगण्यांत येते–[२]

प्राचीनकाळीं एक गवळीण या महादेवाची अत्यंत निष्ठेने भक्ति करीत असे. दूध विकावयास निघण्यापूर्वी ती महादेवाला त्यांतील थोडें अर्पण करून मग बाजारांत जाई. देवाच्या कृपेने तिच्या दुधाला चांगला भाव येऊन तिला चांगले पैसे मिळत. पण त्यायोगें तिच्या पतीला तिच्या पातिव्रत्याबद्दल संशय येऊं लागला. आपली स्त्री रोज महादेवाच्या देवळांत जाते ती तेथे आपल्या प्रियकरास भेटण्यासच जात असावी असें वाटून तो पाळत ठेवून त्या दोघांना एकत्र असतांना ठार करावें म्हणून भाला घेऊन निघाला. गवळिणीने आपला पति क्रोधाविष्ट होऊन येत असलेला पाहून भगवान् शंकराची आपल्याला आश्रय द्यावा म्हणून काकुळतीने प्रार्थना केली. तेव्हा शिवलिंग दुभंग झालें आणि त्यामध्ये त्या गवळिणीने उडी घेतली. पण नंतर तें लिंग पूर्णपणें सांधलें गेलें नाही. त्या गवळ्याला याचा राग येऊन त्याने आपल्या भाल्याने प्रहार केला. त्यामुळे लिंगावर झालेलें छिद्र अद्यापि भाविक लोक दाखवतात.

१ सरदेसाई स्मारक ग्रंथ, पृ. १४८.

२ नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटीयर, पृ. ३०७.

या देवळाजवळच शंखतीर्थ (किंवा शुक्लतीर्थ) नामक तळें आहे. लक्ष्मणाच्या देवळांतील शिलालेखांत या दोन्ही तीर्थांचा उल्लेख आहे. पण सिंदूरगिरिमाहात्म्यांतील वर्णनावरून तीं अंबाळा तलावाजवळ असावीं. हंसतीर्थ म्हणून आणखी एका तीर्थाचें नांव त्या शिलालेखांत येते. तें नगरधनचें तीर्थ असावें असें कै. रा. ब. हीरालालांचें मत होतें. असो.

नगरधनचा किल्ला

नगरधनला भोसल्यांनी बांधलेला भव्य किल्ला आहे. पण डागडुजीच्या अभावीं तो आता खराब झाला आहे. त्याच्या भिंती चांद्याच्या किल्याच्या भिंतीसारख्या आहेत. याच्यापासून कांही अंतरावर जुन्या किल्ल्याची म्हणून जागा दाखवतात तेथे प्राचीन काळच्या लांबरुंद विटा सापडतात. ही जागा वाकाटकांच्या राजधानीची असावी. येथेच अलीकडे मागे उल्लेखिलेला राष्ट्रकूट स्वामिराजाचा ताम्रपट सांपडला होता. येथे उत्खनन होणें जरूर आहे.

प्रकरण दुसरें

रामटेक हाच मेघदूतांतील रामगिरि

कविकुलगुरु कालिदासाच्या मेघदूत काव्यांत वर्णिलें आहे कीं अलकेंतील एका यक्षाने आपलें कर्तव्य करण्यांत कांही प्रमाद केला. तेव्हा त्याचा अधिपति कुबेर याने त्याला शाप दिला कीं एक वर्षभर तुझें सामर्थ्य नष्ट होऊन तुला अलकेबाहेर जावें लागेल. या शापानुसार त्या यक्षाला अलकानगरी सोडावी लागली. तेव्हा तो ज्या ठिकाणी सीतादेवीने स्नान केल्यामुळे जलाशय पवित्र झाले आहेत आणि जेथे वृक्षांची घनदाट छाया आहे अशा रामगिरीच्या आश्रमांत एकटाच येऊन राहू लागला. तेथे आठ महिने झाल्यावर आषाढ महिन्याच्या अखेरीस वर्षाऋतु आला. त्यावेळीं मेघदर्शनाने त्याला प्रियाविरह दुःसह झाला. आपल्या प्रिय पत्नीचीहि अशीच अवस्था झाली असेल असें जाणून त्याने त्या मेघालाच आपला दूत म्हणून पाठविण्याचें ठरविलें. त्याने त्या पर्वतावर नुकतींच उमललेलीं कुटजपुष्पें त्याला अर्पण करून त्याची स्तुति केली आणि नंतर त्याला अलकेचा मार्ग सांगण्यास सुरवात केली. तो म्हणाला--

> **आपृच्छस्व प्रियसखममुं तुङ्गमालिङ्ग्य शैलं**
> **वन्द्यैः पुंसां रघुपतिपदैरङ्कितं मेखलासु ।**

(वा मेघा ! सर्व जनांना वंद्य अशा भगवान् रामचंद्राच्या पादुकांनी अंकित अशा या तुझ्या उंच पर्वतरूपी प्रिय मित्राला आलिंगन देऊन त्याचा निरोप घे.) नंतर

> **स्थानादस्मात्सरसनिचुलादुत्पतोदङ्मुखः खं**
> **दिङ्नागानां पथि परिहरन् स्थूलहस्तावलेपान् ।। (मेघ. १४)**

ज्या ठिकाणीं सरस असे निचुल (वेत) आहेत अशा या रामगिरीहून उत्तरेस तोंड करून उड्डाण कर. वाटेंत दिङ्नागांनी फेकलेल्या स्थूल शुंडादंडांना दूर सारून तुला जावें लागेल. पुढे यक्ष सांगतो कीं,

सद्यःसीरोत्कषणसुरभिक्षेत्रमारुह्य मालं
किञ्चित्पश्चाद्व्रज लघुगतिर्भूय एवोत्तरेण ।। (मेघ. १६)

ज्या ठिकाणचीं शेतें नुकतीच नांगरल्यामुळे सुगंधित झालीं आहेत अशा माल पठारावर चढून गेल्यावर तूं थोडेसें पश्चिमेस वळून नंतर पुन्हा उत्तर दिशेने जावें.

त्वामासारप्रशमितवनोपप्लवं साधु मूर्ध्ना
वक्ष्यत्यध्वश्रमपरिगतं सानुमानाम्रकूटः । (मेघ. १७)

नंतर ज्याने आपल्या जलवृष्टीने वणवे विझविले आहेत त्या, मार्ग चालून गेल्यामुळे श्रान्त झालेल्या, तुला आम्रकूट पर्वत आपल्या शिखरावर उत्तम अशी जागा देईल. पुढे यक्ष म्हणतो–

तस्मिन् स्थित्वा वनचरवधूभुक्तकुञ्जे मुहुर्तं
तोयोत्सर्गद्रुततरगतिस्तत्परं वर्त्म तीर्णः ।
रेवां द्रक्ष्यस्युपलविषमे विन्ध्यपादे विशीर्णां
भक्तिच्छेदैरिव विरचितां भूतिमङ्गे गजस्य ।।

ज्यावरील कुञ्जांत वनचरांच्या स्त्रिया रममाण होतात त्या आम्रकूट पर्वतावर थोडा वेळ टेकल्यावर पाण्याच्या वर्षावाने ज्याची गति जास्त वेगाची झाली आहे अशा तुला त्या पर्वताच्या नंतरचा मार्ग आक्रमण केल्यावर विन्ध्य पर्वताच्या पायथ्याशी खडकाळ भागांत अनेक प्रवाहांत विभक्त झालेली नर्मदा नदी हत्तीच्या अंगावर चित्रविचित्र रंगांनी काढलेल्या वेलबुट्टीप्रमाणें दिसेल.

त्यानंतर यक्षाने मेघास दशार्ण देशाच्या विदिशा नामक राजधानीचा मार्ग सांगितला आहे विदिशेजवळील वेत्रवती (बेटवा) नदी, नीचैर्गिरि (सध्याचा उदयगिरि) इत्यादिकाचें वर्णन केल्यावर यक्ष म्हणतो–

वक्रः पन्था यदपि भवतः प्रस्थितस्योत्तराशां
सौधोत्संगप्रणयविमुखो मा स्म भूरुज्जयिन्याः । (मेघ. २७)

उत्तरेला जाणाऱ्या तुला जरी वाकडे जावे लागलें तरी, बा मेघा, उज्जयिनीच्या सौधांच्या गच्च्यांवर क्षणभर टेकण्यास अनमान करू नको. यक्षाने उज्जयिनींतील अनेक दृश्यांचें रसभरित वर्णन केलें आहे. तें येथे देणें शक्य नाही. नंतर मार्गांत लागणारी गम्भीरा नदी, देवगिरि नामक पर्वतावरील कार्त्तिकेयाचें देवालय, चर्मण्वती (चंबळा) नदी, दशपुर (हल्लीचें मन्दसोर), ब्रह्मावर्त देश, कुरुक्षेत्र, सरस्वती व गंगा या नद्या व शेवटीं हिमालय व त्यावर वसलेली अलका यांचें थोडक्यांत पण मनोरम वर्णन करून कवीने आपल्या काव्याचा पूर्वार्ध समाप्त केला आहे. उत्तरार्धांत यक्षाने आपल्या गृहाचें वर्णन करून मेघाने आपल्या प्रियेला पोचविण्याचा संदेश दिला आहे.

रामगिरीपासून अलकेपर्यंतचा जो मेघमार्ग वर वर्णिला आहे, त्यापैकी विदिशेनंतरचा मार्ग विवादस्पद नाही. पण रामगिरि ते विदिशा या मार्गाबद्दल मात्र भिन्न भिन्न मतें प्रदर्शित झालीं आहेत. या मार्गाचें उत्तर टोंक जीं विदिशा नगरी तिचें स्थान निश्चित आहे. मध्यप्रदेशांतील भेलसा गांवाजवळ बेसनगर नांवांचें लहानसें खेडें सध्या दिसतें. तो प्राचीन विदिशा नगरी. हिच्या जवळच वेत्रवती किंवा बेटवा नदी वाहत आहे. उत्तरेस सुमारें दोन मैलांवर एक उदयगिरि नांवाची लहानशी टेकडी आहे तो प्राचीन नीचैर्गिरि. या टेकडीवर प्राचीन गुहा असून त्यांत गुप्तकालीन शिल्पें व कोरीव लेख अद्यापि विद्यमान आहेत.[१] तेव्हा विदिशा नगरीच्या स्थानाविषयी संदेह नाही. हिच्या दक्षिणेस कोठे तरी रामगिरि असला पाहिजे. रामगिरीपासून विदिशेच्या मार्गावर प्रथम माल नामक पठार, नंतर आम्रकूट पर्वत व नर्मदा नदी लागते असें मेघदूतांतील वर्णनावरून मागे दाखविलें आहे. या भौगोलिक उल्लेखांवरून रामगिरीचें स्थान ठरवावयाचें आहे.

मेघदूतांतील रामगिरि कोणता याविषयी विविध मतें आतापर्यंत प्रकट झालीं आहेत. (१) मेघदूताचे कांही प्राचीन टीकाकार तो चित्रकूट होय

१ फ्लीट–गुप्त इन्स्क्रिप्शन्स्, पृ.

असें म्हणतात. (२) नागपूरचे कै. शिवदासपंत बार्लिंगे हे हा रामगिरि म्हणजे पूर्वीच्या बस्तर संस्थानांतील बस्तरपासून सोळा मैलांवरचा रामगड असें आग्रहाने प्रतिपादित असत; (३) अलीकडे पुण्याचे श्री. वामन कृष्ण परांजपे यांनी आपल्या 'मेघदूतावर नवा प्रकाश' नामक पुस्तकांत रामगिरि म्हणजे पूर्वीच्या सरगुजा संस्थानांतील रामगड व तोच रामायणांत वर्णिलेला चित्रकूट असें प्रदिपादिलें आहे. तथापि त्यांनी कबूल केल्याप्रमाणें यांपैकी एकाहि मताला सर्वमान्यता मिळाली नसून नागपूरजवळचें रामटेक हाच रामगिरि असें सर्व लोक धरून चालतात आणि त्या मताचाच उल्लेख मेघदूतावरच्या सर्व पुस्तकांत तसेच मेघमार्गाच्या सर्व नकाशांत केलेला असतो. हें मतच कसें सयुक्तिक आहे हें प्रथम दाखवून नंतर इतर मतांचें चिकित्सक परीक्षण करूं.

रामटेक हाच रामगिरि

रामगिरि म्हणजे नागपूरच्या उत्तेरेस सुमारे २७ मैलांवर असलेलें रामटेक होय. हें मत सुमारें दीडशें वर्षांपूर्वी होरेस हेमन विल्सन या आंग्ल पंडिताने मेघदूताच्या आवृत्तीला जोडलेल्या टीप्पणींत प्रथम प्रतिपादिलें. हें मत कै. प्रा. का. बा. पाठक यांच्या मेघदूताच्या प्रथमावृत्तींत स्वीकारलें होतें. हेंच मत सर्वांत सयुक्तिक आहे हें आम्ही सुमारें पंचवीस वर्षांपूर्वी प्रसिद्ध केलेल्या 'कालिदास' ग्रंथांत दाखविलें होतें.[१] नंतर सुमारें दहा वर्षांनी भारतांत सर्वत्र विक्रमसहस्त्राब्दीचा उत्सव झाला त्या प्रसंगीं आम्ही या प्रश्नाची सविस्तर चर्चा 'सह्याद्रि' मासिकाच्या एप्रिल १९४४ च्या अंकांत केली होती[२] त्या लेखाची इंग्लिश[३] व हिंदी[४] रूपांतरें विक्रमस्मृति

१ कालिदास (द्वितीयावृत्ति), पृ. १२३–१२४.

२ हा लेख आतां संशोधनमुक्तावलि, सर पहिला, (पृ. ५३–६४), यांत छापला आहे.

३ See 'Location of Ramagiri' In the Nagpur University Journal, No. IX, pp. 9 f.

४ विक्रमस्मृतिग्रंथ, पृ. ३४९–३५४.

ग्रंथांत व इतरत्र त्या वेळीं प्रसिद्ध झालीं होतीं. या मताला उपोद्बलक असा पुरावा दिवसें दिवस जास्त जास्त उपलब्ध होत आहे. कालिदास गुप्तसम्राट् द्वितीय चन्द्रगुप्त–विक्रमादित्य याच्या आश्रयास होता हें मत आता बहुतेक विद्वानांस मान्य झालें आहे. या चन्द्रगुप्ताने आपली प्रभावतीगुप्ता नामक कन्या वाकाटक राजकुमार द्वितीय रुद्रसेन यास दिली होती. पुढे गादीवर आल्यावर लौकरच या रुद्रसेनाचा अंत झाला. त्या वेळी त्याला दिवाकरसेन व दामोदरसेन नामक दोन पुत्र होते. त्यांपैकी दिवाकरसेन या वडील पुत्राच्या नांवें प्रभावतीगुप्तेने निदान तेरा वर्षें रीजंट म्हणून राज्य केलें. या काळांत वाकाटक दरबारीं गुप्तांचा पुष्कळच प्रभाव पडला होता, हें अनेक प्रमाणांवरून दिसतें. उदाहरणार्थ, वाकाटकांचे सर्व ताम्रपट पेटिकाशीर्षक लिपींत (box–headed characters मध्ये) लिहिले आहेत, पण प्रभावतीगुप्तेने रीजंट म्हणून दिलेला ताम्रपट कीलकशीर्षक लिपींत (nail–headed characters मध्ये) लिहिला आहे. लिपींतील हा बदल गुप्त अधिकाऱ्यांच्या कारणाने झालेला दिसतो. दुसरें असें कीं, वाकाटकांच्या सर्व ताम्रपटांत राज्य करणाऱ्या वाकाटक राजाची वंशावळ प्रथम प्रवरसेनापासून दिलेली आढळते. प्रभावतीगुप्तेच्या ताम्रपटांत मात्र आरंभीं वाकाटकांची वंशावळ दिली नसून गुप्तांची दिली आहे. यालाहि गुप्त अधिकारीच कांही अंशीं तरी कारण असावे.[१] तेव्हा चन्द्रगुप्ताने आपल्या पदरचे अनेक विश्वासू अधिकारी व मुत्सद्दी विदर्भांत आपल्या मुलीला राज्यकारभारांत मदत करण्याकरितां पाठविले होते, असें अनुमान करण्यास हरकत नाही. वाकाटकांची राजधानी नागपूरच्या उत्तरेस सुमारें २५ मैलांवर नन्दिवर्धन (सध्याचें नन्दरधन) येथें होती. प्रभावतीगुप्तेचे दोन ताम्रपट आतापर्यंत सापडले आहेत.[२] ते दोन्ही कार्त्तिक शुक्ल द्वादशीस भगवत्पादमूलांना अर्पण करून ब्राह्मणांना दिले आहेत. त्यांपैकी एक तर रामगिरिस्वामीच्या पाद-

१ वा. वि. मिराशी––वाकाटक नृपति आणि त्यांचा काळ, पृ. १८५–१९३.

२ पूर्वोक्त, पृ. १८५–१९३ आणि २३३–२४२.

मूलाजवळ (रामगिरिस्वामिनः पादमूलात्) दिला होता.[१] प्राचीनकाळीं विष्णूच्या नांवांच्या शेवटीं 'स्वामिन्' आणि शिवाच्या नांवाच्या शेवटीं ईश्वर अशीं पदें जोडण्याचा प्रघात होता. तेव्हा 'रामगिरिस्वामिन्' हें नांव विष्णूच्या रामावताराचें द्योतक होतें व त्याचें देवालय रामगिरि नामक पर्वतावर होतें, असें सहजच अनुमान करतां येतें. प्रभावतीगुप्ता ही आपला पिता द्वितीय चन्द्रगुप्त–विक्रमादित्य याच्याप्रमाणे विष्णूपासक होती. बहुधा सर्व वाकाटक नृपति शिवोपासक होते, पण प्रभावतीगुप्तेचा पति द्वितीय रुद्रसेन हा विष्णूपासक झाला होता असें वाकाटकांच्या ताम्रपटांतील त्याच्या वर्णनावरून दिसतें.[२] त्याच्या धार्मिक मतांतील हा बदल प्रभावतीगुप्तेच्या प्रभावामुळेंच घडून आला असावा. तिच्या द्वितीय प्रवरसेन नामक पुत्राचेहि कांही ताम्रपट भगवत्पादमूलांना अर्पण करून नंतर ब्राह्मणांस दिलेले दिसतात. वाकाटकांचें राज्य विदर्भावर होतें. तेव्हा या रामगिरीचा शोध विदर्भांतच केला पाहिजे हें उघड आहे. नन्दिवर्धन या वाकाटक राजधानीपासून सुमारें तीन मैलांवर रामटेक हें स्थान प्राचीन काळापासून पुण्यक्षेत्र म्हणून सुप्रसिद्ध आहे. तेथे टेकडीवर सध्याहि राम व सीता यांचें एक आणि त्याच्याच पुढें लक्ष्मणाचें दुसरें, अशीं दोन देवालयें आहेत. लक्ष्मणाच्या देवालयांत रामदेवराव यादवाच्या काळचा ख्रिस्तोत्तर तेराव्या शतकांतील कोरीव लेख आहे. तो आम्ही वीस वर्षांपूर्वी सरदेसाई स्मारक ग्रंथांत प्रसिद्ध केला होता.[३] या कोरीव लेखांत रामटेक येथील सध्याच्या बहुतेक देवळांचा व तीर्थांचा उल्लेख आहे हें मागे दाखविलें आहे. रामटेकला लागून असलेल्या मनसर गांवी जे अवशेष अद्यापि दिसतात त्यांवरून तें ठिकाण अत्यंत प्राचीन आहे अशी तज्ज्ञांची खात्री पटली आहे. भारतीय पुरातत्त्वखात्याचे माजी संचालक कै. रा. ब. काशीनाथ नारायण

१ परिशिष्ट तिसरें पाहा.

२ 'भगवतश्चक्रपाणेः प्रसादोपार्जितश्रीसमुदायस्य महाराजश्रीरुद्रसेनस्य' हें जांब ताम्रपटांतील द्वितीय रुद्रसेनाचें वर्णन पाहा. वा. नृ. का., पृ. १९९.

३ परिशिष्ट दुसरें पाहा.

दीक्षित यांनी हें ठिकाण स्वतः पाहून तें उत्खननाकरितां पसंत केलें होतें. पुढे द्रव्याभावीं तें काम त्या खात्याने हातीं घेतलें नाही. असो.

तेव्हा रामटेक हें ठिकाण अत्यंत प्राचीन आहे यांत संशय नाही. शिवाय तें प्राचीन काळापासून भगवान् रामचंद्राचें पूज्य स्थान म्हणून सुप्रसिद्ध आहे. रामटेक व रामगिरि या नांवांतील सादृश्य स्पष्ट आहे. किंबहुना लक्ष्मणाच्या देवळांतील कोरीव लेखांत या टेकडीला रामगिरि असेंच म्हटलें आहे.[१] सबंध विदर्भांत रामगिरि या नांवाला जुळेल असें व प्राचीन काळापासून पुण्य क्षेत्र म्हणून प्रसिद्ध असलेलें असें दुसरें स्थान नाहीं. तेव्हा सध्याचें रामटेक हेंच प्राचीन रामगिरि होय हेंच मत सयुक्तिक दिसतें.

भगवान् रामचंद्राच्या पादुका

'रामगिरिस्वामिनः पादमूलात्' या शब्दप्रयोगावरून वाकाटककाळीं या टेकडीवर भगवान् रामचंद्रांच्या पादुकांची पूजा केली जात असे, असें दिसतें. मेघदूतांतील 'वन्द्यैः पुंसां रघुपतिपदैरङ्कितं मेखलासु' (सर्वांना पूज्य अशा भगवान् रामचंद्राच्या पादुकांनी अंकित) हें वर्णन विदर्भांतील प्राचीन रामगिरीला ठीक जमतें. कालांतराने तेथें राम, सीता आणि लक्ष्मण यांच्या मूर्ति स्थापण्यांत आल्या त्यांचा उल्लेख लक्ष्मणाच्या देवळांतील शिलालेखांत आला आहे. शिवाय कालिदासाने रामगिरीपासून विदिशे-पर्यंतचा जो मेघमार्ग वर्णन केला आहे तो रामटेकच्या भौगोलिक स्थितीला पूर्णपणें जुळतो. कसा तें पाहा—

श्लोक १४ मध्ये **मेघाचा मार्ग**—

स्थानादस्मात्सरसनिचुलादुत्पतोदङ्मुखः खं
दिङ्नागानां पथि परिहरन्स्थूलहस्तावलेपान् ।। (मेघ. १४)

---

१ त्या लेखाच्या ४५ व्या ओळींतील धर्मेश्वराच्या वर्णनांत रामगिरीचा उल्लेख आहे. मागे, पृ. १७ पाहा.

अशा रीतीने यक्ष मेघाला उत्तर दिशेकडे उड्डाण करण्यास सांगतो, त्यावरून त्यानंतर मेघदूतांत वर्णन केलेले नदीपर्वत रामगिरीच्या उत्तरेस होते, हें स्पष्ट आहे. श्लोक १६ मध्ये

सद्यःसीरोत्कषणसुरभिक्षेत्रमारुह्य मालं
किञ्चित्पश्चाद्व्रज लघुगतिर्भूय एवोत्तरेण ।। (मेघ. १६)

रामगिरीहून उत्तरेस निघालेल्या मेघाला प्रथम माल नांवाचें पठार लागेल, असें म्हटलें आहे. रामटेकच्या उत्तरेस सध्याहि शिवनी–छपाराचें पठार आहे त्यास हें वर्णन बरोबर जुळतें. ह्या माल क्षेत्रावर चढल्यावर ('आरुह्य' या ल्यबन्तावरून चढण्यापूर्वी नव्हे) थोडेंसें पश्चिमेस वळून नंतर पुनः (भूयः) उत्तरेचा मार्ग आक्रमण कर, असें यक्ष मेघास सांगत आहे. यक्षाला मेघास विदिशेस न्यावयाचें आहे. नकाशांत पाहिलें असतां विदिशा रामटेकच्या ठीक उत्तरेस नसून त्या दिशेच्या किंचित् पश्चिमेस आहे, असें दिसेल.[१] म्हणून कालिदासाने मेघाला 'किंचित्पश्चाद्व्रज लघुगतिर्भूय एवोत्तरेण' असें सांगितलें आहे. कालिदास स्वतः विदर्भांत रामटेकजवळच्या नन्दिवर्धन या राजधानींत राहिला होता, हें आम्ही पुढे दाखविणार आहों. त्याला या मार्गाची पूर्ण माहिती होती. म्हणून त्याच्या वर्णनांत इतकी सूक्ष्मता आली, तर त्यांत आश्चर्य नाही.

मालप्रदेशाच्या किंचित् पश्चिमेस वळून नंतर पुनः उत्तरेस गेल्यावर मेघाला आम्रकूट पर्वत लागणार होता. त्याचें वर्णन श्लोक १७ ते १९ मध्ये आलें आहे. हा आम्रकूट कांही लोक म्हणतात, त्याप्रमाणे अमरकंटक नव्हे. अमरकंटकचें प्राचीन नांव मेकल असें होतें. अमरकंटक पर्वतांत नर्मदानदीचा उगम होतो म्हणून तिला मेकलसुता म्हणतात. अमरकंटकला 'आम्रकूट' असें नांव होतें, असें एकाहि संस्कृत कोशावरून किंवा पुराणादि ग्रंथांवरून दिसत नाही. तेव्हा आम्रकूट अमरकंटक असणें शक्य नाही.

१ रामगिरीचे रेखांश पू. ७९,२० आणि विदिशेचे पू. ७७,५० आहेत.

आम्रकूटाचा शोध विदर्भांतच शिवनी–छपाराच्या पश्चिमोत्तर दिशेस सातपुडा पर्वतांत केला पाहिजे. या भागांत अमरवाडा (प्राचीन आम्रवाटक) असें गांव अद्यापि विद्यमान आहे. त्याच्या उत्तरेस असलेल्या सातपुडा पर्वताच्या एका शिखराला आम्रकूट हें नांव असावें. सध्या तें प्रचारांत नाही. प्राचीन काळचीं अनेक भौगोलिक नांवें आता नष्ट झालीं आहेत. त्यांतीलच हा प्रकार आहे.

आम्रकूट पर्वतावर किंचित् काळ थांबून वृष्टि केल्यावर हलक्या झालेल्या मेघाने त्वरित गतीने त्यानंतरचा मार्ग आक्रमिल्यावर (तत्परं वर्त्म तीर्णः) त्याला नर्मदा नदी लागणार होती, हें मेघदूतांतील पुढील एकोणिसाव्या श्लोकावरून स्पष्ट दिसतें.

तस्मिन् स्थित्वा वनचरवधूभुक्तकुञ्जे मुहूर्तं
तोयोत्सर्गद्रुततरगतिस्तत्परं वर्त्म तीर्णः ।
रेवां द्रक्ष्यस्युपलविषमे विन्ध्यपादे विशीर्णां
भक्तिच्छेदैरिव विरचितां भूतिमंगे गजस्य ।। (मेघ. १९)

या श्लोकांतील वर्णन अमरकंटकास मुळीच लागू पडत नाही. अमरकंटकांतच नर्मदा नदीचा उगम होत असल्याने तो पर्वत ओलांडून द्रुततर गतीने कांही अंतर गेल्यावर मेघाला नर्मदा नदी लागली नसती. शिवाय नर्मदा नदीचें येथील वर्णन उगमाजवळचें नसून ग्रीष्म ऋतूच्या शेवटीं विन्ध्य पर्वताच्या पायथ्याशी खडकाळ भागांत (उपलविषमे विन्ध्यपादे) नर्मदा नदीचा प्रवाह लहान लहान स्रोतांत विभागला जातो त्याचें आहे. हें दृश्य होशंगाबाद–नरसिंगपूर या भागांत दिसतें. यानंतर नर्मदा नदीचें पाणी पिऊन (जम्बूकुञ्जप्रतिहतरयं तोयमादाय गच्छेः) (अर्थात् नर्मदा नदी ओलांडून) मेघाने दशार्ण देशांतील विदिशानगरीस जावयाचें होतें.

मेघदूतांत वर्णिलेल्या मार्गावरून मेघाने रामगिरीहून उत्तरेच्या दिशेने जाऊन नर्मदा नदी ओलांडून विदिशेस जावयाचें होतें, हें उघड आहे.

हें वर्णन रामटेक ते विदिशा या मार्गास पूर्णपणें जुळतें. त्यावरून रामटेक म्हणजे रामगिरि, हें सिद्ध होतें.

कालिदासाचें विदर्भांतील वास्तव्य

मेघमार्गाच्या या सूक्ष्म व अचूक वर्णनावरून कालिदास विदर्भांत कांही काळ राहिला असावा, असें अनुमान केल्यास तें चूक होणार नाही. मागें द्वितीय रुद्रसेनाच्या निधनानंतर बाल नृपति दिवाकरसेन याच्या वतीने प्रभावतीगुप्ता राज्यकारभार पाहत असतां वाकाटकांच्या दरबारीं गुप्तांचें कसें प्रस्थ माजलें होतें तें दाखविलें आहे.[१] त्या काळांत द्वितीय चन्द्रगुप्ताने आपल्या मुलीस राज्यकारभारांत मदत करण्याकरितां जे अधिकारी व मुत्सद्दी पाठविले होते, त्यांमध्ये कालिदासहि असावा. कालिदासाच्या ग्रंथांतील राजनीतिविषयक उल्लेखांवरून तो चांगलाच राजनीतिज्ञ होता यांत संशय नाही. किंबहुना, विक्रमादित्याने त्याला आपला दूत (वकील) म्हणून कुन्तलाधिपतीच्या दरबारीं पाठविलें होतें, अशी परांपरागत आख्यायिका राजशेखर, भोज इत्यादि संस्कृत ग्रंथकारांनी उल्लेखिली आहे. कालिदासाने या प्रसंगावर कुन्तलेश्वरदौत्य नामक ग्रंथ रचला होता. त्यांतील कांही श्लोक क्षेमेन्द्र, भोज, राजशेखर इत्यादि संस्कृत ग्रंथकारांनी उद्धृत केले आहेत. हा कुन्तलाधिपति म्हणजे वाकाटकांचा समकालीन असलेल्या राष्ट्रकूट वंशांतील देवराज होय, हें आम्ही इतरत्र दाखविलें आहे.[२] तेव्हा कालिदास प्रभावतीगुप्तेला राज्यकारभारांत मदत करण्याकरितां विदर्भांत आलेल्या मुत्सद्द्यांपैकी एक असावा, असें अनुमान करण्यास हरकत नाही. विदर्भाची तत्कालीन राजधानी नन्दिवर्धन यापासून रामगिरि (सध्यांचें रामटेक) केवळ तीन मैलांवर आहे. तेव्हा कालिदास तेथे अनेकदा गेला असावा. तेथे त्याला मेघदूताची कल्पना सुचली, असें दिसतें. रामगिरिपासून विदिशेपर्यंतचा मार्ग

---

१ मागे, पृ. ३० पाहा.

२ संशोधनमुक्तावलि, सर पहिला, पृ. ६५–७५ यांवरील ‘कालिदासाचें कुन्तलेश्वरदौत्य’ हा लेख पाहा.

कालिदासाच्या चांगलाच परिचयाचा असल्याने त्यावरील नदी–पर्वतांचें वर्णन त्याने अत्यंत सूक्ष्मतेने केलें असलें, तर नवल नाही.

कालिदासाची सेतुबन्धकाव्याच्या रचनेंत मदत

कालिदास एकदाच विदर्भात आला होता, असें नाही. प्रसंगविशेषाने त्याचें विदर्भांत अनेकदां येणें जाणें होत असे, असें अनुमान करण्यास जागा आहे. मागें उल्लेखिलेला वाकाटक बाल नृपति दिवाकरसेन हाहि दुर्दैवाने अल्पायुषी झाला. त्याच्यानंतर त्याचा धाकटा भाऊ दामोदरसेन उर्फ द्वितीय प्रवरसेन गादीवर आला. याचे आतापर्यंत तेरा चौदा ताम्रपट विदर्भात व इतरत्र सापडले आहेत. त्यावरून त्याच्या दानशूरत्वाची कल्पना करतां येते. हा जसा दाता तसाच कवि म्हणूनहि सुविख्यात होता. याने सेतुबंध नामक काव्य महाराष्ट्री प्राकृतांत रचलें आहे. त्याची स्तुति बाण, आनन्दवर्धन इत्यादि संस्कृत कवि व आलंकारिक यांनी मुक्तकंठाने केली आहे. हें काव्य वस्तुतः कालिदासाने रचलें, अशी आख्यायिका त्या काव्याचा टीकाकार रामचन्द्र याने उल्लेखिली आहे. तो म्हणतो– इह तावन्महाराजप्रवरसेननिमित्तं महाराजाधिराजविक्रमादित्येनाज्ञप्तो निखिलकविचक्रचूडामणिः कालिदासमहाशयः सेतुबन्धं चिकीर्षुः... मङ्गलमाचरन्नाह। या उताऱ्यांत महाराजाधिराज विक्रमादित्याच्या आज्ञेने महाराज प्रवरसेनाकरितां कालिदासाने सेतुबन्ध काव्य रचलें, असें म्हटलें आहे. हा महाराजाधिराज विक्रमादित्य म्हणजे सुप्रसिद्ध गुप्त सम्राट् द्वितीय चन्द्रगुप्त होय. त्याने विक्रमादित्य ही पदवी धारण केली होती हें त्याच्या सुवर्ण नाण्यांवरून ज्ञात झालें आहे. वरील उताऱ्यांत विक्रमादित्याला महाराजाधिराज आणि प्रवरसेनाला महाराज अशा पदव्या लावल्या आहेत. याच पदव्या अशाच रीतीने वाकाटकांच्या ताम्रपटांत अनुक्रमें द्वितीय चन्द्रगुप्त व द्वितीय प्रवरसेन यांस लावल्या आहेत, त्यावरूनहि या आख्यायिकेविषयी संशय राहत नाही. या सेतुबन्ध काव्याचे पंधरा आश्वास आहेत. बहुतेक आश्वासाच्या शेवटीं पुष्पिकेमध्ये 'इति श्रीप्रवरसेनविरचिते कालिदासकृते दशमुखवधे महाकाव्ये' असें म्हटलें आहे. त्यावरूनहि या काव्याच्या रचनेंत कालिदासाचा

हात होता, असें दिसतें. पहिल्या आश्वासाच्या नवव्या गाथेंत आपण राज्यारोहणानंतर लौकरच ही काव्यकथा रचण्यास आरंभ केला, पण ती शेवटास नेणें दुष्कर होत आहे, असें प्रवरसेनाने म्हटलें आहे. अशा प्रसंगीं चन्द्रगुप्त विक्रमादित्याने आपला आश्रित कवि कालिदास याला आपला दौहित्र द्वितीय प्रवरसेन यास काव्यरचनेंत मदत करण्यास सांगितलें असलें, तर आश्चर्य नाही. या कारणामुळेहि कालिदास विदर्भराजधानी नन्दिवर्धन येथे कांही काळ राहिला असावा.[1]

रामटेक हाच रामगिरि या मताला सर्वमान्यता

वर संक्षिप्त रीतीने मांडलेल्या प्रमाणांवरून रामटेक हाच प्राचीन रामगिरि हेंच मत सयुक्तिक आहे, असें वाचकांस दिसून आलें असेल. वरील प्रमाणें पटल्यामुळेच 'मेघदूतावरचें कोणतेंहि पुस्तक व त्यांतील मेघमार्गाचा नकाशा पहावा तों त्यांत नागपूरजवळचें रामटेक हाच रामगिरि म्हणून दाखविलेला असतो. एकंदरीने रामटेकच सध्या गृहीत धरून चालतात' असें आमचे प्रतिपक्षी श्री. वा. कृ. परांजपे हेहि कबूल करतात.[2] या ऐकमत्याचें श्री. परांजपे यांस वैषम्य वाटून त्यांनी मध्यप्रदेशाच्या सरगुजा संस्थानांतील रामगड यास रामटेकचा प्रतिस्पर्धी म्हणून उभें केलें आहे. 'मेघदूतावर नवीन प्रकाश' नामक नुकत्याच प्रकाशित झालेल्या पुस्तकांत त्यांनी आमच्या मताची छाननी करून त्यांतील दोष दाखविण्याचा आणि रामगड हाच रामगिरि, हें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. श्री. परांजपे हे वकील आहेत. तेव्हा त्यांच्या विवेचनांत सामान्यतः वकील आपल्या अशीलाच्या बचावाकरितां जी वादपद्धति व जे डावपेच अवलंबितात ते दिसत असल्यास नवल नाही. त्यांच्या विवेचनांत शब्दावडंबर

१ याविषयी सविस्तर विवेचन आमच्या 'वाकाटक नृपति आणि त्यांचा काल' (पृ. १२१–१२४) यामध्ये पाहा.

२ मेघदूतावर नवा प्रकाश (मे. न. प्र.), पृ. १७.

प्रतिपक्षाला कोपरखळ्या, त्याची कुचेष्टा, सत्यापलाप[१] व असत्यसूचन[२] (suppressio veri and suggestio falsi) इत्यादि प्रकार सर्वत्र आढळतात. आम्हांस या वादपद्धतीचा अवलंब करावयाचा नाही. केवळ सत्यान्वेषणार्थ विवाद्य विषयाचें सप्रमाण विवेचन करावयाचें आहे.

श्री. परांजपे यांचे आक्षेप

श्री. परांजपे यांनी आपल्या पुस्तकाच्या पहिल्या झोतांत (प्रकरणांत) रामगिरि म्हणजे रामटेक या मतावर खालील आक्षेप घेतले आहेत.

आक्षेप पहिला

रामटेकाच्या बाबतींत मेघदूतांत वर्णिलेल्या रामगिरीच्या खुणा आढळत नाहीत. अशा चोवीस खुणा परांजप्यांनी काढल्या आहेत. त्यांपैकी खालील खुणा रामटेकास जुळत नाहीत, असें त्यांचें म्हणणें आहे–

(१) सीतास्नान; (२) ऋषींचे आश्रम; (३) उंच शिखर; (४) उंच व भव्य; (५) रामपदचिह्नांकित; राम येथे सीतेसह वनवासांत

---

१ सत्यापलापाचीं एकदोन उदाहरणें येथे देतों. सरगुजा संस्थानांतील रामगड ३२०० फूटांच्यावर उंच आहे असें श्री. परांजपे सांगतात. (मे. न. प्र., २३), सर्व्हे ऑफ इंडियाच्या नकाशांत ज्या टेकडीवर रामलक्ष्मणांचीं देवळें आहेत असें ते सांगतात, तिची उंची फक्त १२०६ फूट दिली आहे. त्या टेकडीवर एक उंच सुळका आहे त्याची उंची ६०० फूट आहे, असें परांजपे सांगतात. म्हणजे रामगडचें सर्वांत उंच शिखर सुमारें १८०० फूट झालें, ३२०० फूट नव्हे. दुसरी गोष्ट, प्रयागाहून रामगडच्या अंतराची. हें अंतर शक्य तों कमी दाखविण्याकरितां परांजपे तें १५० मैल आहे, असें सांगतात. वास्तविक तें सरळ रेषेंतहि (as the crow flies) २०० मैल आहे. रस्त्यांतलीं वळणें लक्षांत घेतल्यास तें निदान २५० मैल होईल, व तसें कनिंग्ह्यामने म्हटलेंहि आहे.

२ असत्यसूचनाचीं अनेक उदाहरणें मेघदूताच्या श्लोकांचा अर्थ करतांना व रामटेकवरील आक्षेपांत पुढे आढळतील.

राहिले; (६) उंच शिखर व सोसाटयाचा वारा; (७) सरस अशीं वेताचीं झाडें; (८) घनदाट छायेच्या वृक्षांची गर्द झाडी; (९) याच्या लगत नांगरण्यालायक माल क्षेत्र; (१०) येथून पश्चिमेला जाऊन उत्तरेला गेलें कीं अलका लागते; (११) वाटेंत नर्मदा ही हत्तीच्या अंगावरील वेलबुट्टीप्रमाणें दिसणें; (१२) नर्मदेचें पाणी शोषून–ओलांडून नव्हे–जाणें; (१३) हरिणी, मोर, नदी किंवा जलप्रवाह असणें; (१४) धातुराग.

याशिवाय पूढील खुणा रामटेकच्या बाबतींत जुळतात काय, याबद्दल श्री. परांजप्यांस संशय आहे--(१) प्रतिवर्षी नियमाने जलवृष्टि; (२) पायथ्याशी गांवढळ स्त्रिया; (३) आसपास खेडवळ स्त्रिया; (४) याच्या कांहीशा पश्चिमेला आम्रकूट पर्वत; (५) यावरील रानवणवे प्रतिवर्षी मेघवृष्टीने विझणें; (६) आम्रकूटाची स्तनसदृशता; (७) आम्रकूटाच्या आसपास जंगली लोकांची वस्ती.[1]

वरील आक्षेपाचें उत्तर

आता या आक्षेपांतील मुद्द्यांचा संक्षेपाने विचार करूं--

प्रथम ही गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे कीं कालिदास मेघदूतांत ज्या काळांतील रामटेक, त्याचे परिसर आणि मेघमार्ग यांचें वर्णन करीत आहे त्या काळाला आज दीड हजार वर्षें होऊन गेलीं. कारण कालिदास सुमारें इ. स. ४०० च्या सुमारास होऊन गेला असें मानलें जातें. (कांही लोक तो ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकांत होऊन गेला, असें म्हणतात. त्यांच्या मताप्रमाणें तर हा काळ दोन हजार वर्षांचा होईल.) या प्रदीर्घ काळांत भौगोलिक स्थितीखेरीज इतर परिस्थिति तशीच टिकून राहिली असेल, हें संभवनीय नाही. भवभूतीने उत्तररामचरितांत भगवान् रामचंद्र चौदा वर्षांनंतर दंडकारण्यास भेट देतात, त्या वेळीं त्यांना त्या अल्प कालावधींत त्या अरण्यांत किती फरक पडलेला दिसला, हें खालील श्लोकांत वर्णिलें आहे–

१ मे. न. प्र., पृ. ६७.

पुरा यत्र स्रोतः पुलिनमधुना तत्र सरितां
विपर्यासं यातो घनविरलभावः क्षितिरुहाम् ।
बहोर्दृष्टं कालादपरमिव मन्ये वनमिदं
निवेशः शैलानां तदिदमिति बुद्धिं द्रढयति ।। (उत्तर., २, २७)

(जेथे पूर्वी नद्यांचा प्रवाह होता तेथे आता वाळवंट झालें आहे. झाडी दाट होती तेथे विरळ, आणि विरळ होती तेथे दाट झाली आहे. पुष्कळ दिवसांनी हें वन पाहिल्यामुळें तें निराळेंच दिसत आहे. सभोवारचे पर्वत पाहून मात्र हेंच पूर्वीचें दंडकारण्य अशी मनाची खात्री होत आहे.)

केवळ चौदा वर्षांच्या अल्प कालावधीनंतर दंडकारण्यांत–जेथे लोकवस्ती विशेष नव्हती तेथे–परिस्थितींत इतका फरक पडला, तर दीड हजार वर्षांनंतर सदैव लोकवस्ती असलेल्या रामटेकच्या व त्याच्या परिसराच्या परिस्थितींत पुष्कळच फरक पडला असल्यास आश्चर्य नाही. रामटेकची भौगोलिक स्थिति मात्र पूर्वीप्रमाणेंच आहे, हें मागें रामगिरि ते विदिशा या मेघमार्गाचें वर्णन करतांना दाखविलें आहे.

आतां वरील खुणांचा थोडक्यांत अनुक्रमाने विचार करू. (१) रामटेकावर अद्यापि जलाशय आहेत व सीतेची न्हाणीहि तेथील लोक दाखवतात. तेराव्या शतकांत रचलेल्या महानुभावांच्या स्थानपोथींत तर रामगडावरील सीतेच्या न्हाणीचा स्पष्ट उल्लेख आहे. (परिशिष्ट चौथें पाहा.) (२) ऋषींचे आश्रम आता असणें शक्य नाही. ते इतरत्रहि कोठे सध्या आढळत नाहीत. (३) 'उंच' हें विशेषण सापेक्ष आहे. कालिदासाने रामगिरीची उंची कोठेहि दिली नाही. तेव्हा रामटेक उंच नाही, असें म्हणतां येत नाही. विदिशेजवळच्या नीचैर्गिरीच्या (सध्याच्या उदयगिरि टेकडीच्या), तसेंच उज्जयिनी–दशपुर मार्गावरच्या देवगिरीच्या (सध्याच्या उज्जयिनीपासून २५ मैलांवरच्या देवडुंगरीच्या) मानाने रामटेकची टेकडी उंचच आहे. तिला तिच्या मानाने शिखरहि आहेच. (४) कालिदास केवळ भव्य

नदीपर्वतांचें वर्णन करतो, असें नाही. त्याने उज्जयिनीच्या आसपासच्या वननदी, निर्विन्ध्या, सिन्धु (माळव्यांतील काली सिंध), शिप्रा व गम्भीरा या छोटचा नद्यांचेंहि वर्णन तितक्याच रम्यतेने केलें आहे. याचें कारण त्या छोटचा असल्या तरी कालिदासाला फार प्रिय होत्या हेंच होय. (कै. शि. म. परांजपे यांचा साहित्यसंग्रह, पृ. ९६–९७ पाहा.) तसेंच रामगिरीचें वर्णन कालिदासाने केलें, याचें कारण तो हिमालय किंवा विंध्य यासारखा उत्तुंग होता म्हणून नव्हे, तर कालिदास वाकाटक राजधानींत कांही काळ राहिल्यामुळे तो पर्वत त्याला चिरपरिचित व प्रिय झाला होता, म्हणून होय. (५) 'रामगिरिस्वामिनः पादमूलात्' या प्रभावतीगुप्तेच्या ताम्रपटांतील व इतर उल्लेखांवरून रामटेकास श्रीरामचंद्राच्या पादुकांची पूजा होत असे, असें मागें दाखविलें आहे. (६) रामटेकला शिखर आहे आणि तेथे मेघ आला असता मेघदूतांतल्याप्रमाणें ('अद्रेः शृंगं वहति पवनः' इत्यादि) दृश्य दिसतें. शिवाय 'अद्रेः शृङ्गं हरति पवनः' इत्यादि वर्णनाला उंच सुळक्याची आवश्यकता नाही. त्या वर्णनाचा अर्थ असा– मेघ पर्वतावर लोंबला असतां तो त्या पर्वताच्या शिखरासारखा दिसतो. पण जोराचा वारा आला असतां तो तेथून दूर नेला जातो. हें दृश्य पाहत असताना सोसाटयाच्या वाऱ्याने पर्वताचें शिखरच वाहून नेलें जात आहे काय, असें भोळचा सिद्धांगनांना वाटतें. या वर्णनाला उंच निमुळतें शिखर असलेला पर्वत पाहिजे, असें नाही. किंबहुना, तसें शिखर असलेल्या पर्वताच्या बाबतींत भोळचा सिद्धांगनांनाहि अशी भ्रांति होणार नाही. कारण तें शिखर वाऱ्यांने वाहून नेलें जाणार नाही. (७) दीड हजार वर्षांनंतर रामटेकवर विशिष्ट झाडें दिसलीं पाहिजेत, असा आग्रह धरणें समंजसपणाचें होणार नाही. (८) रामटेकवर दाट झाडी आहे, इतकेंच नव्हे तर तींत अनेकदा वाघ दृष्टीस पडतात. (९) रामटेकजवळ अनेक शेतें आहेत. (१०) रामटेकहून प्रथम उत्तरेस गेलें असतां पठार (माल) लागतें. पुढें किंचित् पश्चिमेस जाऊन उत्तरेस गेल्यावर अमरवाडयाजवळ आम्रकूट, पुढे नर्मदा, नंतर विदिशा, पुढे पश्चिमेस (वांकडे) वळल्यावर उज्जयिनी, वगैरे मार्ग मेघदूतांतल्याप्रमाणेंच अलकेपर्यंत आहे. (११) नर्मदा नदीचें

दृश्य होशंगाबाद-नरसिंगपूर भागांत उन्हाळ्याच्या शेवटीं विन्ध्य पर्वताच्या पायथ्याशीं खडकाळ भागांत (उपलविषमे विन्ध्यपादे) अगदी असेंच दिसतें. (१२) 'तोयमादाय गच्छे:' (श्लो. २०) याचा अर्थ 'नर्मदा नदी न ओलांडतां तिचें पाणी पिऊन' असा होत नाही. नाही तर श्लोक १३ मध्ये 'क्षीण: क्षीण: परिलघु पय: स्रोतसां चोपयुज्य' असें म्हटलें आहे त्याचाहि अर्थ 'रामगिरि ते अलका या मार्गावरील बहुतेक सर्व नद्या न ओलांडतां त्यांच्या कांठाकांठाने जाऊन' असा करावा लागेल व तो हास्यास्पद होईल. (१३) हरिण व मोर दीड हजार वर्षांपूर्वी रामटेकच्या समंताद्भागीं नव्हते, असें मानण्यास आधार नाही. नदी टेकडीवरच असली पाहिजे असें नाही. कारण यक्षाला रामगिरिवर स्थानबद्ध करून ठेवलें नव्हतें. त्याने स्वखुशीने रामगिरीजवळच्या आश्रमांत वसती केली होती. रामटेकजवळ दोन नद्या (कलिपा व सुरनदी) वाहतात. त्या पूर्वी तशा वाहत नव्हत्या असें मानण्यास प्रमाण नाही. लक्ष्मणाच्या देवळांतील ख्रिस्तोत्तर तेराव्या शतकांतील शिलालेखांत त्यांचा निर्देश आहे. (१४) रामटेकवर लाल माती आहे. रामगडवरच्या पांढऱ्या मातीचा चित्रें काढण्याकरितां उपयोग होतो तर रामटेकवरील लाल मातीचाहि तसा उपयोग कां न व्हावा[१] ?

तथाकथित संशयास्पद खुणा

येथवर ज्या खुणा रामटेकवर नाहीत, असें परांजपे म्हणतात त्यांतील बहुतेक तेथे आजहि आहेत असें दाखविलें आहे. त्यांच्या मतें संशयास्पद असलेल्या खुणा तर अत्यंत हास्यास्पद आहेत--(१) रामटेकला प्रतिवर्षी नियमाने ५० इंचांपर्यंत पाऊस पडतो. हें ठिकाण मारवाडांत नाही; (२ व ३) त्याच्या पायथ्याशीं व आसपास खेडेगांवें आहेत. त्यांतील स्त्रिया खेडवळच आहेत. त्या अद्यापि सुशिक्षित विदुषी झाल्या नाहीत. (४) मेघदूतांत वर्णिल्याप्रमाणे त्याच्या पश्चिमोत्तर दिशेस सातपुड्याचें

१ परांजपे तिलकमाती म्हणतात ती पांढरी माती (white chalk) आहे; गेरू नव्हे. मे. न. प्र., पृ. १५२ पाहा.

शिखर लागतें. (५) सातपुड्यांत रानवणवे लागतात हें उन्हाळ्यांत नागपुर–इटारसी मार्गाने रेल्वेने प्रवास करणाऱ्यांस आगगाडींतूनहि दिसतें. (६) सातपुड्याच्या शिखरावर मेघ आला असतां तें शिखर स्तनाप्रमाणेंच दिसेल. (७) सातपुड्यांत कोरकू वगैरे जंगली लोकांची वसती अद्यापि आहे.

या आक्षेपांतील कित्येक बाबी इतक्या बालिश आहेत कीं त्यांना उत्तर देणेंहि आवश्यक नसावें. तथापि अजाण वाचकांचा त्यांच्याविषयी गैरसमज होण्याचा संभव असल्याने इतका विस्तार करावा लागला. असो.

आक्षेप दुसरा

रामचंद्र सीतेसह राहिले असे फक्त दोनच पर्वत इतिहासाला माहीत आहेत. एक चित्रकूट व दुसरा ऋष्यमूक. या दोहोंखेरीज तिसऱ्या कोणत्याहि पर्वतावर रामसीता यांनी वास्तव्य केल्याचें वर्णन रामायणांत अगर अन्यत्र कोठेहि नाही. मग रामटेकवर राम व सीता राहत होते, असा कालिदासाचा अर्थ कसा असूं शकेल? (मे. न. प्र., पृ. ३०–३१.)

वरील आक्षेपाचें उत्तर

ऋष्यमूक पर्वतावर रामचंद्र सीतेसह राहिले असें लिहितांना परांजप्यांस डुलकी लागलेली दिसते. कारण रामचंद्र सीताहरणानंतर कांही काळाने ऋष्यमूकास पोचले. त्यावेळीं सीतादेवी त्यांच्या बरोबर नव्हती. असो. रामचंद्र व सीता चित्रकूटाशिवाय इतर कोणत्याहि पर्वतावर राहिले नव्हते, असेंहि म्हणणें बरोबर नाही. दंडकारण्यांत असतांना राम, सीता व लक्ष्मण निरनिराळ्या ऋषींच्या आश्रमांत कोठे तीन महिने, कोठे चार महिने, कोठे आठ महिने, कोठे दहा महिने, कोठे वर्षभर, याप्रमाणें राहत राहत दहा वर्षे घालविते झाले, असें रामायणांत म्हटलें आहे (अरण्यकांड, ११, २३–२७ पाहा). रामायणांत या आश्रमांचीं स्थानें सांगितलीं नाहीत. रामगिरि (रामटेक) दंडकारण्यांतच असल्यामुळे रामचंद्र सीता व लक्ष्मण यांसह त्या पर्वताजवळच्या आश्रमांत राहिलेच नसतील, असें म्हणतां येत नाही.

वास्तविक रामायणाच्या साहाय्याने मेघदूतांत उल्लेखिलेल्या नदी–पर्वतादिकांचा शोध न करतां त्या काव्यांतील भौगोलिक उल्लेखांवरूनच तो केला पाहिजे. तसा शोध केल्यास रामटेक हाच रामगिरि सिद्ध होतो, हें मागे दाखविलें आहेच.

आक्षेप तिसरा

रामगिरीचें पूर्वीचें नांव शैवलगिरि होतें व तेथे शंबूक तप करीत होता, याला पुरावा नाही. वाल्मीकिरामायणाच्या उत्तरकांडांत शम्बूक शैवल पर्वतावर तपश्चर्या करीत होता, असें म्हटलें आहे खरें, पण तें कांड प्रक्षिप्त मानलें जातें. लक्ष्मणाच्या देवळांतील शिलालेखांत

श्रीरामचन्द्रस्य करेण चन्द्रहासाद् हतः प्राप्य पदं मुरारेः ।
स शम्बुकः शूद्रमुनिर्महीध्रराजेऽत्र धूम्राक्ष इति प्रसिद्धः ।।

हा श्लोक आला आहे खरा, पण त्यांत 'येथे त्याला मारलें' असा उल्लेख नाही. तसेंच तो तप करीत होता आणि तें येथे करीत होता असेंहि नाही. (मे. न. प्र , पृ. ४३.)

वरील आक्षेपाचें उत्तर

रामटेकचें प्राचीन नांव शैवल पर्वत असो वा नसो. त्याने रामटेक म्हणजे रामगिरि, या आमच्या सिद्धांताला बाध येत नाही. कारण मेघदूतांतील रामगिरीचें वर्णन रामटेकला लागू पडतें आणि लक्ष्मणाच्या देवळांतील शिलालेखांत त्याला 'रामस्य गिरिः' असें स्पष्ट म्हटलें आहे, हें आम्ही मागें दाखविलें आहे.

उत्तरकांड रामायणाला नंतर जोडलें असलें तरी तें खचित कालिदास-पूर्वकालीन आहे. रघुवंशाच्या चौदाव्या व पंधराव्या सर्गांतील रामकथा

उत्तरकांडानुसारी आहे, त्यावरून हें सिद्ध होतें.[१] रामदेवराव यादवाच्या काळीं तरी रामटेकावरच शंबूक तपश्चर्या करीत होता आणि तेथेंच रामाने त्याचा शिरच्छेद केला अशी समजूत प्रचलित होती. 'श्रीरामचंद्रस्य करेण चंद्रहासाद् हतः प्राप्य पदं मुरारेः। स शंबुकः शूद्रमुनिर्महीध्रराजेऽत्र धूम्राक्ष इति प्रसिद्धः ॥' या श्लोकाचा अर्थच परांजप्यांना कळलेला दिसत नाही. शम्बूक रामगिरीवर तपश्चर्या करीत नसता व तेथे त्याचा शिरच्छेद झाला नसता तर त्याचा उल्लेख त्या लेखांत येण्याचें कारण नव्हतें.

येथवर परांजप्यांनी रामटेक हाच रामगिरि या आमच्या मतावर घेतलेले आक्षेप कसे बिनबुडाचे आहेत, हें दाखविलें. मेघदूतांतील मेघमार्गाच्या वर्णनावरून, प्रभावतीगुप्तेच्या ताम्रपटांतील उल्लेखावरून, लक्ष्मणाच्या देवळांतील लेखांत रामगिरीच्या स्पष्ट निर्देशावरून, तसेंच कालिदासविषयक जी माहिती अद्ययावत् संशोधनाने उपलब्ध झाली आहे तिजवरून नागपूरजवळचें रामटेक हाच मेघदूतांत वर्णिलेला रामगिरि होय, याविषयीं मुळीच संशय राहत नाही.

---

१ कालिदास बारीक सारीक बाबतींतहि उत्तरकांडास अनुसरतो हें दाखवितां येतें. सीतेविषयी लोकापवाद ज्या हेराने सांगितला त्याचें नांव 'भद्र' असें उत्तरकांडांत आलें आहे. (उत्तर., ४३,४ पाहा.) तेंच नांव कालिदासाने रघु. १४, ३१ मध्ये दिलें आहे. भवभूति मात्र तें 'दुर्मुख' असें देतो. उत्तरकांड इतर कांडांच्या मानाने नंतरचें असलें तरी तें कालिदास-पूर्वकालीन खास आहे.

प्रकरण तिसरें

रामगिरिविषयक अन्यमतांचें परीक्षण

मागील प्रकरणांत विविध प्रमाणांनीं नागपूरजवळचें रामटेक हाच प्राचीन रामगिरि हें सिद्ध केलें. आता तद्विषयक अन्य मतांचें परीक्षण करूं.

मत पहिलें

चित्रकूट हा रामगिरि

प्रथम आपण आपल्या प्राचीन टीकाकारांचें काय म्हणणें आहे, तें पाहूं. मेघदूताचा सर्वांत प्राचीन टीकाकार वल्लभदेव हा इ. स. च्या दहाव्या शतकानंतर होऊन गेला. याने मेघदूताच्या पहिल्या श्लोकावरच्या आपल्या टीकेंत म्हटलें आहे कीं, 'रामगिरिरत्र चित्रकूटः न तु ऋष्यमूकः । तत्र सीताया वासाभावात् ।' म्हणजे रामगिरि हा चित्रकूट होय तो ऋष्यमूक असणें शक्य नाही. कारण त्या ठिकाणीं सीतेचा वास झाला नव्हता. वल्लभदेवाचा जवळ जवळ समकालीन असलेल्या स्थिरदेव नामक टीकाकाराने 'रामगिरिर्दण्डकान्तः प्रसिद्धः' (रामगिरि हा दण्डकारण्यांतील प्रसिद्ध पर्वत आहे) असें म्हणून त्याचें स्थान निश्चितपणें सांगितलें नाही. त्यानंतरच्या दक्षिणावर्तनाथाने निचुल, दिङ्नाग यांच्याविषयी दन्तकथा सविस्तरपणें दिल्या असल्या, तरी रामगिरीच्या स्थानाविषयी मूग गिळले आहेत. दक्षिणावर्तनाथानंतरचा सुप्रसिद्ध टीकाकार मल्लिनाथ याने रामगिरि म्हणजे चित्रकूट या वल्लभदेवाच्या मताचीच री ओढली आहे. या नंतरच्या विद्युल्लताहि टीकांच्या कर्त्यांनी प्रायः मल्लिनाथाच्या विधानाचाच अनुवाद केला आहे. तेव्हा बहुधा सर्व संस्कृत टीकाकारांना रामगिरि म्हणजे चित्रकूट हें मत मान्य होतें, असें दिसतें. त्यांना असें वाटणें साहजिकहि आहे. कारण सबंध रामायणांत रामगिरीचा कोठेच उल्लेख आला नाही. मेघदूतांतील वर्णनावरून या गिरीवर श्रीरामचंद्र सीतेसह कांही काळ राहत होते अशी कालिदासकाळीं परंपरागत समजूत होती, असें दिसतें.

रामायणांत मुख्यतः दोनच पर्वतांवर श्रीरामचंद्रांचें कांही काळ वास्तव्य होतें असें वर्णिलें आहे. भरद्वाजाश्रमांतून निघाल्यावर रामचंद्र चित्रकूट पर्वतावर सीता व लक्ष्मण यांच्यासह कांही काळ राहिले, असें अरण्यकांड, सर्ग ५६ मध्ये म्हटलें आहे. पुढे दंडकारण्यांतून रावणाने सीताहरण केल्या-वर तिच्या शोधार्थ रामचंद्र ऋष्यमूक पर्वतावर आले. तेथे त्यांचें हनुमान् व सुग्रीव यांच्याशी सख्य जमून त्या ठिकाणीं त्यांनी कांही काळ वास केला, असें किष्किंधाकांडांत वाल्मीकीने वर्णिलें आहे. या वेळीं सीतादेवी जवळ नसल्याने 'जनकतनयास्नानपुण्योदकेषु' इत्यादि मेघदूतांतील वर्णन ऋष्यमूक पर्वतास जमत नाही, हें उघड आहे. तेव्हा चित्रकूट हाच रामगिरि असें टीकाकारांस वाटलें, तर त्यांत आश्चर्य नाही.

वरील मताचें परीक्षण

तथापि हें मत बरोबर असणें शक्य नाही, हें थोडचा विचाराअंतीं स्पष्ट होईल. भरद्वाजाश्रम प्रयागला होता. तेथे आल्यावर रामचंद्रांनी भरद्वाज ऋषीला प्रार्थना केली की, 'भगवन्, आम्हाला भेटूं इच्छिणारे लोक येथे येऊं लागतील. म्हणून या आश्रमांत राहणें मला प्रशस्त वाटत नाही. तेव्हा एकान्त असें एखादें आश्रमस्थान आम्हांस सांगा.' त्यावर भरद्वाज ऋषि म्हणाले, 'रामा, येथून दहा कोसांवर महर्षींनी सेविलेला चित्रकूट नामक पर्वत आहे तें एकान्तस्थान असल्यामुळें तेथे तूं आपल्या वनवासाचा काळ घालवावा.' त्यानंतर त्या संगमापासून निघून यमुना नदीच्या कांठाने रामचंद्र सीता व लक्ष्मण यांसह कांही अंतर गेले आणि नंतर ती नदी पार करून ते पुढे चित्रकूट पर्वताला पोचले. हा चित्रकूट बांदा जिल्ह्यांतील कामताजवळचा तन्नामक पर्वत होय. प्रयागच्या नैर्ऋत्येस मध्य रेल्वेच्या बांदा–माणिकपूर फाट्यावर चित्रकूट स्टेशन लागतें. त्याच्या-पासून चार मैलांवर हा पर्वत आहे. पुण्यस्थान म्हणून अद्यापि याची प्रसिद्धि आहे. येथे राम, सीता व लक्ष्मण यांच्या पादुकाहि दाखवितात. हें स्थान प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे यांत संशय नाही. तथापि हा चित्रकूट रामगिरि असणें शक्य नाही; कारण रामगिरीहून उत्तरेस

जातांना लागणारी नर्मदा, विदिशा, उज्जयिनी इत्यादि नद्या व नगरें या चित्रकूटाच्या दक्षिणेस आहेत, उत्तरेस नाहीत. तेव्हा रामगिरि म्हणजे चित्रकूट हें म्हणणें बरोबर नाही.

मत दुसरें

जयपूर संस्थानांतील रामगिरि हा मेघदूतांतील रामगिरि

नागपूरचे कै. शिवदासपंत बारलिंगे यांनी कांही वर्षांपूर्वी जयपूर संस्थानांतील २६१७ फूट उंचीचा रामगिरि नामक पर्वत मेघदूतांत वर्णिलेला रामगिरि होय, असें मोठ्या आग्रहाने प्रतिपादिलें होतें. हा पर्वत जगदलपूरचे खाली केवळ १६ मैलांवर आहे. ह्या पर्वताला शृंग असल्यामुळे 'अद्रेः शृंगं हरति पवनः' इत्यादि वर्णन याला ठीक जुळतें. या रामगिरीहून उत्तरेस जातांना 'क्षेत्रमारुह्य मालम्' असें वर्णिलेलें बस्तरचें पठार लागतें. नंतर थोडेसें पश्चिमेस गेल्यावर मेघाची व आम्रकूट पर्वताची (अमरकंटकाची) भेट होते. निचुल म्हणजे वेत हे अजून बस्तरांतच होतात, रामटेकास होत नाहीत. तेव्हा जयपुर संस्थानांतील रामगिरि हाच मेघदूतांतील रामगिरि होय, असें कै. शिवदासपंत बारलिंगे यांचें म्हणणें होतें.[1]

वरील मताचें परीक्षण

श्री. बारलिंगे यांचें हें मत बरोबर नाही, हें मी त्यांच्या हयातींत त्यांस सविस्तर दाखवून दिलें होतें. (तरुण भारत, नागपूर, या वृत्तपत्राचा ता. २० नोव्हेंबर १९४८ चा अंक पाहा.) रामगिरि पर्वताची उंची कालिदासाने कोठेहि दिली नाही. त्यामुळे केवळ उंचीवरून अमुक पर्वत रामगिरि असावा किंवा असणें शक्य नाही, असें म्हणता येत नाही. शिवाय कालिदासाने मेघदूतांत केवळ उंच पर्वतांचेंच वर्णन केलें आहे असें नाही. विदिशेजवळचा नीचैर्गिरि आणि उज्जयिनीपासून सुमारें पंचवीस मैलांवर

१ हें मत त्यांनी नागपूरच्या 'इन्किलाब' नामक वृत्तपत्राच्या सप्टेंबर व ऑक्टोबर १९४८ च्या अंकांत मांडलें होतें.

असलेला देवगिरि हे पर्वत रामटेकपेक्षाहि ठेंगणे आहेत. तरीहि त्यांचें वर्णन कालिदासाने केलें आहे. 'अद्रेः शृंगं हरति पवनः' (श्लो. १४) इत्यादि श्लोकांतील कल्पना श्री. बारलिंगे यांच्या लक्षांत आलेली दिसत नाही. त्या श्लोकाचा खरा अर्थ मागें दिला आहे तो पाहा.[१]

रामटेकला निचुल म्हणजे वेत होत नाहीत, या टीकेंत कांही अर्थ नाही. कालिदासाने रामगिरीचें वर्णन केलें त्या कालाला आज दीड हजार वर्षें होऊन गेलीं. इतक्या दीर्घ कालावधीनंतर तीच परिस्थिति आताहि असली पाहिजे असा आग्रह धरणें समंजसपणाचें होणार नाही. शिवाय हें वर्णन जयपूर संस्थानांतल्या रामगिरीला लागू पडतें असें श्री. बारलिंगे सांगत नाहीत. बस्तर संस्थानांत वेत होतात इतकेंच ते म्हणतात. त्यांचा रामगिरि बस्तरपासून १६ मैलांवर आहे. त्या पर्वतावर वेत विपुल होतात असा पुरावा ते पुढे मांडीपर्यंत या त्यांच्या कसोटींत कांही 'राम' राहत नाही.

जयपूर संस्थानांतील रामगिरि सर्व्हे ऑफ इंडियाच्या विस्तृत नकाशांत शोधूनहि आम्हांस सांपडला नाही. छत्तीसगडांतील संस्थानांच्या गॅझेटीयरमध्येहि त्याचा नामोल्लेख नाही. तेव्हा त्या पर्वताचें अस्तित्वच संशयास्पद आहे. शिवाय तेथून उत्तरेस जाताना मेघाला आम्रकूट पर्वत लागणार नाही. आम्रकूट म्हणजे अमरकंटक नव्हे, हें मागें सविस्तर दाखविलें आहे. त्याची पुनरुक्ति करीत नाही. शिवाय, मागे दिलेल्या मेघदूतांतील वर्णनावरून आम्रकूटाच्या उत्तरेस बरेंच दूर गेल्यावर मेघाला नर्मदा नदी लागणार होती. हें वर्णनहि अमरकंटकच्या विरुद्ध जातें. अमरकंटकहून उत्तरेस जातांना विदिशा लागत नाही, हीहि मोठीच अडचण आहे. तसेंच हा रामगिरि यक्षाचें निवासस्थान म्हणून कालिदासाने कां निवडला याचें कारणहि श्री. बारलिंगे यांनी सांगितलें नाही. या सर्व कारणास्तव त्यांचे एतद्विषयक मत स्वीकारतां येत नाही.

---

१ मागे, पृष्ठ ४१ पाहा.

मत तिसरें

सरगुजा संस्थानांतील रामगड हा रामगिरि

अलीकडे पुण्याचे श्री. वा. कृ. परांजपे यांनी पूर्वीच्या सरगुजा संस्थानांतील रामगड हाच रामगिरि असें मोठ्या आवेशाने प्रतिपादिलें आहे.[१] त्यांचीं प्रमाणें येणे प्रमाणे--

रामगड हा उंच शिखरांनी मंडित असा एक भव्य व उत्तुंग पर्वत आहे. त्याची एकूण उंची ३२०२ फूट आहे. माथ्यावर या पर्वताच्या पोटांत एक विस्तीर्ण आणि लांबच लांब गुहा आहे. तिला हाथीफोड म्हणतात. याच गुहेंत हनुमान् वगैरे वानरवीर सीताशोधार्थ आले होते, असें रामायणांतील खालील श्लोकांत वर्णिलें आहे.

दुर्गं ऋक्षबिलं नाम दानवेनाभिरक्षितम् ।
अवकीर्णं लतावृक्षैर्ददृशुस्ते महाबिलम् ।। (किष्किंधा, ५०, ८)

यावरून या स्थळीं किंवा याचे आसपास राम व सीता पूर्वी राहत असावेत. पूर्वीच्या वास्तव्यस्थळीं शोध करणें ही गोष्ट स्वाभाविक व अनुभवसिद्ध आहे. या विवराला ऋक्षबिल म्हटलें आहे. हाच चित्रकूट पर्वत. कालिदासाने चित्रकूट पर्वत ऋक्षपर्वताच्या परिसरांत होता, असें खालील श्लोकांत सांगितलें आहे

रामस्त्वासन्नदेशत्वात् भरतागमनं पुनः ।
आशंक्योत्सुकसारंगां चित्रकूटस्थलीं जहौ ।।
प्रययावातिथेयेषु वसन् ऋषिकुलेषु सः ।
दक्षिणां दिशमृक्षेषु वार्षिकेष्विव भास्करः ।।
(रघु., १२, २४–२५.)

या रामगडाच्या उंच माथ्यावर तीन मोठाल्या राहण्यासारख्या गुहा राम, लक्ष्मण व सीता यांच्या आहेत. त्याच्या पठारावर एक झरा वाहत

---

१ मेघदूतावर नवा प्रकाश, पृ. ६९–१०५.

आहे. त्यांत राम, लक्ष्मण व सीता यांनी वनवासांत असतांना स्नान केलें, अशी आख्यायिका आहे. चित्रकूटावर अनेक ऋषींचे आश्रम होते, असें रामायणांत म्हटलें आहे. चित्रकूट म्हणजे रामगडच. म्हणून येथे ऋषि-मुनींचे आश्रम होते. येथे एका भिंतीवर दोन पावलांच्या खुणा आहेत. तीं पावलें रामाचीं आहेत, असें म्हणतात. प्रभावतीगुप्तेच्या ताम्रपटांत उल्लेखिलेल्या रामगिरिस्वामीच्या पादुका याच असाव्या. येथे प्रतिवर्षी जलवृष्टि होते. जवळपास असंस्कृत रानटी लोक आहेत. याच्या पश्चिमेला विस्तीर्ण पठार आहे. कालिदासाने खालील श्लोकांत मेघाला उदङ्मुख होऊन तेथे जावयास सांगितलें आहे–

स्थानादस्मात्सरसनिचुलादुत्पतोदङ्मुखः खं
दिङ्नागानां पथि परिहरन् स्थूलहस्तावलेपान् ।।

या श्लोकांतील 'उदङ्मुखः' याचा अर्थ कित्येक टीकाकार 'उत्तरेच्या दिशेने जा' असा करतात. पण तो बरोबर बसत नाही. उदङ्मुख याचा अर्थ 'उत्तरेकडे तोंड वळवून म्हणजे रोख ठेवून म्हणजे अखेर उत्तरेस जावयाचें आहे, हें ध्यानीं धरून उड्डाण कर' एवढाच आहे. मालक्षेत्र रामगिरीच्या पश्चिमेकडेच असणें अधिक संभवनीय आहे. कारण पुढच्याच श्लोकांत कालिदास मेघास 'किंचित्पश्चाद्व्रज लघुगतिर्भूय एवोत्तरेण ।' असें पश्चिमेस जाण्यास सांगत आहे. पश्चिमेस जावयाचें असतांना आधी उत्तर, लगेच बदलून पुन्हा पश्चिम, आणि नंतर पुन्हा उत्तर, इतका द्राविडी प्राणायाम आणि आडवळशाचा मार्ग कशाला ? रामगड हा अमरकंटक व नर्मदा यांच्या पूर्वेला पण जरा वर १८ अंशावर आहे. तेव्हा रामगडावरून निघणाऱ्या मेघाला अमरकंटकवरून नर्मदेच्या स्फुटित प्रवाहांवरून जावयाचें आहे; म्हणजे पश्चिमेलाच पण किंचित् मागे यावें लागतें. येथे 'किंचित् पश्चात् व्रज' हा शब्दप्रयोग वापरून कांहीसे पश्चिमेला व थोडेसे मागे असे दोन्ही अर्थ दाखविणारा खुबीदार व बहारीचा श्लेष कालिदासाने बुद्धिपुरःसर योजिला आहे. पुढे नर्मदा नदीचें वर्णन येणेप्रमाणे केलें आहेः–

रेवां द्रक्ष्यस्युपलविषमे विन्ध्यपादे विशीर्णां
भक्तिच्छेदैरिव विरचितां भूतिमंगे गजस्य ।। (मेघ. १९)

अमरकंटकजवळ उगमाच्या आसपास नर्मदा स्फुटितप्रवाहा आहे. तेथे आसपासच्या डोंगरांतून तिला शेंकडो ओहोळ, प्रवाह–उपप्रवाह येऊन मिळतात. नकाशांत सुद्धा या प्रवाहांचें जाळें किती मजेदार व स्पष्ट दिसतें तें पहावें, म्हणजे वाचकांना कालिदासाच्या उपमेंतील सौंदर्य व समर्पकता यांची प्रचीति येईल. पुढे २० व्या श्लोकांत

तस्यास्तिक्तैर्वनगजमदैर्वासितं वान्तवृष्टि–
र्जम्बूकुञ्जप्रतिहतरयं तोयमादाय गच्छेः । (मेघ. २०)

'नर्मदेचें पाणी पिऊन किंवा शोषून पुढे जा' असा उल्लेख आहे. या ठिकाणीं 'नर्मदा ओलांड' अथवा 'उत्तीर्य' इत्यादि अर्थाचा शब्द न घालतां 'गच्छेः' असा प्रयोग कवीने केला आहे. त्यामुळे नर्मदा नदी ओलांडावयाची नसून तिच्या कांठाकांठाने जावयाचें आहे, असा हेतु ध्वनित होतो. त्याचा फलितार्थ असा कीं मेघाचा मार्ग दक्षिणोत्तर नसून पूर्वपश्चिम होता. रामगडावर धातुराग आहेत.

या मताचें परीक्षण

सरगुजा संस्थानांतील रामगड पर्वत अत्यंत उंच आहे व तें स्थान अत्यंत प्राचीन आहे यांत संशय नाही.[१] पण तेथील लेण्यांतील लेखांत रामसीतांच्या पवित्र जीवनाचा निर्देश नसून एक देवदासी आणि तिचा प्रियकर यांच्या प्रणयप्रसंगाचा उल्लेख आहे.[२] दुसऱ्या एका लेखांत कवि-

---

१ या रामगडाची उंची मात्र श्री. परांजपे म्हणतात त्याप्रमाणें ३२०० फूट नसून पुष्कळच कमी आहे. 'जमिनीपासून त्याची तळची बैठक अंदाजे २५०० फूटापर्यंत आहे' असें ते म्हणतात (मे. न. प्र., पृ. ६९); पण तिची खरी उंची सर्व्हे ऑफ इंडियाच्या मोजमापाप्रमाणें केवळ १२०६ फूट आहे, म्हणजे परांजपे म्हणतात त्याच्या निम्म्यापेक्षा कमी आहे !

२ बंगाल एशियाटिक सोसायटीचें जर्नल, पु. १७, पृ. ६६ इ. आणि पु. ३४, भाग २, पृ. २३ इ.; इंडियन अँटिक्वरी, पु. ३४, पृ. १९७ इ.; आणि पु. ४८, पृ. १३१ पाहा.

जनांचा श्रोतृवर्गाच्या मनावरील परिणाम वर्णिला आहे.[१] तेव्हा हें स्थान ख्रिस्तपूर्व काळांत यात्रेचें ठिकाण नसून कवींच्या मैफिलीचें व देवदासींच्या प्रणयप्रसंगांचें संकेतस्थान होतें, असें दिसतें. नंतरच्या काळांत तेथे कोणी तरी पावलें कोरलीं आणि तीं भगवान् रामचंद्राचीं मानण्यांत येऊं लागलीं. तसेंच तेथे कांही मूर्ति बसविल्या गेल्या. त्या राम, लक्ष्मण व सीता यांच्या मानण्यांत येतात; पण खरोखर त्या त्यांच्या नाहीत.[२] तेथील झऱ्यांत राम, लक्ष्मण व सीता यांनी स्नान केलें अशी आख्यायिका प्रचलित झाली आहे, असें दिसतें. तथापि ही आख्यायिका कालिदासकालाइतकी प्राचीन

---

१ मोठ्या लेण्यांतील खालील कोरीव लेख पाहा–

आदीपयंति हृदयं सभावगरुकवयो । (आदीपर्यान्त हृदयं स्वभाव-गुरुकवयः ।)

२ मेघदूतावरील नवा प्रकाश, पृ. १६२ वर या मूर्तींचे फोटो पाहा. या मूर्ति अनुक्रमें सीता, राम व लक्ष्मण यांच्या आहेत असें परांजपे सांगतात. सीतेची मूर्ति रामाच्या उजव्या बाजूस आहे, हें ते या मूर्तींच्या प्राचीनत्वाचें गमक मानतात. मूर्तींना वस्त्रें नेसविलीं असल्याने त्या ओळखणें कठीण जातें. नागपूर म्यूझियमचे क्यूरेटर डॉ. पटवर्धन व व असिस्टंट क्यूरेटर श्री. रोडे यांनी वस्त्ररहित मूळ मूर्तींचे फोटो घेतलेले मला दाखविले. त्यांवरून मधली मूर्ति बलरामाची आहे हें स्पष्ट दिसलें. त्या मूर्तीच्या डोक्यावर नागाच्या फणा, उजव्या हातांत नांगर आणि डाव्या हातांत मुसळ आहे; त्यांवरून ती बलरामाची यांत संशय नाही. त्याच्या उजव्या हातास एका स्त्रीची मूर्ति आहे. तिच्या उजव्या हातांत वर्तुलाकृति दोरी (पाश) आणि डाव्या हातांत कमंडलु आहे. ही रेवतीची मूर्ति असावी. वैखानसागमांत बलरामाच्या उजव्या बाजूस रेवतीची मूर्ति असावी (दक्षिणेन रेवतीम्), असें म्हटलें आहे. बलरामाच्या डाव्या बाजूस राम, सीता व हनुमान् यांच्या मूर्ति असलेला शिल्पपट्ट आहे. या मूर्तींवरून श्री. परांजपे यांनी काढलेलीं सर्व अनुमानें फोल ठरत आहेत. या मूर्ति उत्तर मध्ययुगीन कालांतील दिसतात. त्या फार प्राचीन नाहीत.

आहे, असें मानण्यास मुळीच आधार नाही.[१] रामगड हाच चित्रकूट या अजब सिद्धांताचें परीक्षण आम्ही पुढे करणार आहों. चित्रकूट प्रयागापासून फार दूर नव्हता हें पुढे दाखविलें आहे. तेव्हा तो रामगड असणें शक्य नाही.

रामगड हा वाकाटकांच्या ताम्रपटांतील रामगिरि नव्हे

प्रभावतीगुप्तेच्या ताम्रपटांतील 'रामगिरिस्वामिनः पादमूलात्' या स्थलनिर्देशांत रामगडचा उल्लेख असावा, असें अनुमान परांजप्यांनी केलें आहे, तेंहि सर्वस्वी चूक आहे. 'वाकाटकांचे कांही ताम्रपट बालाघाट व भंडारा जिल्ह्यांत सांपडले आहेत. या जिल्ह्यांचा अंतर्भाव प्राचीन विदर्भांत होत असे' असें आम्ही आपल्या लेखांत म्हटलें होतें. त्यावर परांजपे म्हणतात कीं, 'बालाघाट व भंडारा जिल्ह्यांच्या पूर्व सीमेला लागूनच रामगड पर्वत उभा आहे.' (मे. न. प्र., पृ. ३८.) हें विधान कसें हास्यास्पद आहे हें वऱ्हाड–मध्यप्रदेशांतील एखादें शाळकरी पोरहि परांजप्यांस सांगू शकेल. बालाघाट–भंडारा आणि पूर्वीच्या सरगुजा संस्थानांतील रामगड यांच्या मध्ये कवर्धा, खैरागड व नांदगांव ही संस्थानें आणि दुर्ग, रायपुर आणि बिलासपुर असे मध्यप्रदेशाचे तीन जिल्हे आहेत. रामगड हा प्रभावतीगुप्तेच्या ताम्रपटांतील रामगिरि होणें शक्य नाही, ही गोष्ट सूर्य-प्रकाशाइतकी स्पष्ट आहे. वाकाटकांचें राज्य रामगडपर्यंत पसरलें होतें, याला पुरावा नाही. आणि प्रभावतीगुप्ता तेथे गेली होती असें मानण्यास यत्किंचित्हि आधार नाही. या उदाहरणावरून परांजपे आपल्या डळमळणाऱ्या रामगडला सावरण्याकरिता कसा 'येन केन प्रकारेण' प्रयत्न करीत आहेत, तें दिसून येईल.

---

१ भंडारा व बालाघाट हे जिल्हे वाकाटकांच्या राज्यांतले अगदी पूर्वेचे जिल्हे होते. सरगुजा संस्थान दक्षिण कोसलांत मोडत असे. बालाघाट–भंडारा जिल्ह्यांच्या पूर्वसीमेपासून रामगडचें सरळ रेषेंत अंतर १२५ मैलांपेक्षा कमी नाही. रस्त्यांच्या आडवळणांमुळें तें दीडशें मैलांहूनहि जास्त भरेल.

रामगिरीच्या शोधाची अविवाद्य कसोटी

रामगड पर्वत उंच आहे. तेथे नदी आहे, तींत रामसीतांनी स्नान केलें अशी आख्यायिका आहे, तेथे सध्या भिंतीवर दोन पावलें कोरलीं आहेत, तें स्थान निसर्गम्य आहे, या सर्व गोष्टी खऱ्या असल्या तरी रामगड म्हणजे रामगिरि हें सिद्ध करण्यास त्या पुरेशा नाहीत. भारतांत रामकथेशी संबद्ध अशीं अनेक ठिकाणें आहेत व त्यांतील कांही उत्तुंग पर्वतावर असून तेथे रामगडविषयी आहेत तशा आख्यायिका प्रचलित आहेत. उदाहरणार्थ, 'पूर्वीच्या जयपूर संस्थानांत जगदलपूरच्या दक्षिणेस सोळा मैलांवर २६१७ फूट उंच असणारा रामगिरि नामक पर्वत अस्तित्वांत आहे. तें स्थान निसर्गरमणीय आहे. तेथे निचुल म्हणजे वेत उगवतात. तेथून उत्तरेकडे गेले असता हल्लीहि रानटी असलेले माड लोक राहतात. हा माडप्रदेश म्हणजे कालिदासाचा मालप्रदेश होय. म्हणून जयपूर संस्थानांतील रामगिरि हाच मेघदूतांतील रामगिरि होय' असें श्री. बारलिंगे यांनी कांही वर्षांपूर्वी मोठ्या आग्रहाने प्रतिपादिलें होतें, हें मागें सांगितलें आहे. तेव्हा रामगिरित्वाचा मान मिळविण्यासाठी उत्सुक असे अनेक पर्वत उभे राहिले आहेत. त्यांतून मेघदूतांतील रामगिरीची निवड करावयाची असेल तर तिच्याकरितां एकच कसोटी अविवाद्य अशी ठरेल. ती म्हणजे कालिदासाने स्वतः मेघदूतांत वर्णिलेला मेघमार्ग त्या पर्वताला तंतोतंत जुळला पाहिजे. कालिदासाचें भौगोलिक वर्णन अत्यंत सूक्ष्म व यथातथ्य असतें, अशी ख्याति आहे. 'कालिदासाची कविता किंवा कल्पकता वास्तवतेशी काडीइतकीहि काडीमोड करत नाही. त्याच्या कल्पनेचा नाच सत्याभोवती असतो हें त्याचें वैशिष्टच' हें श्री. परांजपेहि म्हणतात. (मे. न. प्र., पृ. १०१.) तेव्हा ही भौगोलिक कसोटी त्यांनाहि मान्य होईल अशी आहे. ही कसोटी मेघदूतांतील वर्णनाला लावतांना संस्कृत शब्दांचे अर्थ ओढाताणीने करतां कामा नये. तसेंच आपल्या कल्पना कालिदासावर लादण्याचा प्रयत्न करूं नये. केवळ वस्तुनिष्ठ दृष्टीने त्याच्या मेघमार्गाच्या वर्णनाचा विचार केला पाहिजे. तसा विचार केला असतां मेघमार्गाचें वर्णन विदर्भांतील रामटेकला

पूर्णपणें जुळतें, हें मागें दुसऱ्या प्रकरणांत दाखविलें आहे. तें परांजप्यांच्या रामगडला कितपत जुळतें तें आता पाहूं.

मेघाने शकुनाकरितां उदङ्मुख व्हावयाचें नाही

तेराव्या श्लोकांत 'मार्गं मत्तः शृणु कथयतस्त्वत्प्रयाणानुरूपम्' (तुझ्या प्रयाणाला योग्य असा मार्ग मी सांगतो तो ऐक) अशी प्रस्तावना करून यक्षाने मेघास अलकेचा मार्ग सांगण्यास सुरवात केली. रामगिरीविषयी कोणतेंहि मत घेतलें तरी अलका त्या स्थानाच्या उत्तरेसच राहतें. तेव्हा यक्ष मेघाला उत्तरेस जाण्याचाच मार्ग सांगेल हें उघड आहे. आणि पुढील (१४ व्या) श्लोकांत तसेंच म्हटलें आहे—

स्थानादस्मात्सरसनिचुलादुत्पतोदङ्मुखः खं
दिङ्नागानां पथि परिहरन्स्थूलहस्तावलेपान् ॥

या श्लोकांत यक्षाने मेघाला उदङ्मुख होऊन (उत्तरेकडे तोंड करून) उड्डाण करण्यास सांगितलें आहे. मल्लिनाथादि टीकाकारांनी हाच अर्थ घेतला आहे. मल्लिनाथ म्हणतो— उदङ्मुखः सन् । अलकाया उदीच्यत्वादित्याशयः । (उत्तरेकडे तोंड करून, अलकानगरी उत्तरेस आहे म्हणून, हा कवीचा आशय). मेघदूताच्या आधुनिक सर्व टिप्पणीकारांनी हाच अर्थ स्वीकारला आहे. पण 'उदङ्मुखः उत्पत' याचा अर्थ 'उत्तरेकडे उड्डाण कर' असा केल्यास तो 'रामगड हाच रामगिरि' या मताला जुळणार नाही. कारण परांजप्यांच्या मताप्रमाणें सोळाव्या श्लोकांत वर्णिलेलें मालक्षेत्र रामगडच्या उत्तरेस नसून पश्चिमेस आहे. म्हणून ते म्हणतात, 'उदङ्मुखः या शब्दयोगाने फसून जाता कामा नये. उदङ्मुख म्हणजे 'उत्तरेकडे तोंड वळवून म्हणजे रोख ठेवून म्हणजे अखेर उत्तरेला जावयाचें आहे हें ध्यानी धरून उड्डाण कर' एवढाच अर्थ आहे. उदङ्म्हणजे उत्तर या शब्दाची व्याप्ति अखेरच्या मुक्कामाची दिशा स्पष्ट करण्यापुरतीच मर्यादित आहे.' (पृ. ८४). याला म्हणतात खरी मल्लिनाथी! असा अर्थ केला म्हणजे मेघाने उत्तरेला तोंड करून पश्चिमेला जावें, असा अर्थ या श्लोकांतून

निघेल ! आहे कीं नाही वकीली डावपेंच ? हा अर्थ ओढाताणीचा होतो ही कल्पना त्यांच्या मनाला खात असावी. म्हणून ते अन्यत्र म्हणतात– 'प्राचीन काळीं आर्य लोक उत्तर दिशा शुभ समजत असत ·· म्हणून मेघाच्या प्रस्थानसमयीं–अगदीं ऐन निघण्याच्या वेळीं–प्रयाणमांगल्याकरितां यक्षाने 'उदङ्मुखः उत्पत' असें मेघाला सांगितलें असलें पाहिजे.' (पृ. ८७). ही कल्पनाहि निरर्थक आहे. कालिदासाला हा अर्थ विवक्षित असता तर 'शकुनाकरिता उत्तरेकडे तोंड करून नंतर पश्चिमेकडे जा' असें त्याने मेघाला सांगितलें असतें. तसें सांगण्याइतकें भाषाप्रभुत्व त्याच्या अंगीं खास होतें. पण तसा स्पष्ट वा अस्पष्ट निर्देश या श्लोकांत मुळीच नाही. मेघदूतांतील श्लोकांचे अर्थ स्वतःच्या मतास उपोद्बलक ठरावे म्हणून परांजपे कसे फिरवतात याचें हें एक उदाहरण आहे. अशीं आणखी कित्येक उदाहरणें पुढे येतील.

मालप्रदेश रामगिरीच्या पश्चिमेस नव्हता

मेघ उत्तरेस निघाला म्हणजे त्याला प्रथम माल नामक प्रदेश लागेल, असें कालिदासाने श्लोक १६ मध्ये सांगितलें आहे. परांजप्यांचा मालदेश (रत्नपुरच्या उत्तरेचा मालडा) पश्चिमेस राहतो. शिवाय तो प्रदेश रामगडच्या मानाने सखल आहे. परांजप्यांना ही अडचण जाणवली आहे. ते म्हणतात, 'पादपूरणार्थक अव्ययाप्रमाणें मेघमार्गाच्या स्थळनकाशांत मध्येच बरीचशी जागा कोरी राहू नये, एवढ्याकरितां कालिदासाने या माल पठाराचा उपयोग करून घेतला आहे ·· रामगिरि आणि आम्रकूट या दोन स्थळांच्या दरम्यान जी मोठी तूट, पोकळी किंवा खड्डा पडत होता तो भरून काढण्याकरितां घातलेली ही भर होय. मालक्षेत्र म्हणजे या दोहोंच्यामधील दुवा.' (मे. न. प्र., पृ. ८४–८५.) हें कारण स्पेशल प्लीडिंगच्या (प्रमाणाभासाच्या) स्वरूपाचें आहे. चांगले कवि पादपूरणांचा उपयोग करीत नाहीत. कालिदासावर रामगिरि ते अलका या मार्गावरील सर्व प्रदेशांचें वर्णन करण्याची सक्ति कोणी केली नव्हती. त्याने त्या मार्गावरील अनेक देश, पर्वत व नद्या गाळल्या आहेत. तो कांही त्या मार्गाचा

भूगोल लिहीत नव्हता. परांजपे म्हणतात त्याप्रमाणें मालप्रदेश इतका क्षुद्र असता तर त्याचा उल्लेख गाळून कवीला एकदम आम्रकूटाचें वर्णन करतां आलें असतें. शिवाय त्याने या माल प्रदेशाचें चुकीचें वर्णन कां घालावें ? परांजप्यांच्या मताप्रमाणे हें माल पठार रामगडच्या पश्चिमेस व त्या पर्वताच्या मानाने सखल आहे. मग कालिदास मेघाला तें उत्तरेस जातांना लागेल आणि रामगिरीहून जातांना तें मेघाला चढावें लागेल (श्लोक १६ मधील 'आरुह्य' शब्द पाहा) असें कां सांगत आहे ? सारांश मालप्रदेश रामगिरीच्या पश्चिमेस नव्हता आणि सखलहि नव्हता. श्लोक १४ व १६ यांमधील वर्णन निश्चितपणें रामगडच्या विरुद्ध जातें.

माल प्रदेश रामगिरीपेक्षा सखल नव्हता

श्लोक १६ मध्ये यक्ष मेघास म्हणतो–

सद्यःसीरोत्कषणसुरभिक्षेत्रमारुह्य मालं
किंचित् पश्चाद्व्रज लघुगतिर्भूय एवोत्तरेण ।।

या श्लोकांत माल प्रदेश चढून गेल्यावर मेघाने थोडेसें पश्चिमेला वळून नंतर पुन्हा उत्तरेकडे जावयाचें आहे. या वर्णनांतील स्वारस्य व सूक्ष्मता मागे दाखविली आहे. कालिदासाला मेघाला रामगिरीहून विदिशेला न्यावयाचें आहे. विदिशा रामगिरीच्या (रामटेकच्या) थेट उत्तरेस नसून त्या दिशेच्या किंचित् पश्चिमेस आहे. म्हणून मालप्रदेश ओलांडल्यावर मेघाने किंचित् पश्चिमेकडे वळून नंतर उत्तरेकडे गेल्यावर त्याला आम्रकूट व नर्मदा नदी लागेल, आणि पुढे तसेंच उत्तरेस गेल्यावर तो विदिशा नगरीस पोचेल, असें कालिदासाने वर्णिलें आहे. हें वर्णन परांजप्यांच्या रामगडला मुळीच जुळत नाही. रामगडहून उत्तर दिशेने उड्डाण केल्यावर मेघाला मालप्रदेश लागणार नाही. तो पश्चिमेस राहतो. ही अडचण उत्पन्न होते. त्यावर परांजप्यांचा तोडगा पाहा–"१५ व्या (?) श्लोकांत 'कांहीसा पश्चिमेला जा आणि मग पुनः उत्तरेला जा' असा स्पष्ट दिशा–निर्देश केलेला आहे. कांहीशा पश्चिमेला जर जावयाचें तर त्याच्याच आधी उत्तरेला जावयास कोण सांगेल ?...आधी उत्तर, लगेच

बदलून पुन्हा पश्चिम आणि नंतर पुन्हा उत्तर–इतका द्राविडी प्राणायाम कशाकरितां ? (पृ. ८४). पश्चिमेकडे जावयाला निघण्यापूर्वी मालक्षेत्राला भेट देण्याकरिता उत्तरेला उगीच एक वाकडी वेलांटी घेण्याला कांही सबळ कारण नाही. यावरूनहि माल रामगिरीच्या पश्चिमेलाच असावें, या म्हणण्याला पुष्टि मिळते.' (पृ. ८७). कालिदासाच्या श्लोकांचा अशा रीतीने आपणांस हवा तसा ओढाताणीने अर्थ लावणें रसिकांस मान्य होणार नाही. अर्थ करण्याची ही वस्तुनिष्ठ पद्धति नव्हे. मालप्रदेश पश्चिमेला आहे, हें कालिदासास सांगावयाचें असतें तर तशी शब्दयोजना त्याने केली असती.

मालविषयक श्लोकाचा खरा अर्थ

सद्यःसीरोत्कषणसुरभिक्षेत्रमारुह्य मालं
किंचित् पश्चाद्व्रज लघुगतिर्भूय एवोत्तरेण ।।

या श्लोकार्धाच्या अर्थाचा बारकाईने विचार केला असतां तो निश्चितपणें रामगडच्या विरुद्ध जातो. कसा तो पहा--

(१) माल पठारावर चढल्यावर (मालमारुह्य) मेघाने किंचित् पश्चिमेकडे वळावयाचें आहे. येथील ल्यबन्ताचा प्रयोग लक्षांत घेतला पाहिजे. 'समानकर्तृकयोः पूर्वकाले' या पाणिनिसूत्राप्रमाणें माल प्रदेशावर आरोहण करण्याची क्रिया पश्चिमेकडे वळण्यापूर्वीची आहे. अर्थातच माल प्रदेश रामगिरीच्या पश्चिमेस नव्हता. यापूर्वीच्या श्लोक १४ मधील 'उदङ्मुखः उत्पत' या शब्दानी स्पष्ट दाखविल्याप्रमाणें तो त्या गिरीच्या उत्तरेस होता.

(२) 'किंचित्पश्चाद्व्रज लघुगतिर्भूय एवोत्तरेण' याचा अर्थ थोडेसें पश्चिमेला जाऊन नंतर पुनः उत्तरेलाच जा' असा आहे व तसा तो सर्व टीकाकारांनी दिला आहे. उदाहरणार्थ मल्लिनाथ म्हणतो--किंचित्पश्चाद्-व्रज गच्छ । लघुगतिस्तत्र निर्वृष्टत्वात् क्षिप्रगमनः सन् भूयः पुनरपि उत्तरेणैव उत्तरमार्गेणैव व्रज ।' पूर्णसरस्वती यांची विद्युल्लता टीका तर इतर स्थलांप्रमाणें येथेहि कालिदासाचा आशय अत्यंत स्पष्ट करणारी आहे--'उत्तरेण उत्तरदिग्भागेन । **भूयः पुनः, अङ्गीकृताया उत्तरदिशो मध्ये**

परित्यागात् । एवकारो भिन्नक्रमः । उत्तरेणै प्रस्तुतेनेत्यर्थः ।' याचा अर्थ असा–' थोडासा मार्ग पश्चिमेकडे आक्रमण करून पुनः पूर्वी अंगीकारलेल्या पण मध्ये खंड पडलेल्या उत्तर दिशेनेच पुढे जा.' तेव्हा 'भूयः उत्तरेणैव' यांतील शब्दयोजनेवरून पश्चिमेकडे वळण्यापूर्वी मेघाने रामगिरीहून उत्तरेलाच जाऊन माल प्रदेशावर आरोहण करावयाचें होतें, हें स्पष्ट आहे. हा अर्थ परांजप्यांच्या मताविरुद्ध जातो. कारण त्यांना मेघाला रामगडावरून उज्जयिनीपर्यंत पश्चिमेच्याच मार्गाने न्यावयाचें आहे. (मे. न. प्र., पृ. ५७ वरचा त्यांचा नकाशा पाहा.) या मार्गाला 'किंचित् पश्चाद् व्रज' हे शब्द विरुद्ध जातात. म्हणून ते त्यांचा अर्थ कसा विलक्षण करतात पाहा–'येथे किंचित् पश्चिमेला व थोडेसें मागे असे दोनहि अर्थ दाखविणारा खुबीदार व बहारीचा श्लेष कालिदासाने बुद्धिपुरःसर योजला आहे तो लक्षांत आणला पाहिजे.' 'पश्चात्' शब्दावरील श्लेष आतापर्यंत कोणाहि संस्कृत टीकाकारांच्या ध्यानांत आला नव्हता. तो मोठ्या परिश्रमाने शोधून काढल्याबद्दल परांजप्यांचें अभिनन्दन केलें पाहिजे. पण मेघाने उत्तरेस न जातां 'थोडेसें मागें' कां यावयाचें हें आमच्या नीटसें ध्यानांत येत नाही. उंच उडी मारतांना मागें जावें लागतें. मेघासहि उंच उडावयाचें आहे म्हणून तर यक्ष त्यास मागे जावयास सांगत नाही ? 'किंचित् पश्चाद् व्रज लघुगतिर्भूय एवोत्तरेण' याचा सरळ अर्थ 'थोडासा पश्चिमेकडे चल, मग फिरून उत्तरेकडे जाशील' असा आहे व तोच श्री. वा. कृ. परांजपे यांचे पितामह सुविख्यात रसिक कै. शि. म. परांजपे यांनी 'मेघदूतावरून कालिदासाविषयीं' या आपल्या सरस निबंधांत दिला आहे. (साहित्यसंग्रह, भाग १, पृ. ९५ पाहा.) हा अर्थ परांजप्यांच्या रामगडला मुळीच जुळत नाही. म्हणून ते म्हणतात, 'पश्चात् व्रज' म्हणजे मेघाला **बराचसा** पश्चिमेला न्यावयाचा आहे हें उघड आहे. '(पृ. ८९) 'किंचित्' याचा अर्थ ते बराचसा करतात ! संस्कृत भाषेचा नवा कोश रचला पाहिजे !

आम्रकूट म्हणजे अमरकंटक नव्हे

माल प्रदेश ओलांडल्यावर किंचित् पश्चिमेने व नंतर पुन्हा उत्तरेने गेल्यावर मेघाला आम्रकूट पर्वत लागणार होता. परांजपे आम्रकूट म्हणजे

अमरकंटक, असें समजतात. पण त्याला हा मार्ग जुळत नाही. अमरकंटक रामगडच्या दक्षिण–पश्चिम दिशेस आहे. पश्चिमोत्तर दिशेस नाही. शिवाय त्यानंतरचें मेघमार्गाचें वर्णन अमरकंटकास जुळत नाही.

तस्मिन् स्थित्वा वनचरवधूभुक्तकुञ्जे मुहूर्तं
तोयोत्सर्गद्रुततरगतिस्तत्परं वर्त्म तीर्णः ।
रेखां द्रक्ष्यस्युपलविषमे विन्ध्यपादे विशीर्णां
भक्तिच्छेदैरिव विरचितां भूतिमङ्गे गजस्य ।। १९ ।।

या श्लोकांत आम्रकूटावरच्या कुञ्जांत कांही काळ थांबून जलवृष्टि केल्यावर हलक्या झालेल्या मेघाने **त्यानंतरचा मार्ग** (तत्परं वर्त्म) जास्त वेगाने आक्रमण करून नर्मदा नदीस पोचावयाचें होतें. अर्थातच आम्रकूट व नर्मदा यांमध्ये बराच प्रदेश होता. आम्रकूटावर वृष्टि करण्यापूर्वी जलभाराने जड झालेल्या मेघाला तो आक्रमण करण्यास बराच काळ लागला असता, हें सूचित होत आहे. आम्रकूटाचें हें वर्णन अमरकंटकास मुळीच जुळत नाही. अमरकंटकचें प्राचीन नांव आम्रकूट नसून मेकल होतें, हें मागें सांगितलें आहे. शिवाय अमरकंटकानंतर उत्तरेस कांही मार्ग आक्रमिल्यावर नर्मदा नदी लागत नसून अमरकंटकांतच तिचा उगम होतो. तिसरी गोष्ट ही कीं वरील श्लोकांतील नर्मदा नदीचें वर्णन अमरकंटक-जवळच्या नर्मदेस मुळीच जुळत नाही. विंध्य पर्वताच्या पायथ्याशी खडकाळ भागांत वर्षाकालारंभीं नर्मदा नदीचा आटलेला प्रवाह अनेक स्रोतांत विभक्त होऊन वाहत असतो, त्याचें हें वर्णन आहे. कै. प्रो. पाठक यांच्या भाषांतरांतील परांजप्यांनी आपल्या पुस्तकाच्या पृष्ठ ९५ वर उद्धृत केलेल्या पुढील उताऱ्यांत तोच अर्थ विवक्षित आहे––

'And traversing the road beyond Amrakuta at a swifter pace by reason of the discharge of water, thou wilt see the Narmada parted into streamlets at the foot of the Vindhya rugged with stones, and resembling the figures composed of the marks of painted streaks on the body of an elephant.'

या भाषांतरांतील अर्थ अमरकंटकच्या विरुद्ध जातो हे इंग्रजीचें सामान्य ज्ञान असलेला कोणीहि सांगेल. 'Narmada parted into streamlets' म्हणजे नर्मदेला येऊन मिळणारे प्रवाह नव्हेत, तर पूर्वी (वर्षा व शरद् ऋतूंत) एक प्रवाहांत वाहणाऱ्या नर्मदेचे ग्रीष्म ऋतूंत पाणी आटल्यामुळे खडकाळ भागांत झालेले अनेक स्रोत होत. 'नकाशांत नर्मदाप्रवाहांचें जाळें स्पष्ट दिसतें' (पृ. ९५) असें परांजपे म्हणतात. कालिदास नकाशांतलें नर्मदेस मिळणाऱ्या प्रवाहांचें जाळें वर्णन करीत नाही, तर प्रत्यक्ष वस्तुस्थितींत नर्मदेचा प्रवाह खडकाळ प्रदेशामुळे अनेक भागांत विभक्त झालेला वर्णित आहे. नकाशांत जवळ जवळ दिसणाऱ्या प्रवाहांमध्ये कित्येक मैलांचें अंतर असतें. तसे प्रवाह येथे विवक्षित नाहीत.

मेघाने नर्मदा ओलांडूनच पुढे जावयाचें

रामगिरीहून उत्तरेकडे तोंड करून निघालेल्या मेघाला प्रथम माल प्रदेश, नंतर किंचित् पश्चिमेला वळून पुन्हा उत्तरेला गेल्यावर आम्रकूट पर्वत, पुढे त्यानंतरचा मार्ग आक्रमिल्यावर नर्मदा नदी लागणार होती. येथपर्यंतचा मार्ग दक्षिणोत्तर आहे. त्यानंतर मेघाला दशार्ण देशाची राजधानी विदिशा येथे न्यावयाचें आहे. विदिशा नर्मदेच्या उत्तरेस आहे. तेव्हा 'नर्मदा नदीचें पाणी पिऊन तूं पुढे जा' असें यक्ष मेघास सांगत आहे. रामटेकपासून विदिशेचा मार्ग अगदी याच तऱ्हेचा असल्यामुळे त्यांत कांहीच अडचण नाही. पण परांजप्यांच्या मताप्रमाणें रामगड हा रामगिरि मानल्यास मेघाला नर्मदा ओलांडावी लागणार नाही, ही मोठीच अडचण येते. ती त्यांनी कशी दूर केली हें पाहिल्यावर त्यांच्या कल्पकतेचें कौतुक करावेंसे वाटतें. 'नर्मदेचें पाणी पिऊन किंवा शोषून पुढे जा, असा 'गच्छेः' (श्लो. २०) हा उल्लेख आहे. या ठिकाणीं' 'नर्मदा ओलांड' अथवा 'उत्तीर्य' इत्यादि अर्थाचा शब्द न घालतां नुसता 'गच्छेः' असा प्रयोग कवीने केला आहे. त्यामुळे नर्मदा नदी ओलांडावयाची नसून तिच्यावरून कांठाकांठाने जावयाचें आहे असा हेतु ध्वनित होते त्याचा फलितार्थ हा कीं मेघाचा मार्ग दक्षिणोत्तर नसून पूर्वपश्चिम होता.' आहे कीं नाही

शब्दांच्या अर्थाचा कीस काढण्याची अजब पद्धत? महाकवि एकच शब्द किंवा एकच कल्पना अनेकदां योजीत नाहीत.[१] विशेषतः कालिदास विवक्षित अर्थ अनेक प्रकारांनी व्यक्त करण्यांत निपुण आहे. जेथे नदीला 'उत्तीर्य' (ओलांडून) असा स्पष्ट निर्देश केला नसेल तेथे तिच्या कांठाकांठाने जाणें कवीला विवक्षित आहे असें मानलें तर अनवस्थाप्रसंग येईल. कसा तें पाहा-

खिन्नः खिन्नः शिखरिषु पदं न्यस्य गन्तासि यत्र
क्षीणः क्षीणः परिलघु पयः स्रोतसां चोपयुज्य ।।

या श्लोक ३ मध्येहि 'गम्' धातूचाच प्रयोग केला आहे, पण त्यामुळे रामगिरि ते अलका या मार्गावरचे पर्वत व नद्या मेघाने ओलांडावयाच्या नाहीत (कारण 'उत्तीर्य' सारखें पद योजिलें नाही) तर त्यांच्या बाजूबाजूने जावयाचें आहे, असें मानल्यास काय आपत्ति येईल याचा विचार वाचकांनी करावा. कालिदासाने केवळ नर्मदानदीच्या बाबतींत 'उत्तीर्य' सारख्या शब्दाचा प्रयोग टाळला असता तर कदाचित् वरीलसारखें अनुमान काढतां आलें असतें. पण वस्तुस्थिति तशी नाही. वननदी (श्लो. २६), सिन्धु (श्लो. २९), शिप्रा (श्लो.३१), गम्भीरा (श्लो.४२ व ४३), सरस्वती (श्लो. ५१), आणि गंगा (श्लो. ५२) या नद्यांना मेघाने ओलांडल्याचे निर्देश नाहीत. मग सर्व नद्यांच्या कांठाकांठाने तो गेला असें समजावयाचें काय? अर्थात् नाही. तेव्हा इतर नद्यांप्रमाणें नर्मदा नदीहि मेघाने आपल्या मार्गांत ओलांडली होती असेंच मानलें पाहिजे. अर्थात् मेघाचा मार्ग पूर्वपश्चिम नसून दक्षिणोत्तरच होता. रामगडहून उत्तरेला जाताना नर्मदा नदी लागत नाही; म्हणून रामगड रामगिरि होऊं शकत नाही.

येथवर मेघदूतांतील भौगोलिक स्थितीचें वर्णन रामगडच्या कसें विरूद्ध जातें, तें दाखविलें.

---

१ 'नैकं पदं द्विः प्रयोज्यं प्रायेण ।' काव्यप्रकाश, उल्लास ७.

हाथीफोड हें ऋक्षबिल नव्हे

रामगड हाच रामगिरि या आपल्या मताला टेकू देण्याकरितां परांजप्यांनी रामायणांत उल्लेखिलेल्या ऋक्षबिलाचा आधार घेतला आहे. रामगड पर्वतांत एक विस्तीर्ण व लांबच लांब गुहा आहे तिला हाथीफोड म्हणतात. याच गुहेंत हनुमान् वगैरे वानरवीर सीताशोधार्थ आले होते, असें ते म्हणतात. आणि आपल्या विधानाच्या समर्थनार्थ रामायणांतील खालील श्लोक उद्धृत करतात–

> दुर्गं ऋक्षबिलं नाम दानवेनाभिरक्षितम् ।
> अवकीर्णं लतावृक्षैर्ददशुस्ते महाबिलम् ।।

या स्थळीं किंवा याचे आसपास राम व सीता पूर्वी राहत असावे, असें त्यांचें अनुमान आहे. वनवासांत असतांना राम सीतेसह एकाच पर्वतावर राहत होते; तो म्हणजे चित्रकूट. रामगडांतील हाथीफोड गुहेला ऋक्षबिल म्हटलें आहे. तेव्हा चित्रकूटाला ऋक्ष असेंहि नांव होतें, असें ते म्हणतात. आणि त्याला कालिदासाच्या रघुवंशांतील श्लोक प्रमाण म्हणून उद्धृत करतात–

> रामस्त्वासन्नदेशत्वाद् भरतागमनं पुनः ।
> आशंक्योत्सुकसारंगां चित्रकूटस्थलीं जहौ ।
> प्रययावातिथेयेषु वसन् ऋषिकुलेषु सः ।
> दक्षिणां दिशमृक्षेषु वार्षिकेष्विव भास्करः ।

या श्लोकांवरून चित्रकूट ऋक्षपर्वताच्या परिसरांत होता असें त्यांचें अनुमान आहे. तेव्हा त्यांच्या मतें रामगड = चित्रकूट = ऋक्ष असें आहे. त्यांच्या प्रमाणांचें थोडक्यांत परीक्षण करूं.

परांजप्यांच्या विधानाचें परीक्षण

ऋक्षबिलाचें विस्तृत वर्णन रामायणाच्या किष्किंधाकांडांत ५० ते ५२ या सर्गांत आलें आहे. ५० व्या सर्गाच्या आरंभीं इतर वानरांना घेऊन

हनुमान् विन्ध्य पर्वतावरील अरण्यें व गुहा शोधण्यास गेला असें खालील श्लोकांत म्हटलें आहे–

सह ताराङ्गदाभ्यां तु संगम्य हनुमान् कविः ।
विचिनोति च विन्ध्यस्य गुहाश्च गहनानि च ॥

नंतर शोध करीत करीत ते विन्ध्यपर्वताच्या दक्षिणपश्चिम टोकाजवळ आले, असें पुढे म्हटलें आहे.

आसेदुस्तस्य शैलस्य कोटिं दक्षिणपश्चिमाम् ।
तेषां तत्रैव वसतां स कालो व्यत्यवर्तत ॥

नंतर दक्षिण दिशेचे गिरिजालावृत प्रदेश शोधत असतां त्यांना ऋक्षबिल दिसलें, असें म्हटलें आहे.

गिरिजालावृतान् देशान् मार्गित्वा दक्षिणां दिशम् ।
विचिन्वन्तस्तत्र तत्र ददृशुर्विवृतं बिलम् ।
दुर्गं ऋक्षबिलं नाम दानवेनाभिरक्षितम् ॥

ऋक्षबिलाच्या या वर्णनावरून तें विन्ध्यपर्वताच्या दक्षिणपश्चिम भागाच्या दक्षिणेस असलेल्या प्रदेशांत होतें हें उघड आहे. अर्थात् तें विन्ध्यपर्वताच्या पूर्व टोकांतील रामगड पर्वतांतील गुहा होऊं शकत नाही. ऋक्षबिल या नांवावरूनहि तें ऋक्षपर्वतांतील बिल किंवा विवर होतें. (बोगदा नव्हे)[१] हें स्पष्ट आहे. ऋक्ष हें सातपुड्याचें प्राचीन नांव होतें.

१ सामान्यतः 'बोगदा' या अर्थी 'रन्ध्र' शब्दाचा उपयोग होतो. 'हंसद्वारं भृगुपतियशोवर्त्म यत् क्रौञ्चरन्ध्रम्' (मेघ. ५९) ही कालिदासाची पंक्ति पाहा.

तापी, पयोष्णी (पूर्णा), निर्विन्ध्या या नद्या सातपुडा पर्वतांत उगम पावतात. त्यांना मार्कंडेय पुराणांत ऋक्ष पर्वतांतून निघणाऱ्या नद्या, असें म्हटलें आहे—

तापीपयोष्णीनिर्विन्ध्याप्रमुखा ऋक्षसम्भवाः ।।

कालिदासहि सातपुड्यालाच ऋक्ष म्हणतो. रघुवंशाच्या पांचव्या सर्गांत अज अयोध्येहून विदर्भाची राजधानी कुंडिनपुर येथे जात असतांना वाटेंत विन्ध्य पर्वताच्या पायथ्याशी नर्मदा नदीच्या तीरीं त्याच्या सैन्याचा तळ पडला होता. तेव्हा ऋक्षपर्वताच्या तटाशी वप्रक्रिया करण्यामुळे ज्याच्या दन्तांवर निळ्या उभ्या रेघा उमटल्या आहेत असा हत्ती विरुद्ध दिशेने नर्मदा नदी ओलांडून येत असलेला अजाला दिसला, असें वर्णन कालिदासाने केलें आहे. त्यावरून ऋक्ष पर्वत नर्मदेच्या दक्षिणेस होता, अर्थातच तो सध्याचा सातपुडा पर्वत होय, हें स्पष्ट आहे. तेव्हा तो विन्ध्याच्या पूर्व टोकाशी असणारा रामगड होऊं शकत नाही. रामगड हा चित्रकूट नव्हे, हें आम्ही पुढे दाखविणार आहों. पण तो चित्रकूट आहे, असें मानलें तरी कालिदासाच्या खालील श्लोकांवरून तो ऋक्ष पर्वताच्या परिसरांत होता, असें सिद्ध होत नाही.

श्लोकांचा खरा अर्थ

रामस्त्वासन्नदेशत्वाद् भरतागमनं पुनः ।
आशंक्योत्सुकसारंगां चित्रकूटस्थलीं जहौ ।।
प्रययावातिथेयेषु वसन् ऋषिकुलेषु सः ।
दक्षिणां दिशमृक्षेषु वार्षिकेष्विव भास्करः ।।
(रघु., १२,२३–२४)

याचा खरा अर्थ असा कीं, चित्रकूट पर्वत भरताचें निवासस्थान नन्दिग्राम यापासून जवळच असल्याने भरत पुनः आपणास राज्य स्वीकारण्याविषयी आग्रह करण्यास येईल, अशा भीतीमुळे रामाने चित्रकूट प्रदेश सोडला आणि ज्याप्रमाणे वर्षाऋतूतील नक्षत्रांमधून जात जात सूर्य दक्षिण

दिशेकडे गमन करतो त्याप्रमाणें आतिथ्यशील ऋषींच्या आश्रमांत कांही काळ राहत राहत राम दक्षिण दिशेला आला. यांत ऋक्षपर्वताचा मुळीच उल्लेख नाही. ऋक्ष म्हणजे नक्षत्र या शब्दाचा ऋक्षपर्वताशी बादरायण संबंध सुद्धा नाही. परांजप्यांना या श्लोकांत ऋक्ष शब्द दिसला आणि बुडत्याला काडीचा आधार या न्यायाने त्यांनी तो पकडला. पण त्या काडींत त्यांना तारण्याचें सामर्थ्य नाही. 'ऋक्षेषु' या शब्दावर श्लेष आहे असें मानलें तरी त्याचा अर्थ ऋक्षपर्वत होऊं शकत नाही. पर्वतांचीं नांवें इंग्रजींत बहुवचनान्त असतात, तशीं संस्कृतांत असत नाहीत, ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. तथापि परांजप्यांस जरूर असल्यास एकदोन उदाहरणें कालिदासाच्याच ग्रंथांतील देतों--

पतिर्महेन्द्रस्य महोदधेश्च । रघु., ६, ५४.
विन्ध्यस्य संस्तम्भयिता महाद्रेः ॥ रघु., ६, ६१.
अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा हिमालयो नाम नगाधिराजः ।
कुमार., १, १.

या श्लोकांत महेन्द्र, विन्ध्य व हिमालय पर्वतांचा उल्लेख एकवचनांतच केला आहे. तेव्हा 'ऋक्षेषु' या शब्दांत ऋक्ष पर्वताचा उल्लेख नाही. त्या शब्दाने परांजप्यांस तोंडघशीं पाडलें आहे. वादाकरितां क्षणभर 'ऋक्षेषु' याने ऋक्षपर्वत विवक्षित आहे, असें मानलें तरी त्या श्लोकांवरून चित्रकूट (परांजप्यांचा रामगड) ऋक्ष पर्वताच्या परिसरांत होता असा अर्थ निघत नाही. चित्रकूट पर्वत सोडून राम दूरवरच्या ऋक्षपर्वतांत गेला असें फार तर म्हणतां येईल. त्यावरून चित्रकूट ऋक्ष पर्वतापासून दूर होता असेंच निष्पन्न होईल. परांजपे करतात तसा अर्थ करणें अगदी चूक आहे, हें वर दाखविलें आहेच.

ऋक्षबिलाचें वर्णन हाथीफोडास लागू होत नाही

चित्रकूट (रामगड) ऋक्षपर्वतांत होता असे मानलें तरी रामायणांतील ऋक्षबिलाचें वर्णन रामगड पर्वतांतील हाथीफोड बोगद्यास लागू

पडणार नाही. किष्किन्धाकांडाच्या पन्नासाव्या सर्गांत ऋक्षबिलाचें पुढील वर्णन आलें आहे--

'हें बिल एक योजनापेक्षां (८ मैलांपेक्षां) जास्त लांब होतें. त्यांत चंद्रसूर्यांचें दर्शन होत नसे. त्यांत सोन्याचे वृक्ष, साल, ताल, तमाल, चम्पक, लता, कमलिनी होत्या. त्यांत सोन्याचे, रुप्याचे, वैदूर्यमण्यांचे प्रासाद होते, सोनें, चांदी, कांस्य इत्यादि धातूंचीं पात्रें, चंदनाचे संचय, फलमूलांच्या, तसेंच कम्बल, अजिन यांच्या राशि होत्या. त्या गुहेमध्ये वानरांना एक चीरकृष्णाजिन परिधान केलेली तापसी भेटली. तिने वानरांना सांगितलें कीं, हें सर्व ऐश्वर्य मयासुराचें आहे. तो हेमा नामक अप्सरेवर अनुरक्त होता. त्या हेमा अप्सरेची मी कन्या. मी तिच्याकरितां या गुहेचें रक्षण करतें. या गुहेंत एकदा प्रवेश केल्यावर बाहेर पडणें दुष्कर आहे.' शेवटीं वानरांच्या प्रार्थनेवरून तिने त्यांना डोळे मिटावयास सांगून एका निमिषांत त्यांना विन्ध्यपर्वताजवळ आणून सोडलें.'

रामायणांतील ऋक्षबिलाचें वर्णन संक्षेपरूपाने वर दिलें आहे. त्यावरून तें सर्वस्वी काल्पनिक आहे, असें दिसून येईल. तें रामगड पर्वतांतील हाथीफोड बोगद्यास मुळीच लागू पडणार नाही. बेगलरच्या वर्णनावरून हाथीफोड बोगदा सुमानें ४५० फूट लांब आहे, तर रामायणांतील वर्णनाप्रमाणें ऋक्षबिल एक योजन (आठ मैल) लांब होतें व त्याला आंत जाण्यास व बाहेर पडण्यास एकच तोंड होतें. ऋक्षबिलाच्या या वर्णनावरून श्री. परांजपे काव्यमय वर्णनें वस्तुस्थितिदर्शक नसतात, एवढा धडा जरी शिकतील तरी फार उत्तम होईल.

परांजप्यांचा दुसरा सिद्धांत – रामगड हाच चित्रकूट

येथवर पूर्वीच्या सरगुजा संस्थानांतील रामगड हा ऋक्ष पर्वताच्या परिसरांत नव्हता, तसेंच मेघदूतांतील मेघमार्गाच्या वर्णनावरून तो त्या काव्यांत वर्णिलेला रामगिरिहि होऊं शकत नाही हें सविस्तर दाखविलें.

आता त्यांच्या आणखी एका सिद्धांताचें परीक्षण करावयाचें आहे. 'रामगड हाच रामायणांत उल्लेखिलेला चित्रकूट' हा तो सिद्धांत होय. वास्तविक ही कल्पना मूळची बेग्लर साहेबाची. रामगड पर्वतावरील स्थळें पाहिल्यावर आणि रामकथेशी संबद्ध अशा आख्यायिका ऐकल्यावर त्याला रामगड हा चित्रकूट असावा, अशी कल्पना सुचली व त्याने ती आर्किऑलॉजिकल् सर्व्हे रिपोर्ट, व्हॉ. १३ (पृ. ३१–५५) मध्ये पुढे मांडली. परांजप्यांनी ही कल्पना घेतली, तरी त्या साहेबाची उसनवारी कबूल केली नाही. संशोधन-क्षेत्रांत पूर्वगामी संशोधकाचें ऋण न मानणें हें अयोग्य गणलें जातें. असो.

परांजप्यांचीं प्रमाणें

रामगड म्हणजे चित्रकूट हें सिद्ध करण्यास परांजपे पुढील प्रमाणें देतात.

'सध्या कामताजवळचा (बुंदेलखंडांतील) चित्रकूट हा रामायणांत राम, सीता व लक्ष्मण यांचें कांही काळ निवासस्थान म्हणून वर्णिलेला चित्रकूट नव्हे. कारण रामायणांतील चित्रकूटाचें वर्णन त्याला जुळत नाही. तो उंच, गगनचुंबी नाही; तर ५०० फुटांच्या आंत आहे. त्याला शिखर नाही. त्यावर गुहा व जलप्रवाह नाही. त्यामुळें रघुवंशांतील

धारास्वनोद्गारिदरीमुखोऽसौ
शृंगाग्रलग्नाम्बुदवप्रपंकः ।
बध्नाति मे बन्धुरगात्रि चक्षुः
दृप्तः ककुद्मानिव चित्रकूटः ।। (रघु., १३,४७)

हें वर्णन त्याला जुळत नाही. तेथे मोठाले वृक्ष किंवा जंगल नाही. हत्ती नाहीत; कारण त्यांना राहण्यासारखें दाट किंबहुना विरळ सुद्धा जंगल नाही. पण हें सर्व वर्णन सरगुजा संस्थानांतल्या रामगडला पूर्णपणें जुळतें. तो ३२०० फूट उंच आहे. त्याच्या गुहेंतून वाहणारा जलप्रवाह व धबधबा आहे. प्रचंड वृक्षांचें जंगल आहे. सीताबेंगरा नामक गुहा उत्तर चढावरच

आहे. जंगली हत्तीहि आहेत. रामायणांत म्हटलें आहे कीं चित्रकूट प्रयागपासून दहा कोसांच्या अंतरावर आहे. बुंदेलखंडांतील चित्रकूट प्रयागापासून सुमारें ६५ मैलांवर आहे. तेव्हा हें अंतर जमत नाही. मग तें १५० मैलांपर्यंत ताणून रामगडपर्यंत आणण्यास काय हरकत ? (पृ. ११४).

दशक्रोश इतस्तात गिरिर्यस्मिन् निवत्स्यसि ।
चित्रकूट इति ख्यातो गंधमादनसंनिभः ।।

या रामायणांतील भरद्वाजाच्या भाषणांत मूळचा पाठ 'शतक्रोश' असावा. सरगुजा संस्थानांतील चित्रकूटास रामगिरि हें नांव पडलें व कालावधीने त्या रामगिरीचा रामगड झाला. म्हणून बुन्देलखंडांतील चित्रकूट हा तोतया चित्रकूट असून, खरा चित्रकूट हा सरगुजा संस्थानांतील रामगड होय.'

या सिद्धान्ताचें परीक्षण

आतां परांजप्यांच्या या सिद्धांताचें परीक्षण करूं.

मागे रामटेक हें रामगिरि नव्हे, हें सिद्ध करण्याकरिता ज्या प्रमाणांचा परांजप्यांनी अवलंब केला होता तशींच प्रमाणें याहि बाबतींत त्यांनी योजिलीं आहेत. प्राचीन काळचे लतावृक्ष आणि हत्ती, हरिण, मोर इत्यादि पशुपक्षी हजारों वर्षांनंतर आजहि दिसावे, ही अपेक्षा व्यर्थ आहे. उंची वगैरेच्या बाबतींत कवीचें वर्णन वास्तविक मानण्यांत काय आपत्ति येते हें मागील ऋक्षबिलाच्या उदाहरणावरून त्यांना पटलें असेल. त्यांना पटलें नसलें तरी सूज्ञ वाचकांस तें पटेल, अशी आशा आहे. तेव्हा सामान्यतः रामायणांतील वर्णन एखाद्या स्थलास जुळत असेल तर उगीच खळखळ करूं नये. तसें तें जुळतें हें कनिंग्ह्याम साहेबाने सुमारें पाऊणशे वर्षांपूर्वी आपल्या आर्किऑलॉजिकल सर्व्हेच्या एकवीसाव्या व्हॉल्यूममध्यें (पृ. १०–१३) दाखविलें आहे.

चित्रकूट प्रयागापासून फार दूर नव्हता

रामायणांत म्हटलें आहे कीं, रामचंद्र, सीता व लक्ष्मण भरद्वाजाश्रमांत कांही काळ राहिले. नंतर रामचंद्रानी भरद्वाज ऋषीला प्रार्थना केली कीं 'भगवन्, आम्हाला भेटूं इच्छिणारे लोक येथे येऊं लागतील. म्हणून या आश्रमांत राहणें मला प्रशस्त वाटत नाही. तेव्हा एखादें एकान्त असें आश्रमस्थान आम्हाला सांगा.' तेव्हा भरद्वाज ऋषि म्हणाले, 'रामा, येथून दहा कोसांवर महर्षींनी सेविलेला असा चित्रकूट नामक पर्वत आहे. तेथे तूं आपला वनवासाचा काळ घालवावा' त्यानंतर गंगायमुनांच्या संगमापासून निघून यमुना नदीच्या कांठाने रामचंद्र, सीता व लक्ष्मण यांसह, कांही अंतर गेले. आणि यमुना नदी पार करून श्याम नामक वटवृक्षास पोचले. पुढे एक कोस गेल्यावर त्यांना नील नामक वन लागलें. तेथून चित्रकूटाचा मार्ग होता. त्या रात्रीं ते तेथे राहिले. सकाळीं उठल्यावर नदीच्या जलाला स्पर्श करून ते चित्रकूटाच्या मार्गाला लागले. नंतर कांही काळाने रामचंद्र सीतेला म्हणाले--

मातङ्गयूथानुसृतं पक्षिसंघानुनादितम् ।
चित्रकूटमिमं पश्य प्रवृद्धशिखरं गिरिम् ॥

नंतर ते पायींच चालत चालत चित्रकूटाला पोचले.

ततस्तौ पादचारेण गच्छन्तौ सीतया सह ।
रम्यमासेदतुः शैलं चित्रकूटं मनोरमम् ॥

निर्णयसागर छापखान्याने तिलक टीकेसहित छापलेल्या रामायणाच्या आवृत्तींत भरद्वाजाश्रमापासून चित्रकूट पर्वत दहा कोस अंतरावर होता

असें म्हटलें आहे.[१] तो श्लोक मागें दिला आहे. दयानन्द महाविद्यालय संस्कृत ग्रंथमालेंतहि वाल्मीकिरामायणाची आवृत्ति छापली आहे. तींत हेंच अंतर तीन योजन सांगितलें आहे.

इति रामवचः श्रुत्वा भरद्वाजो महामुनिः ।
ध्यात्वा मुहूर्तमेकाग्रो रामं वचनमब्रवीत् ।
त्रियोजनमितस्तात गिरिर्यत्र निवत्स्यसि ।। (सर्ग ५८, २८–२९)

हीं दोन्ही अन्तरें जवळ जवळ एकच, २० ते २४ मैल, येतात. पुढे भरत आपले गुरु वसिष्ठ, मंत्री, कौसल्यादि माता, चतुरंग सेना इत्यादिकांसह रामाला परत अयोध्येला आणण्याकरितां जात असतां भरद्वाजाश्रमांत उतरला होता. तेव्हा भरद्वाज मुनींनी त्याला चित्रकूटाविषयीं पुढील माहिती दिली.

भरतार्धतृतीयेषु योजनेष्वजने वने ।
चित्रकूटगिरिस्तत्र रम्यकन्दरकाननः ।।
उत्तरं पार्श्वमासाद्य तस्य मन्दाकिनी नदी ।
पुष्पितद्रुमसंछन्ना रम्यपुष्पितकानना ।। (सर्ग ९२, १०–११)

---

१ बडोदा विश्वविद्यालयाच्या वतीने अनेक ठिकाणांहून हस्तलिखित प्रती जमवून रामायणाची चिकित्सक पद्धतीची आवृत्ति माझे मित्र प्रा. भट्ट यांच्या संपादकत्वाखालीं तयार केली जात आहे. प्रा. भट्ट यांना मी रामायणाच्या अयोध्या., अ. ५४, श्लो. २८ मध्ये 'दशक्रोश इतस्तात' इत्यादिबद्दल भिन्न पाठ असल्यास कळविण्याबद्दल विनंती केली होती. ते लिहितात कीं, उत्तर भारतांतील रामायणाच्या हस्तलिखितांत वरील पाठाऐवजी 'त्रियोजनमितस्तात' आणि 'इतस्त्रियोजनाद्राम' असे दोन पाठ आहेत. श्री. परांजपे यांनी अनुमानिलेला 'शतक्रोश इतस्तात' हा पाठ मात्र कोठेहि दिसत नाही. चित्रकूटाचें प्रयागापासून अंतर तीन योजन असल्यास ते २४ मैल होईल. तेव्हा हें अंतर इतर पाठांतल्या अंतराहून फारसें निराळें नाही.

दयानन्द महाविद्यालय संस्कृतग्रंथमालेंतील आवृत्तींत हेच श्लोक आढळतात. यांत तें अंतर अडीच योजनें किंवा वीस मैल सांगितलें आहे. तेव्हा एकंदरींत भरद्वाजाश्रमापासून चित्रकूट वीस बावीस मैल होता, असें दिसतें. सध्याचा कामताजवळचा चित्रकूट यापेक्षा बराच दूर सुमारें ६५ मैलांवर आहे. त्या गिरिचें इतर वर्णन मात्र त्याला जुळणारें आहे. तेथे टेकडीच्या पायथ्याशी अनेक देवालयें आहेत व सदैव यात्रेकरूंची रीघ लागते. जवळच मन्दाकिनी नांवाची नदी आहे. याशिवाय, त्याच्या जवळच प्रस्रवण नामक रामायणांत उल्लेखिलेला पर्वत आहे. त्याच्या-जवळच्या नदीला सध्या पैशुनी (संस्कृत, प्रस्रविणी) म्हणतात. तिचे अनेक प्रपात झाले आहेत. चित्रकूटाजवळ वायव्य दिशेस सुमारें ९ मैलांवर गुप्तगोदावरी नामक नदी एका गुहेंतून निघते. तिच्या धबधब्याने सभोवारचा प्रदेश निनादित होतो. या नदीला उद्देशूनच कालिदासाने खालील श्लोक लिहिला असावा–

धारास्वनोद्गारिदरीमुखोऽसौ शृङगाग्रलग्नाम्बुदवप्रपङकः ।
बध्नाति मे बन्धुरगात्रि चक्षुर्दृप्तः ककुद्मानिव चित्रकूटः ।।

(रघु., १३, ४७)

रघुवंशाच्या तेराव्या सर्गांत रामाला विमानांतून जाताना चित्रकूट पर्वत व त्याजवळची मन्दाकिनी नदी दिसली, त्यांचें वर्णन आलें आहे. तें या चित्रकूटाला जुळतें. कारण यानंतर अत्रिऋषीचा आश्रम (जेथे अनसूयेने आपल्या प्रभावाने गंगा नदी आणली होती तो) वर्णिला आहे. त्यावरून गंगा नदीपासून जवळच चित्रकूट होता यांत संशय नाही. युद्ध-कांडांत विमानांतून रामाला दिसलेल्या या प्रदेशाचें वर्णन पाहा–

असौ सुतनु शैलेन्द्रश्चित्रकूटः प्रकाशते ।
अत्र मां कैकयीपुत्रः प्रसादयितुमागतः ।।
एषा सा यमुना रम्या दृश्यते चित्रकानना ।
भरद्वाजाश्रमः श्रीमान्दृश्यते चैष मैथिलि ।।
इयं च दृश्यते गङगा पुण्या त्रिपथगा नदी ।।

(युद्धकांड, १२३, ४९–५१)

या सर्व उताऱ्यांवरून चित्रकूट हा गंगा-यमुना नद्यांपासून फार दूर नव्हता, हें उघड आहे. सध्याच्या कामताजवळच्या चित्रकूटाचें अंतर रामायणांत सांगितलेल्या अंतरापेक्षा थोडें जास्त आहे खरें, पण तेवढ्यावरून चित्रकूट रामगड इतका दक्षिणेस असणें शक्य नाही. परांजपे म्हणतात 'बुन्देलखंडातल्या चित्रकूटाचें अंतर रामायणांतील वर्णनाशी जमत नाही. मग तें १५० मैलांपर्यंत ताणून रामगडपर्यंत आणण्यास काय हरकत आहे?' वास्तविक रामगडचें प्रयागापासून सरळ रेषेंत अंतर (as the crow flies) १५० मैल नसून २०० मैल आहे. रस्ते अगदी सरळ नसतात. त्यांना कित्येक वळणें असतात. तेव्हा हें अंतर निदान अडीचशें मैल होईल.[१] इतकें अंतर राम, सीता व लक्ष्मण रामायणांत वर्णिल्याप्रमाणें तीन चार दिवसांत पायीं चालून गेले असतील काय? तसेंच चतुरंग सेनेसह भरत रामाच्या शोधार्थ इतका दूर आला होता काय? तसेंच नन्दिग्रामाहून चित्रकूट सुमारें तीनशे मैल असता तर भरत वरचेवर येऊन आपणांस राज्य स्वीकारण्याचा आग्रह करील, असें वाटून रामास चित्रकूटाजवळील आश्रम सोडून दक्षिणेंत दूर जावेसें वाटलें असतें काय? कालिदास म्हणतो--

रामस्त्वासन्नदेशत्वाद् भरतागमनं पुनः ।
आशंक्योत्सुकसारंगां चित्रकूटस्थलीं जहौ ॥
(रघु. १२, २४)

यांतील वर्णन रामगडास जुळतें काय याचा विचार वाचकांनी करावा.

---

१ कनिंग्ह्यामनेहि हेंच अंतर दिलें आहे. आणि त्यावरून त्यानें रामगड चित्रकूट होऊं शकत नाही, असें स्पष्ट म्हटलें आहे.

शिवाय, राम रामगडावरील गुहेंत राहत असता[१] तर भरत आपल्या लवाजम्यासह तेथे पोचला असता काय, याचाहि विचार केला पाहिजे.

रामगड हा चित्रकूट नव्हे

वरील विवेचनावरून पूर्वीच्या सरगुजा संस्थानांतील रामगड हा चित्रकूट असणें सुतराम् अशक्य आहे, ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट झाली असेल. रामगड मेघदूतांतील रामगिरि नव्हे हे आम्ही मागेच सिद्ध केलें आहे. तेव्हा परांजप्यांचे खालील दोन्ही सिद्धांत असिद्ध झाले आहेत–

रामगड = चित्रकूट

आणि म्हणून रामगड = रामगिरि.

---

१ रामाचा आश्रम चित्रकूट पर्वतावर नसून त्याच्या पायथ्याशीं होता. खालील श्लोक पाहा–

तस्य शैलस्य पादे तु विविक्ते सलिलावृते ।
आश्रमं चक्रतुश्चारु भ्रातरौ रामलक्ष्मणौ ।। रामायण
(दयानन्द महाविद्यालय ग्रंथमाला) अयोध्या., ६०, १९.

रामाचा आश्रम चित्रकूट पर्वतावर नसून त्याच्या पायथ्याशी होता; म्हणून भरत सैन्यासह येत असतां मोठा आवाज होत होता तो कशाचा तें पाहण्यासाठी रामाने लक्ष्मणास सांगितलें, तेव्हा लक्ष्मणाला साल वृक्षावर चढून पाहावें लागलें, असें रामायणांत (अयोध्या., ११०, ८) वर्णिलें आहे. रामाचा आश्रम उंच पर्वतावर असता तर लक्ष्मणाला झाडावर चढण्याची आवश्यकता नव्हती. तेव्हा ज्यावर रामलक्ष्मणांच्या गुहा आहेत असें म्हणतात तो रामगड रामायणांतील वर्णनाप्रमाणें चित्रकूट होऊं शकत नाही, हें उघड आहे.

परिशिष्ट पहिलें

मेघदूतांतील रामगिरि ते विदिशा हा मेघमार्ग

संस्कृत श्लोक

कश्चित्कान्ताविरहगुरुणा स्वाधिकारात्प्रमत्तः
शापेनास्तंगमितमहिमा वर्षभोग्येण भर्तुः ।
यक्षश्चक्रे जनकतनयास्नानपुण्योदकेषु
स्निग्धच्छायातरुषु वसतिं रामगिर्याश्रमेषु ॥ १ ॥

तस्मिन्नद्रौ कतिचिदबलाविप्रयुक्तः स कामी
नीत्वा मासान्कनकवलयभ्रंशरिक्तप्रकोष्ठः ।
आषाढस्य प्रथमदिवसे मेघमाश्लिष्टसानुं
वप्रक्रीडापरिणतगजप्रेक्षणीयं ददर्श ॥ २ ॥

तस्य स्थित्वा कथमपि पुरः कौतुकाधानहेतो–
रन्तर्बाष्पश्चिरमनुचरो राजराजस्य दध्यौ ।
मेघालोके भवति सुखिनोऽप्यन्यथावृत्ति चेतः
कण्ठाश्लेषप्रणयिनि जने किं पुनर्दूरसंस्थे ॥ ३ ॥

प्रत्यासन्ने नभसि दयिताजीवितालम्बनार्थी
जीमूतेन स्वकुशलमयीं हारयिष्यन् प्रवृत्तिम् ।
स प्रत्यग्रैः कुटजकुसुमैः कल्पितार्घाय तस्मै
प्रीतः प्रीतिप्रमुखवचनं स्वागतं व्याजहार ॥ ४ ॥

मराठी अनुवाद *

एका यक्षाकडुनि घडला आत्मकार्यात दोष
वर्षान्त स्त्री–विरह–जड दे शाप त्याला धनेश ।
त्याने लुप्तप्रभ वसत तो रामगिर्याश्रमांत
सीतास्नाने उदक जिथलें पूत, झाडी निवान्त ।। १ ।।

प्रेमी कान्ता–विरहिं अचलीं घालवी मास कांही
गेलें खाली सरुनि वलय स्वर्ण हस्तीं न राही ।
आषाढाच्या प्रथम दिनिं तो मेघ शैलाग्रि पाहे
दन्ताघातें तटिं गज कुणी भव्यसा खेळताहे ।। २ ।।

त्याच्या कैसा तरि पुढति ये, चित्त वेधूनि जात
दाटे कंठ, द्रविणपतिचा दास होई सचिन्त ।
आनंदी ही विकल हृदयीं पाहतां मेघ, दूर
तो कैसा हो प्रियजन मिठी ज्यास देण्या अधीर ।। ३ ।।

व्हावा जीवा पुढति सखिच्या आसरा श्रावणांत
मेघाहातीं कुशल म्हणुनी पाठवूं ये मनांत ।
त्यातें ताजीं कुटजकुसुमें अर्घ्य देण्यास वेंची
संतोषोनी वदत वचनें प्रेमळ स्वागताचीं ।। ४ ।।

* हा समश्लोक, समवृत्त आणि सयमक अनुवाद डॉ. चिं. द्वा. देशमुख यांचा आहे.

धूमज्योतिःसलिलमरुतां संनिपातः क्व मेघः
सन्देशार्थाः क्व पटुकरणैः प्राणिभिः प्रापणीयाः ।
इत्यौत्सुक्यादपरिगणयन्गुह्यकस्तं ययाचे
कामार्ता हि प्रकृतिकृपणाश्चेतनाचेतनेषु ॥५॥

जातं वंशे भुवनविदिते पुष्करावर्तकानां
जानामि त्वां प्रकृतिपुरुषं कामरूपं मघोनः ।
तेनार्थित्वं त्वयि विधिवशाद्दूरबन्धुर्गतोऽहं
याच्ञा मोघा वरमधिगुणे नाधमे लब्धकामा ॥६॥

सन्तप्तानां त्वमसि शरणं तत्पयोद प्रियायाः
सन्देशं मे हर धनपतिक्रोधविश्लेषितस्य ।
गन्तव्या ते वसतिरलका नाम यक्षेश्वराणां
बाह्योद्यानस्थितहरशिरश्चन्द्रिकाधौतहर्म्या ॥७॥

त्वामारूढं पवनपदवीमुद्गृहीतालकान्ताः
प्रेक्षिष्यन्ते पथिकवनिताः प्रत्ययादाश्वसत्यः ।
कः संनद्धे विरहविधुरां त्वय्युपेक्षेत जायां
न स्यादन्योऽप्ययमिव जनो यः पराधीनवृत्तिः ॥८॥

तां चावश्यं दिवसगणनातत्परामेकपत्नी-
मव्यापन्नामविहतगतिर्द्रक्ष्यसि भ्रातृजायाम् ।
आशाबन्धः कुसुमसदृशं प्रायशो ह्यङ्गनानां
सद्यःपाति प्रणयि हृदयं विप्रयोगे रुणद्धि ॥९॥

मन्दं मन्दं नुदति पवनश्चानुकूलो यथा त्वां
वामश्चायं नदति मधुरं चातकस्ते सगन्धः ।

धूमाग्नीचा पवनसलिलीं मेळ तो मेघ कोठे
वार्ता नेणें समुचित कुठे सेंद्रिय प्राणियांते ।
उत्कंठेने नच गणुनि हें गुह्यकें प्रार्थिलें त्या
कामार्तांना जड अजड हें भान नाहीच जात्या ॥५॥

जन्मा येशी सुविदित कुळीं पुष्करावर्तकांच्या
इच्छारूपी अमरपतिच्या तूं शिरीं सेवकांच्या ।
दुर्दैवें मी स्वजनविरहीं यामुळे तूज याचीं
'ना' श्रेष्ठाची तरिहि बरवी 'हो' नको दुर्जनांची ॥६॥

संतप्तांचा अससि जलदा आसरा तूं, निरोप
कान्तेला दे, विरह घडवी आमुचा स्वामि-कोप ।
यक्षेशांचें नगर अलका तेथ जा, सौध जेथ
बाह्योद्यानीं वसत हर तच्चंद्रिका द्योतवीत ॥७॥

वातारूढा बघतिल तुला पान्थदारा स्वहस्तें
केशाग्रांना उचलुनि, मनीं धीर येई तयांतें ।
येसी जेव्हा कवण विरही स्त्रीस सोडोनि राही
माझें तैसें परवश जिणें निश्चयें ना कुणाही ॥८॥

मार्गान्तीं ती खचित तुजला भ्रातृजाया दिसेल
आहे जीवा धरुनि, दिवसां मोजुनि भर्तृशील ।
स्त्रीचें प्रेमी हृदय विरहीं जें फुलांचें समान
जावें प्राया झणि गळुनि त्या ठेवि आशा धरून ॥९॥

प्रेरी मार्गीं हळु हळु तुला वायु जैसा सुखाचा
वामांगाने मधुर-रव हो संगती चातकाचा ।

गर्भाधानक्षणपरिचयान्नूनमाबद्धमालाः
सेविष्यन्ते नयनसुभगं खे भवन्तं बलाकाः ॥ १० ॥

कर्तुं यच्च प्रभवति महीमुच्छिलीन्ध्रामवन्ध्यां
तच्छ्रुत्वा ते श्रवणसुभगं गर्जितं मानसोत्काः ।
आ कैलासाद्बिसकिसलयच्छेदपाथेयवन्तः
सम्पत्स्यन्ते नभसि भवतो राजहंसाः सहायाः ॥ ११ ॥

आपृच्छस्व प्रियसखममुं तुङ्गमालिङ्ग्य शैलं
वन्द्यैः पुंसां रघुपतिपदैरङ्कितं मेखलासु ।
काले काले भवति भवतो यस्य संयोगमेत्य
स्नेहव्यक्तिश्चिरविरहजं मुञ्चतो बाष्पमुष्णम् ॥ १२ ॥

मार्गं मत्तः शृणु कथयतस्त्वत्प्रयाणानुरूपं
सन्देशं मे तदनु जलद श्रोष्यसि श्रव्यबन्धम् ।
खिन्नः खिन्नः शिखरिषु पदं न्यस्य गन्तासि यत्र
क्षीणः क्षीणः परिलघु पयः स्त्रोतसां चोपयुज्य ॥ १३ ॥

अद्रेः शृङ्गं हरति पवनः किंस्विदित्युन्मुखीभि-
र्दृष्टोत्साहश्चकितचकितं मुग्धसिद्धाङ्गनाभिः ।
स्थानादस्मात्सरसनिचुलादुत्पतोदङ्मुखः खं
दिङ्नागानां पथि परिहरन् स्थूलहस्तावलेपान् ॥ १४ ॥

रत्नच्छायाव्यतिकर इव प्रेक्ष्यमेतत्पुरस्ता-
द्वल्मीकाग्रात्प्रभवति धनुःखण्डमाखण्डलस्य ।
येन श्यामं वपुरतितरां कान्तिमापत्स्यते ते
बर्हेणेव स्फुरितरुचिना गोपवेशस्य विष्णोः ॥ १५ ॥

गर्भाधान-क्षण उमजुनी अंतरिक्षीं, सुरेखा
तूझ्या संगें उडतिल नभीं मालिकेने बलाका ।। १० ।।

जी पृथ्वीला सफल करिते उद्‌गतें कन्दजातें
ती ऐकोनी श्रुतिसुख तुझी गर्जना, मानसातें ।
उत्कंठेने निघुनि मिळती सोबती राजहंस
कैलासाच्या पथिं, कमलिनी-तन्तु पाथेय ज्यांस ।। ११ ।।

आलिंगावा प्रणयि निघतां उंच हा अद्रिमित्र
पार्श्वीं ज्याच्या उमटलि पदें राघवाचीं पवित्र ।
तुम्ही दोघें उचित समयीं भेटतां तों कळोनी
येई प्रेमा चिर-विरहिचीं उष्ण बाष्पें गळोनी ।। १२ ।।

ऐकें मार्ग प्रथम कथितों जो तुवां आक्रमावा
तो संदेश श्रवणिं मग जो लक्ष देतां रमावा ।
जेव्हा जेव्हा श्रमसि पथिं घे अद्रिशृंगीं विसावा
येतां ग्लानी उदक हलकें पी नद्यांचें सुखें वा ।। १३ ।।

"वारा नेई गिरिशिखर हें" ! मुग्ध ऐशा विचारीं
डौला तूझ्या बघति चकिता उन्मुखी सिद्ध नारी ।
सोडीं स्थाना सरस-निचुला या, निघें उत्तरेला
दिङ्नागांची पथिं चुकवुनी स्थूल हस्तावहेला ।। १४ ।।

नाना रत्नें झळकति जणूं एकठायीं समोर
अर्धें इन्द्रायुध वरि निघे वारुळांतूनि दूर ।
त्या योगाने जलधर निळा फार तूं शोभशील
पिच्छें जैसा रुचिर शिखिच्या सांवळा नंदबाळ ।। १५ ।।

त्वय्यायत्तं कृषिफलमिति भ्रूविकारानभिज्ञैः
प्रीतिस्निग्धैर्जनपदवधूलोचनैः पीयमानः ।
सद्यःसीरोत्कषणसुरभिक्षेत्रमारुह्य मालं
किञ्चित्पश्चाद्व्रज लघुगतिर्भूय एवोत्तरेण ।। १६ ।।

त्वामासारप्रशमितवनोपप्लवं साधु मूर्ध्ना
वक्ष्यत्यध्वश्रमपरिगतं सानुमानाम्रकूटः ।
न क्षुद्रोपि प्रथमसुकृतापेक्षया संश्रयाय
प्राप्ते मित्रे भवति विमुखः किं पुनर्यस्तथोच्चैः ।। १७ ।।

छन्नोपान्तः परिणतफलद्योतिभिः काननाम्रै-
स्त्वय्यारूढे शिखरमचलः स्निग्धवेणीसवर्णे ।
नूनं यास्यत्यमरमिथुनप्रेक्षणीयामवस्थां
मध्ये श्यामः स्तन इव भुवः शेषविस्तारपाण्डुः ।। १८ ।।

तस्मिन् स्थित्वा वनचरवधूभुक्तकुञ्जे मुहूर्तं
तोयोत्सर्गद्रुततरगतिस्तत्परं वर्त्म तीर्णः ।
रेवां द्रक्ष्यस्युपलविषमे विन्ध्यपादे विशीर्णां
भक्तिच्छेदैरिव विरचितां भूतिमङ्गे गजस्य ।। १९ ।।

तस्यास्तिक्तैर्वनगजमदैर्वासितं वान्तवृष्टि-
र्जम्बूकुञ्जप्रतिहतरयं तोयमादाय गच्छेः ।
अन्तःसारं घन तुलयितुं नानिलः शक्ष्यति त्वां
रिक्तः सर्वो भवति हि लघुः पूर्णता गौरवाय ।। २० ।।

नीपं दृष्ट्वा हरितकपिशं केसरैरर्धरूढै-
राविर्भूतप्रथममुकुलाः कन्दलीश्चानुकच्छम् ।

तूझ्या हातीं कृषिफल असें जाणुनी लक्षितील
तूतें प्रेमें कृषक–वनिता नेत्र ज्यांचे अलोल ।
मालक्षेत्रें चढ उखळितां नांगरें ज्या सुवास
डावा थोडा वळ, मग पुन्हा शीघ्र जा उत्तरेस ॥ १६ ॥

दावाग्नीला शमवुनि जसा खिन्न चालून वाट
येसी तेव्हा तुज गिरि शिरीं घेतसे आम्रकूट ।
आभारातें विसरत नसे क्षुद्रही आश्रयाला
येतां मित्र स्मरण न कसें त्या परी श्रेष्ठशीला ॥ १७ ॥

वन्याम्रांचा बहर उजळी अद्रिला अंगि अंगीं
काळा केशासम जंव तिथें होसि आरूढ शृंगीं ।
देवद्वंद्वें गणतिल मनीं शैल तो त्या सुयोगीं
अग्रीं श्याम स्तन अवनिचा गौर शेषीं विभागीं॥ १८ ॥

थांबें शैलीं अचिर, शबरी सेविती कुंज जेथे
होतां वृष्टि त्वरित पुढच्या आक्रमावें पथातें ।
रेवा वाहे उपलविषमीं विन्ध्यपादीं विशीर्ण
शृंगाराचे जणुं करिवरी रेखिले भिन्नवर्ण ॥ १९ ॥

वर्षोनीया वनगजमदें उग्र ज्या गन्ध येई,
कुण्ठे जम्बूवनिं, जल तिचें सेवुनी मार्ग घेई ।
अन्तःसारा तुज हलविण्या वायुची काय शक्ति
सम्पन्नाची महति, अवघे रिक्त ते तुच्छ होती ॥ २० ॥

नीपा अर्धे खुलुनि करिती केसर श्यामरक्त
आर्द्र स्थानीं प्रथमकलिका कर्दळीं नाहि येत ।

दग्धारण्येष्वधिकसुरभिं गन्धमाघ्राय चोर्व्याः
सारंगास्ते जललवमुचः सूचयिष्यन्ति मार्गम् ॥२१॥

उत्पश्यामि द्रुतमपि सखे मत्प्रियार्थं यियासोः
कालक्षेपं ककुभसुरभौ पर्वते पर्वते ते ।
शुक्लापांगैः सजलनयनैः स्वागतीकृत्य केकाः
प्रत्युद्यातः कथमपि भवान्गन्तुमाशु व्यवस्येत् ॥२२॥

पाण्डुच्छायोपवनवृतयः केतकैः सूचिभिन्नै-
र्नीडारम्भैर्गृहबलिभुजामाकुलग्रामचैत्याः ।
त्वय्यासन्ने परिणतफलश्यामजम्बूवनान्ताः
सम्पत्स्यन्ते कतिपयदिनस्थायिहंसा दशार्णाः ॥२३॥

तेषां दिक्षु प्रथितविदिशालक्षणां राजधानीं
गत्वा सद्यः फलमपि महत्कामुकत्वस्य लब्धा ।
तीरोपान्तस्तनितसुभगं पास्यसि स्वादु यत्र
सभ्रूभङ्गं मुखमिव पयो वेत्रवत्याश्चलोर्म्याः ॥२४॥

मृद्‌गंधातें, दरवळत जो, हुंगुनी काननांत
मार्गा तूझ्या हरिण चरतां दाविती वृष्टि जेथ ॥२१॥

तूं मत्कार्यावरि जरि सख्या सिद्ध वेगें निघाया
शैलीं शैलीं सुरभि–कुटजीं वेळ जाईल वायां ।
केकाशब्दें सजलनयन स्वागतातें मयूर
येतां, यत्नें झडकरि पुढे चालण्या हो तयार ॥२२॥

उद्यानांचीं धवल फुलती कुंपणें केतकीचीं
वृक्षीं वृक्षीं घडति घरटीं मार्गि काकादिकांचीं ।
काळा जम्बूफलभर खुले माळव्याच्या वनांस
त्वत्सान्निध्यें गमनसमया जाणिती राजहंस ॥२३॥

ख्याता साऱ्या जगतिं विदिशा राजधानी तयाची
तेथें पावें झणि सफलता तूं विलासीपणाची ।
तीरीं पीतां गरजुनि जला बेटवेच्या रसाळा
सभ्रूभंगा युवतिवदना कीं जणूं वीचिलोला ॥२४॥

परिशिष्ट दुसरें

यादव नृपति रामचंद्राचा रामटेक येथील शिलालेख

हा शिलालेख लक्ष्मणाच्या देवळाच्या सभामंडपांत गर्भगृहाच्या पुढील भिंतींत दरवाजाच्या उजव्या बाजूस बसविला आहे. या शिलालेखाचा उल्लेख जनरल **कनिंगहॅम**चा सहाय्यक **बेग्लर** यानें प्रथम केलेला आढळतो. हा सन १८७३–७४ सालीं रामटेकास गेला होता. त्याला शेवटच्या प्राकारांत जाऊं दिलें नव्हतें. तथापि आपल्या हिंदु नोकरांकडून त्यानें लेखाचा छाप काढविला. त्यांत रामदेव हें नांव त्यास आढळलें.[१] तथापि हा लेख कोणी व कशाकरितां कोरविला याची कांहींच माहिती त्याला देतां आली नाही.[२] यानंतर डॉ. **फ्लीट**मार्फत प्रस्तुत शिलालेखाचा एक अस्पष्ट छाप प्रसिद्ध पुरातत्त्वज्ञ प्रो. **कीलहॉर्न** यास मिळाला. तो छाप अस्पष्ट असल्यानें कीलहॉर्नला तो संबंध वाचतां आला नसावा. तथापि त्यांतील **सिंहण** व **रामचंद्र** हीं राजांचीं नांवें त्याला दिसलीं. हीं नांवें **हैहय** वंशाच्या रायपूर शाखेंतील राजांच्या नामावलींत दिसत असल्यानें हे राजे **कलचुरि** किंवा हैहय-वंशाचे असावे असें एपिग्राफिया इंडिकामधील हरिब्रह्मदेवाच्या खलारी येथील लेखाचें संपादन करतांना त्याने म्हटलें आहे.[३] त्यानंतर **कझेन्स्** सन १९०३–४ मध्यें रामटेकास गेला होता, पण त्यासहि आंत जाऊं न दिल्यानें प्रस्तुत शिला-लेखाविषयीं कांहीं माहिती त्याला देतां आली नाहीं. या लेखाचा शेवटचा उल्लेख मध्यप्रान्तांतील प्रसिद्ध पुरातत्त्वज्ञ कै. रायबहादूर डॉ. **हीरालाल**

१. हें नांव एकसष्ठाव्या ओळींतील असावें. पण तेथे तें श्रीरामचंद्राचें वाचक आहे.

२. कनिंगहॅम–आर्किआलॉजिकल सर्व्हे रिपोर्ट, व्हॉ. ७, पृ. ११२ पाहा.

३. ए. इं., व्हॉ. २, पृ. २३० पाहा.

यांनीं आपल्या मध्यप्रांत–वऱ्हाड यांतील कोरीव लेखांच्या सूचींत केला आहे.[१] याप्रमाणें अनेकदा या शिलालेखाचा निर्देश केला असला तरी कोणी तो समग्र छापला नव्हता. त्यामुळें त्यांतील माहितीबद्दल अनेकांचा गैरसमज झाला होता. या लेखाचें यादवकालीन इतिहासांत महत्त्व जाणून माझे मित्र प्रा. ल. रा. कुळकर्णी व मी अनेकदा रामटेकला गेलों आणि आम्ही तो लेख साफ करून त्याचें वाचन प्रास्ताविक माहितीसह 'सरदेसाई स्मारक ग्रंथां'त (पृ. ११५–१३४) प्रसिद्ध केलें. त्यांतील महत्त्वाचा भाग येथे दिला आहे.

वर्णन– वर लिहिल्याप्रमाणें प्रस्तुत लेख लक्ष्मणाच्या देवळांत गर्भगृहाच्या दरवाजाच्या उजव्या बाजूस भिंतींत बसविलेल्या दगडावर कोरलेला आहे. आरंभीं हा लेख फार मोठा असावा पण सध्या त्याच्या फक्त ७५ ओळी दिसतात. त्यांनीं २ फूट ६ इं. रुंद व ३ फू. १ इं. उंच इतकी जागा व्यापिली आहे. या लेखाचे दोन भाग पडतात. पहिल्यांत १ ते ३१ ओळी व दुसऱ्यांत ३२ ते ७५ ओळी येतात. हे दोन भाग ३१ व्या व ३२ व्या ओळींत 'ळ'काराकृति चिन्हें काढून निरनिराळे दाखविले आहेत. शिलेचा पृष्ठभाग अनेक ठिकाणीं–विशेषत: वर, खालीं व डाव्या बाजूस, खराब झाल्याने लेख त्रुटित झाला आहे. या लेखाच्या आरंभीं एका राजवंशाचें व त्यांतील पुरुषांनीं केलेल्या पराक्रमाचें वर्णन केलें होतें, पण हा भाग फारच खराब झाल्यानें त्यांतील बहुतेक ऐतिहासिक माहिती आतां नष्टप्राय झाली आहे. दुसऱ्या भागांत रामटेकच्या देवळांचें व तीर्थांचें वर्णन आलें आहे. यांतील आरंभींचा भाग बराचसा शाबूत आहे, पण खालचा भाग पुन: अतिशय खंडित झाला आहे.

लिपी व भाषा– या लेखाची लिपी इ. स. च्या बाराव्या तेराव्या शतकांतील नागरी आहे. पृष्ठमात्रांचा अनेक ठिकाणीं उपयोग केला आहे. 'रि' बद्दल ऋ, व च्या ठिकाणीं ब, ष बद्दल ख, आणि ख बद्दल ष

---

१. पहिली आवृत्ति (१९१६), पृ. ३–४; दुसरी आवृत्ति (१९३२), पृ. ३.

लिहिलेले अनेक ठिकाणीं आढळतात. क व प यांच्या पूर्वीं येणाऱ्या विसर्गाबद्दल ष् चा उपयोग केलेला आहे. कांहीं ठिकाणीं अवग्रहाचें चिन्ह कोरलें आहे.

विषय– या लेखाच्या पहिल्या चार ओळींतील बहुतेक सर्व शब्द नाहींसे झाल्यानें त्यांतील मजकुराचा पत्ता लागत नाहीं. पांचव्या ओळीत **'यादवो वंशः'** व **'[य]दुवंशजः'** हे शब्द येतात, त्यावरून ज्या राजाच्या कारकीर्दींत हा लेख कोरविला गेला तो स्वतःस यादववंशी म्हणवीत असे, हें उघड आहे. या वंशांतील एका राजाच्या पराक्रमाचें वर्णन पुढील ओळींत आलें होतें. पण त्यापैकी **रुद्र** (ओळ ७) **अंध्राधिप व चोल** (ओ. ८) व कदाचित् **गुर्जरेन्द्र** (ओ. ९) एवढींच त्याच्या शत्रूंचीं नांवें शिल्लक आहेत. नवव्या ओळीच्या शेवटीं **'जैत्र'** असा शब्द आला आहे तो **जैत्रपाल** या नांवाचा अवशेष असावा. पंधराव्या ओळींत सिंहणाचा उल्लेख त्याच्या नंतरच्या राजांच्या वर्णनांत ओघांत आला आहे. सिंहणाचें नांव १३ व्या ओळींतहि आलें असावें; पण त्याचीं पहिलीं दोन अक्षरें फुटून गेलीं आहेत. सोळाव्या ओळींत **श्रीराघव** नामक अधिकाऱ्याची वंशावळ सुरू होते. तो **वायिनायक** नांवाच्या गृहस्थाचा नातू होता. सतराव्या ओळींत असें म्हटलें आहे कीं, श्रीरामचंद्रराजानें आपल्या साम्राज्यांतील समृद्धीमुळें सुंदर दिसणाऱ्या लक्ष्मीला या राघवाच्या स्वाधीन केलें व तो स्वतः क्रीडोद्यानांत अखिलकलानिपुण अशा स्त्रियांच्या सहवासांत रममाण झाला. अठराव्या व एकोणिसाव्या ओळींतहि याच राघवाचा शय्यापाल म्हणून उल्लेख आलेला दिसतो. त्याची पत्नी **राजायी** हिचें नांव १९ व्या ओळींत आलें आहे. एकदां या राघवानें आपल्या गुरूस प्रश्न केला कीं, "भगवन्, आपणांस सर्व माहीत आहे. तेव्हां हा अगाध संसारसागर तरून जाण्यास योग्य असा एखादा उपाय मला सांगावा." त्यावर, "विष्णूच्या भक्तीशिवाय दुसरा उपाय नाहीं" असें त्या गुरूनें उत्तर दिलें. व नंतर या टेकडीवरील आजूबाजूच्या देवळांचें व तीर्थांचें वर्णन केलें. लेखाच्या पहिल्या भागांत रामटेकच्या चारी बाजूच्या घंटेश्वर, सुधेश्वर, केदार व आंजनेय या चार देवळांचा उल्लेख आला आहे. दुसऱ्या भागांत सिंदूरगिरि-

माहात्म्यांतल्याप्रमाणें रामगिरीवरील व त्याच्या सभोंवतालच्या देवळांचें व तीर्थांचें वर्णन केलें आहे. यांतील बरींचशीं सिंदूरगिरिमाहात्म्यांत व कांहीं महानुभावांच्या स्थानपोथींतहि वर्णिलेलीं आढळतात. या सर्व उल्लेखांवरून व स्थानिक माहितीवरून त्यांतील बहुतेकांचें स्थानहि निश्चितपणें ठरवितां येतें. तसा प्रयत्न या लेखाच्या शेवटीं देवळांच्या व तीर्थांच्या यादींत केला आहे.

चर्चा--मागे सांगितल्याप्रमाणें खलारी येथील शिलालेखाचें संपादन करीत असतां कील्हॉर्ननें प्रस्तुत शिलालेखाचा उल्लेख केला आहे. त्यांतील सिंहण व रामचंद्र हे राजे, खलारी लेख ज्या हरिब्रह्मदेव नामक हैहयवंशी राजाच्या कारकीर्दींत कोरविला होता, त्याचे अनुक्रमें पितामह व पिता असावे, असें त्याला वाटलें व त्यावरून कलचुरि किंवा हैहयवंशी राजांचें राज्य पश्चिमेस नागपूर प्रांतापर्यंत पसरलें होतें, असा निष्कर्ष त्यानें काढला. पण हा लेख समक्ष पाहण्याची संधि कील्हॉर्नला मिळाली नव्हती. या लेखाचा एक अस्पष्ट छापच त्याच्यापुढें होता. आज शेंकडों वर्षें या लेखाला तेलाचीं, काजळीचीं व चुन्याचीं पुटें बसलीं असल्यानें त्याचीं अवशिष्ट अक्षरेंहि बहुतेक बुजून गेलीं आहेत. त्यामुळें त्यांचा चांगला छाप घेतां येत नाहीं व घेतलेल्या छापावरून लेख वाचणें अत्यंत कठिण जातें. रायबहादुर हीरालालनीं हा लेख समक्ष पाहिला होता व त्यांत त्यांना **यादवो वंशः** हीं अक्षरेंहि दिसलीं होतीं. पण यांत देवगिरीच्या यादवांचें वर्णन आलें असावें असें न मानतां कील्हॉर्नच्या मताचाच अनुवाद त्यांनीं केला आहे व हैहयवंशी राजे हे यदूच्या वंशांतील असल्यानें त्यांस यादव मानण्यांत हरकत नाहीं, असें त्यांनीं प्रतिपादिलें आहे. **यदु**, नंतर त्याचा मुलगा **सहस्रजित्** व त्यानंतर **हैहय**, अशी वंशावळ पुराणांत आढळत असल्यानें हैहय हे यदुवंशज होते, यांत संशय नाहीं. पण रूढीमुळें यादव हें नांव यदूचा दुसरा मुलगा **कोष्टु** ह्याच्या वंशजांनाच प्राचीन काळापासून लावण्यांत आलें आहे.[१] कलचुरि राजांचें साम्राज्य उत्तर हिंदुस्थानांत दहाव्या व

१. पार्जिटर याचें **Ancient Indian Historical Tradition**, पृ. ८७ पाहा.

अकराव्या शतकांत दूरवर पसरलें होतें व त्या वंशाच्या दोन शाखा मध्यप्रांताच्या पूर्वेकडील छत्तीसगड या भागांत रत्नपुर व रायपूर येथे मराठ्यांची सत्ता स्थापित होईपर्यंत राज्य करीत होत्या. हे राजे आपणांस हैहयवंशी म्हणत. त्यांचे अनेक लेख सांपडले आहेत, पण त्यांतील एकांतहि त्यांनीं आपणास यादव म्हटलें नाहीं किंवा आपल्या पूर्वजांच्या यादींत यदूचा उल्लेख केला नाहीं. तेव्हां रामटेकच्या शिलालेखांतील राजे आपण यादव म्हणवीत असल्यानें ते हैहय असणें संभवनीय नाहीं. शिवाय, हैहयवंशी राजांच्या नामावळींत जैत्रपाल ह्यासारखें नांव कोठेंहि आढळत नाहीं. हें नांव या लेखांत नवव्या ओळीच्या अखेरीस आलें असावें, हें वर दाखविलें आहे. शिवाय प्रस्तुत लेखांत निर्दिष्ट केलेलें सिंहण व रामचंद्र हे राजे हैहयवंशी होते, असें मानण्यांत सर्वांत मोठी अडचण येते ती ही कीं, छत्तीसगढांत चौदाव्या पंधराव्या शतकांत रायपूर येथें राज्य करणाऱ्या या राजांनीं किंवा त्यांच्या पूर्वजांनीं रुद्र, अंध्राधिप, चोल, गुर्जरेंद्र या राजांवर कधीं जय मिळविल्याचें त्यांच्या किंवा इतरांच्या लेखांतहि नमूद नाहीं. कारण हे राजे दुर्बल असून यांचें राज्य सामान्यतः रायपूर जिल्ह्याच्या पलीकडे चौदाव्या पंधराव्या शतकांत पसरलेलें दिसत नाहीं. शिवाय या शतकांत रुद्र नांवाचा कोणी राजा राज्य करीत होता, असेंहि दिसत नाहीं त्यामुळें प्रस्तुत लेखांतले सिंहण व रामचंद्र हे राजे हैहयवंशी होत, हें कील्हॉर्न व हीरालाल यांचें मत बरोबर दिसत नाहीं.

याच्या उलट सिंहण व रामचंद्र ही नांवें देवगिरीच्या यादव वंशांतील प्रतापी राजांची म्हणून प्रसिद्ध आहेत. हे राजे इ. स. च्या तेराव्या शतकांत राज्य करीत होते. नवव्या ओळीच्या शेवटीं आलेलें जैत्रपाल हें नांव सिंहणाच्या पित्याचें दिसतें. सातव्या आठव्या ओळींत रुद्र, अंध्राधिप, चोल वगैरे नांवें जैत्रपाल राजाच्या पराक्रमाच्या वर्णनांत आलेलीं दिसतात. कारण **हेमाद्रीचा** व्रतखंड [१] रामदेवरावाचा पैठणचा ताम्रपट [२] इत्यादिकां-

१. तिलंगाधिपतेः पशोर्विशसनं रौद्रस्य रौद्राकृतेः । कृत्वा पूरुषमेधयज्ञविधिना लब्धस्त्रिलोकीजयः ।।

२. इंडियन् अँटिक्वरी, व्हॉ. १४, पृ. ३१६.

वरून जैत्रपालानें काकतीयवंशी रुद्रदेवाचा पराभव करून त्याच्या पुतण्यास गादीवर बसविलें, असें वर्णन आढळतें. रुद्र राजाचा कांहीं ठिकाणीं अंध्र म्हणूनहि उल्लेख आढळतो. त्यामुळें प्रस्तुत लेखांतील जैत्रपाल, सिंहण व रामचंद्र हीं नांवें यादववंशी राजांचींच होत, असें निर्विवादपणें म्हणतां येतें. यादवांचें राज्य मध्यप्रांतांत पूर्वेस बालाघाट जिल्ह्यांतील **लांजी** या गांवापर्यंत पसरलें होतें, हें लांजी येथील शिलालेखावरून स्पष्ट दिसतें. हा शिलालेख सध्या नागपूरच्या संग्रहालयांत ठेवला असून त्यांत रामदेवरावाचा उलेख आहे.

यादवांच्या इतर लेखांवरून सिंहणाच्या नंतर त्याचा नातू **कृष्ण** हा गादीवर बसला असें दिसतें. पण त्याचें नांव या लेखाच्या अवशिष्ट भागांत आढळत नाहीं. तथापि तें पंधराव्या ओळींत आलें असावें, असें अनुमान करतां येतें, कारण त्या ओळींत आपल्या सुराज्यानें त्यानें पृथ्वीला सिंहण राजाचा वियोग भासूं दिला नाहीं असें एका राजाविषयीं म्हटलें आहे, तें अर्थातच सिंहणाचा उत्तराधिकारी कृष्ण याबद्दलच असावें. कृष्णाचा बंधु **महादेव** व त्याचा मुलगा **आमण** यांचीं नांवें या लेखांत आलीं होतीं, असें वाटत नाहीं. यानंतर मागें सांगितल्याप्रमाणें कृष्णाचा मुलगा **रामचंद्र** राजा याचें नांव १८ व १९ या ओळींत आलें आहे. हा रामचंद्र म्हणजे **श्रीज्ञानेश्वरांचा** समकालीन राजा **रामदेवराव** यादव होय.

प्रस्तुत शिलालेख अनेक ठिकाणीं खंडित झाल्यामुळें तो कोरविण्यांत काय उद्देश होता, हें सांगणें कठिण आहे. तथापि १६ व १७ या ओळींत श्रीराघव नांवाच्या अधिकाऱ्याची वंशावळ दिली आहे. व त्यावर राज्याचा भार टाकून रामचंद्र राजा विलासमग्न झाला असें म्हटलें आहे. पुढें ६३ व्या ओळींत कांहीं विशिष्ट काम केल्यावर या राघवाला कृतकृत्य वाटलें असें वर्णन आलें आहे. त्यावरून या लेखाचा उद्देश राघवाची रामटेक येथील कामगिरी--कदाचित् लक्ष्मणाच्या देवळाचा जीर्णोद्धार--नमूद करण्याचा दिसतो. ७० व ७१ या ओळींत माइदेव नांवाच्या अधिकाऱ्याचा उल्लेख आहे. तो उपरिनिर्दिष्ट राघवाचा रामटेकला नेमलेला अधिकारी असावा.

ओळ	वाचन[1]
१	. . . . णु . . . . मवाङ्मु . . . .
२	. . . . पूजित . . . . स्तत्वे (त्वे) न . . . .
३	. . . . देवासुरोर[ग*] . . . . वचरितो . . . .
४	. . . कः सुकविसार्थपथे प्र[विष्ट*] . . . ज्योत्स्नाप्र . . . .
५	. . . युग्मः ।। ततोभूद्यादवो वंशः . . . किं वर्ण्यतेऽ[यं*] . . . . . [य]दुवंशजः . . .
६	. . . (क्षो) णिपालष्काल:[2] प्रोद्यद्वैरिवीर . . . . जंभशत्रुः । भ्रश्यत्कलंकविधुम . . .
७	. . . यस्यातिभीषणरणांगण . . . मंडलमिदं स्मरति स्म रुद्रको[ला ?] . . .
८	. . . लीवनालीतलग(?)भुजगवा . . . त्वमंध्राधिप त्वं रे चोड विमुंच द(र्पं) . . . धरानाथप्रबोध . . .
९	. . . षि(खि)लभूपतीनां शिर[स्सु ?] . . . [गुर्ज* ?]रेन्द्रः पराङ्मुखो यस्य पुरो रणेऽभूत् . . . हेषु महामहीन्द्रे जैत्र . . .
१०	. . . र्यदस्त्रप्रभिन्नप्रतिभटविक्र[म ?] . . . [मौक्ति*]कौघैर्गगनमिव सतारं संध्यया स . . . [क]रोत्कराणां सौंदर्यस्य . . .
११	. . . [क्षो ?]णिपतेरस्य भूमिपालो . . . हासिनिहतोत्कटप्रतिभटेभकुंभद्वयीपट्टद्यु . . . कमुक्ताच्छलात् । अमुष्य . . .

१. मूळ लेखावरून. या वाचनांतील दुरुस्त्या अर्धचंद्राकृति कंसांत व अस्पष्ट अक्षरें चतुष्कोणी कंसांत दाखविलीं आहेत. एखादें अक्षर लेखांत गळलें असल्यास तें चतुष्कोणी कंसांत देऊन त्याला तारकांकित केलें आहे.

२. 'क्षोणिपालऽकाल:' असें वाचावें.

१२ . . . महीरुहस्य यशसा चंद्र . . . वाचस्पतेः । तेजोभिर्दिनकृद्रुचामपि हठादा[धि]क्य . . . द्रालयभोगभूमिरभवत्काल . . .

१३ . . . [घं][1]ण देवनामा गुणाभि . . . कृष्टचंडकोदंडमुक्तैः शितकांड-दंडैर्विष(ख)ण्डितारक्त . . . देहषं(खं)डैरमंडि क्षितिराहवस्य । . . .

१४ . . . [मा]साद्य शान्तिं परसामवाप . . . जगतीं क्षितीशः । शशाश(स)विश्रामतरुस्ततो[2] यष्फलेग्रहिर्याचकपत्रिपंक्तेः ।। धराचक्रं भ्रांत्वा तृ(त्रि)दश . . .

१५ . . . धिष्ठाय रचयत्यहो नृत्यत्क[बंध*] . . . अपारसंसारसमुद्र-सारैर्यशःसुधौघैर्वसुधा यदीयैः । श्रीसिंहणक्षोणिपतेर्वियोगतापं जहौ ।।

१६ . . . [म*]हीतले । वायिनायक इति क्षमातले नि . . . द्यशोभरैः । तत्सुतः सकललोकविश्रुतो न श्रुतः क्वचिदपीह यत्समः ।। तस्याप्ययं राघवदेवनाम्ना . . .

१७ . . . [गु]णगौरवप्रणयिनं श्रीरामचंद्रः प्रभुर्यं साम्राज्यसमृद्धिसुंदररुचः पात्रं विधाय श्रियः । क्रीडोद्यानतलेऽषि(खि)लोज्ज्वलकलालीला-गृहस्त्रीजनालाप . . .

१८ . . . श्रीरामभूपत्वधरस्य शय्यापालीकृतात्मानममानसत्वं(त्त्वम्) ।। श्रीवैद्यनाथशिवपादपयोजभक्तिसंपादिताषि(खि)लमहत्व(त्त्व)पदाय तस्मै । के के नृपा ज . . .

१९ . . . तिर्द्धीरं क्षांतिरपि प्रधानकुलजं श्रद्धा तथा सात्वि(त्त्वि)कं(कम्) । तद्वद्भूषयति स्म यं पृ(प्रि)यतमा सौभाग्यसौंदर्यभू राजायीति गुणाश्रया गुणगणाधारं धरा . . .

२० . . . दिनकृद्दिनकृद्यु(द्यु)तिं(तिम्) । गुरुत्मात्मीयमित्येष प्रपच्छ तदनु द्विजम् । जानासि सर्व्वं भगवंस्ततस्त्वां पृच्छानि पर्युत्सुकता-मुपेतः । अगाधसंसारपयोधि . . .

---

१. 'सिंघणदेवनामा' असें वाचावें.

२. यष्फलेग्रहि असें वाचावें.

२१ . . . षि(खि)लपारदृश्वा ।। शय्यापालकुलाधीश निबोधेदं वचो मम। संसारसागरोत्तारकारणं न हरेः परं(रम्) । अवतारा दशाप्यस्य रामस्ते[षां ?] . . .

२२ . . . वायुपुत्रयुक्तो वसत्युत्तमयोगिचिन्त्यः। महीधरस्यास्य तपंगिरेस्तं[1] प्रभावमग्र्यं किमुदाहरामि । विहाय मे . . .

२३ . . . साद्य रघूद्वहस्य ।। प्रागत्रदेवो नृहरिः सुरारेर्वि[बि]भेद वक्षः करजैः शिताग्रैः । तद्रक्तपूरारुणितस्ततो यं . . .

२४ . . . [गु]णकथां सौंदर्यसारैः पुनस्तद्वद्वक्तुममुं वृ[बृ]हस्पतिसमोऽप्यन्यो हि जानाति कः । पपौ समुद्रं चुलुकेन यस्तं मुनी[श ?]

२५ . . . मनो मृदु . . . [रा*]मेश्वर इतीह कीर्त्यते । श्रीरामाय मुनीश्वरः कलशभूर्मध्येसभं व्र(ब्र)ह्मणः । श्रुत्वैतस्य गिरेः प्र[भाव-]

२६ . . . विलोक्य सादरं जन्तुर्मुच्यते व्र(ब्र)ह्महत्यया । गोविप्रवा-(बा)लप्रमदावधादिपापौघपूर्णा अ . . .

२७ . . . लयपर्वतेंद्रे । कृतोपवासा हरिवासरे ये कुर्व्वन्ति रात्रौ रघुनन्दनाग्रे । तपंगिरौ जागर[णं*] . . .

२८ . . . मराधिकाभैः ।। घंटेश्वरं चैव सुधेश्वरंच केदारमीशं च तथांजनेयं(यम्)। द्वारेश्वरं . . .

२९ . . . [म]ज्जनेन दुरितं निर्धूय वं(बं)धच्छिदा स्वाच्छंद्यं मनुजा भजंति भवने भर्गस्य यत्तत्परं(रम्) ।। म . . .

३० . . . प्रभावं । शक्नोति वक्तुं न गुरुः सुराणामन्यस्य तत्कस्य . . .

३१ . . . श्रीशंष(ख)नाम्नि ൩ ൩ ൩ तृ(त्रि)भुवनजनतापूज्यपादारविंदं स्नात्वा श्री . . .

---

१. 'तपोगिरेस्तं' असें वाचावें. सिं. मा. च्या छापील पोथींतहि 'तपंगिरि' असेंच नांव दिसतें. पण दुसऱ्या हस्तलिखित बृहत्सिंदूरगिरिमाहात्म्यांत 'तपोगिरि' असें शुद्ध नांव दिलें आहे.

३२ . . . ៷ ៷ ៷ लत्य(?)नलां समयमभयः शंखपाण्यंतिकस्थः ।।
तामग्नितीर्थप्रभवां विभूतिं

३३ . . . [अ*]म्व(म्ब)तीर्थे नरः स्नात्वा पूजयित्वांवि(बि)कापतिं-
(तिम्) । अंवि(बि)कानाथसदने याति भोगैकभूमितां(ताम्) ।।
अधिगम्य वरुणतीर्थं

३४ . . . ៷ ៷ वरुणादिलोकपालैर्व्वंदितचर[णं] . . . . . . स्व(?)
रिशरणं । यत्शुल्कतीर्थेऽप्यभिषेकभाजां जायेत पुन्यं(ण्यं)
नरपुंगवानां । तदश्वमेधादिमहामषा(खा)नामोघैर्न लभ्यं न तपोभि–

३५ ៷ रुग्रैः ।। ती(र्थे)नृसिंहस्य कथं[चि*]दाद्यैः पु[ण्यैः*]समासाद्य
विशुद्धमूर्त्तेः । नरस्य लोकतृ(त्रि)तये करस्थं किमीप्सितं नास्ति
दुरापमन्यैः ।। अष्टमे च कुरुक्षेत्रनाम्नि तीर्थवरे नरः । निमज्य व्र-
(ब्र)ह्महत्यादिमृजा शुद्धो दिवं व्र–

३६ जेत् ।। तीर्थपंचकमिहाचलराजे यत्रिलोकविदिते विदि[ता]ख्यं(ख्यम्)।
तत्प्रभावकथने न समर्थो देवसार्थगुरुरस्ति न सोऽपि ।। लक्ष्मीतीर्थं
तेषु मुख्यं दुरापा लक्ष्मीर्न स्यान्मज्जतां यत्र तूर्णं(र्णम्) । यावज्जीवं
पातकोद्भूतिहेतुप्रोद्य[द्दु]ष्षो(:खो)द्रेकदारिद्रचभाजां (जाम्) ।।

३७ किं हंसतीर्थस्य तथा प्रभावः प्रभूतपुण्योज्व(ज्ज्व)लकेतनस्य । व्या-
[ख्या]यते यज्जलपानतोऽपि हंसो हृदिस्थो विमलत्वमेति । श्रीचक्र-
तीर्थमहिमानममानमुर्व्यां गुर्व्वीं प्रवक्तुमपि कस्य नरस्य शक्तिः ।
यस्य स्वयं भगवता हरिणा स्वचक्रं रक्षार्थमुद्यतमकल्पि

३८ सुदर्शनाख्यं(ख्यम्) ।। स्नात्वा धनुस्तीर्थजले धनुश्च प्रदाय हेमादिकृतं
स्वशक्त्या । नरो विदूरीकृतपापराशिः श्रीशार्ङ्गपाणेः सदनं
प्रयाति ।। तीर्थे पितृणां पितृतीर्थनाम्नि स्नात्वा च कृत्वा पितृतर्पणादि ।
कोटिं पितृणां नियतः(तं) पवित्रीकृत्ये(त्यै)ति दिव्यं हि पदं पितृ–

३९ णां(णाम्) ।। गिरेरपाच्यां दिशि वाजिमेधतीर्थे समर्थेऽखिलतीर्थसार्थात् ।
नरो निमज्ज्यांगनया समेतस्तनूभवानाशुलभेत धन्यान् ।। या ररक्ष
कलिकालतो बलाद्धर्ममूर्मिकरपंकजैर्नदी । सा तथास्य कलिपेति
विश्रुता संनिधौ कलिमलं हरत्यलं(लम्) ।। सुरनदी च सुरौघ–

४० समाश्रिता निकटतोऽस्य वहत्यचलस्य सा । सुरनिकेतनभोगसमृद्धिदा
सकृदिवाचमनादिकृतां नृणां(णाम्) ।। कलिपासुरनद्यंवु(बु)संगादं-
गार्क्कजांवु(बु)नोः । संगं न गणयंत्युच्चैर्मनुख्य(ष्य)मुनिदेवताः ।।
नाश्चर्यमस्मिन्मणिकालकुंडं तीर्थोत्तमं प्राप्य समस्तसिद्धीः ।
४१ प्राप्नोति मर्त्यः खलु मुक्तिरस्य प्रसादतः साऽपि न दूरसंस्था ।। मोक्षकुंडं
समासाद्य दक्ष(क्षि)णस्यां महीभृतः । दुर्ल्लभोऽपि भवेन्मोक्षः सुलभः
प्राणिनां क्षणात् ।। श्रीरामतीर्थं यदिहास्ति तीर्थं साक्षात्सदर्थप्रथित-
प्रभावं(वम्)। तस्याप्लुतिप्रोद्भवपुन्य(ण्य)राशे[1] ष्फलप्रदातादशकंधरा-
४२ रिः । एकादशीवासरवासभाजां तीर्थे शुभार्थे दशकंठशत्रोः । मुक्तिर्व-
राकी करपंजरस्था करोति सेवा गृहसारिकेव । यत्कार्त्तिके मासि नरो
निमज्य(ज्ज्य)श्रीरामतीर्थे दशकंधरारिं(रिम्) । भक्त्या प्रपश्येन्न
शरीरकोशे कीटत्वमायाति तदन्तरात्मा ।। सकृद्रामगयाश्राद्धं
गिराविह क-
४३ रोति यः । लभन्ते पितरस्तस्य मुक्तिमत्यंतदुर्ल्लभां(भाम्) ।। श्रीराम-
चंद्रस्य समीपतोऽहि सिंदूरवापी सुकृतप्रपा सा । यस्या विशुद्धेन
विलोकनेन विजित्य नाकं सुमुपैति मुक्ति(क्तिम्) ।। कर्पूरवापी सुकृत-
प्रवाहपूरेण पूर्ण्णा किमु वर्ण्णनीया । देवस्य सीतादयितस्य पार्श्वे दास्यं
हि यस्याः कुरुतेऽपि
४४ मुक्तिः ।। काशी नोज्जयिनी न चापि मथुरा नो द्वारका नो पुरी
तद्वत्पुण्यभरं प्रयच्छति नृणां वासेन नित्यायुषा । यद्वद्वासरमेकम-
ष्टिति(?)कृतां सिंदूरभूमीधरः श्रीरामस्य पदारविंदयुगलस्पर्शेन
सर्व्वोतमः।। जगन्मंगलमाधत्ते यस्य कुंभद्वयी स्मृता । गजेंद्रवदनः
४५ साक्षादत्रास्ते रामकांक्षया ।। आस्ते धर्म्मेश्वरो नित्यं स रामस्य
गिराविह । पीडितं कलिना धर्म्मं यः कृपालुरपालयत् ।। श्रीरामचंद्रस्य
करेण चंद्रहासाद्धतः प्राप्य पदं मुरारेः । स शम्वु(म्बु)कः शूद्र-
मुनिर्महीध्रराजेऽत्र धूम्राक्ष इति प्रसिद्धः ।। पश्यन्ति मुक्तीश्वरनामधेयं
शिवं शिवा-

१ 'पुण्यराशेऽफलप्रदाता'–असें वाचावें.

४६ नाथमिहाचलेंद्रे । शिवव्रतस्थाः शिववासरे ये शिवत्वमायांति शिवालये ते ।। गोपीजनानंदसमुद्रपूर्णचंद्रो विनिद्रोज्व (ज्ज्व) लपद्मनेत्रः । गोपालमूर्तिर्जगदेकमूर्त्तिर्व्वसत्यसावत्र धराधरेंद्रे ।। अतीव तेजःप्रसरप्रतप्तं जगत्समग्रं कृपया ररक्ष । योऽयं चतुर्थोऽवतरोऽच्युतस्य श्री–

४७ मान्नृसिंहोपि वसत्यमुष्मिन् ।। सप्तांभोनिधिपूरदूरपिहितं वि(बि)–भ्रद्धरां द्रंष्ट्रया योऽयं भाति सरोजिनीदलनिभो दन्तेन यद्वन्मयन्[1] । यं रोमान्तरगुप्तवाससुखिनो देवर्षयस्तुष्टुवु[2]ष्कल्पान्ते देशकंधरारिसदने सोऽत्रादिकोलः प्रभुः ।। अनन्यलभ्यामतुलां सपर्यां नित्यं

४८ परित्यज्य महेन्द्रदत्तां(त्ताम्) । श्रीमान्नृपष्पंक्तिरथोपि[3] पुत्रप्रीत्या वसत्यत्र गिरीन्द्रसानौ ।। सुतौ श्रीरामचंद्रस्य गिरौ कुशलवाविह । दधाते कल्पवृक्षत्वं भक्तिभाजां जगत्प्रभू ।। मातरोष्टौ महासिद्धिनामधेयोपलक्षिताः । अत्र तिष्ठंति भक्तानामणिमाद्यष्टकप्रदाः ।। कल्पान्ते कवली–

४९ करोति सकलं त्रैलोक्यमल्पेतरज्वालाजालकरालकालवदनो यष्कालिकाकेलिभूः[4] । सिन्दूराचलमीक्षणं क्षणमपि क्षीणान्यवासस्पृहः श्रीरामस्पृहया करोति भगवान्कि वा महाभैरवः ।। पंचास्यं चंद्रमौलिं दशभुजमुदयत्कोटिभानूग्रभासं . . .

५० सिवरशरधनुःशूलष (ख) ट्वांगहस्तं(स्तम्) [।] हृत्पद्मे भक्तलोकाभयवरदकरं चिन्तयन्यं नरः स्यात् त्रैलोक्ये सिद्धिसमाड् वसति पवनजः सोऽत्र रामैकभृत्यः ।। मालां पुष्पमयीमिव क्षितिमिमां वि(बि)–भ्रच्छिरोभिर्व्विभुः श्रीरामावतरे हरेः सहचरः शंखोऽप्यशंखात्मकः । आस्ते सोऽ[त्र] स–

---

१ कदाचित् ‘उन्मज्जयन्’ असा पाठ विवक्षित असेल.

२ ‘स्तुष्टुवुः कल्पान्ते’ असें वाचावें.

३ ‘श्रीमान्नृपः पंक्तिरथो–’ असें वाचावें.

४ ‘यः कालिका–’ असें वाचावें.

५१ मस्तभक्तजनतातत्तन्मनोवांछितं संयच्छन्जनकाधिराजतनयानाथांतिके-[1]
लक्ष्मणः ।। यन्नामस्मरणात्प्रयाति निषि(खि)लः पापाद्रिरुच्चैः क्षयं
या विश्वैकपतिव्रताध्वनि गुरुर्देवी दयैकापगा [।] या शापेन निनाय
भस्मकणिकाभूयं न लंकापतिं कर्त्ता मे दयिताऽ[स्य]

५२ नाशमिति साप्यत्रास्ति रामान्तिके ।। इहाचलेंद्रे दशकंठशत्रोर्व्विलोक्य
मूर्तिखलु ⋯ मर्त्यः । परत्र काले न करोति भीतिं [कान्तासमं ?]
संहृतिघोरमूर्त्तेः ।। भक्त्या महत्या प्रभुमादिरामं जगत्सुमुषा(खा)-
रामतनुं निरीक्ष्य । नरः सुरेंद्रादिकरोपनीतपूजाग्र्यपात्रत्वमु[पैति]
[नि]-

५३ त्यं (त्यम्)।। श्री[भो]गराममभिरामतनुं निरीक्ष्य क्षीणाषि(ख)लाघ-
सरणिः शरणे मुरारेः । भोगा[नभंगुररसा]न्सुचिरं विचित्रान्प्रान्प्रोति
कल्पशतमल्पितदेवराजः ।। दृष्ट्वा प्रकृष्टमहिमानमनन्तभक्त्या तं
गुप्तराममतिगुप्तपदं च किंचित् प्राप्नोति यत्तदिह किं ननु देवरा-
[जो] . . .

५४ तद्गुरुरथांगिरसोऽपि सोऽपि ।। श्रीशंखरामं प्रणिपत्य मर्त्यः पदं सम-
भ्येति हि शंखपाणेः । विशुद्धभावेन हृदा महेंद्रमुख्यादिदेवैरभिवंद्य-
मानः ।। जगन्महानंदनिदानमीशं श्रीमैथिलीलक्ष्मणदेवयुक्तं(क्तम्) ।
श्रीरामदेवं प्रणिपत्य मूर्द्धना नमस्करिख्ये(ष्ये)ल्पतरैर्व्व[चोभिः] ।।

५५ देव श्रीरघुनंदन तृ(त्रि)जगतामद्वैतवादप्रभो भास्वद्वंशमहाविभूषणमणे
कारुण्यरत्नाकर । त्रैलोक्यारिदशास्यकंठदशकच्छेदोल्लसत्पाणये पा
. . . ते त्रैलोक्यगोप्त्रे नमः ।। देव [क्षी]रसमुद्रसांद्रलहरी[नि]र्मथ्य
हृत्कीर्त्तये तत्तादृग्गुण- . . .

५६ विश्वैकभर्त्रे नमः ।। श्रीरामाय हनूमदादिवदनांभोजन्मषंडप्रभाभर्त्रे
श्रीजनकक्षितीन्द्रतनयानंदैककंदाय च । देव त्वां स्फुरदुग्रशोषण . . .
-दारचाटुस्तु . . .

[1] 'संयच्छञ्जनकाधिराज' असें वाचावें.

५७ धत्तात्यन्तसुजात्यरत्नचयभाभ्राजिष्णुपादांवु(बु)जं(जम्)। देव....
रि...पाद...ल...जामुष्टिप्रहारो...निषि(खि)लं त्रैलोक्य-
नाशक्षमं धाम्ना येषु सहस्रपूर्णरुचिम...मं नुमः ।।...

५८ विसर्परोगजगतीनाथ...भक्तजन...नामस्मृतेः । गव्यूतिप्र...
देव त्वां करुणां...सिंदूरजं रेणुं स शमयन्तम...

५९ क्षोभुजां तेजसां । कुर्व्वाणे जगदिष्टवृष्टिममृतासारां भवोन्माथिनीं
...प्रार्थितदा (?) प्रभाकर...म्वि (म्बि)कासूनु...सिंदूरा-
चलमौलिकल्पि...

६० प्रतिष्ठं विभुं कुंभोद्भूतमुनीश्वरेण भगवन्वंदे मुदे नित्यशः ।। देव त्वां
पुरुषं पुरातनमजं तत्त...भगवते भक्त्या नमोऽस्तु प्र [भो*]...

६१ रामदेवं य[:] स्तौति मर्त्यः पवित्रधीः । सिंदूराचलमौलि...काशी-
प्रभृ...कल्पांतावधिनिर्मलाखिलजला वृक्षा...

६२ लः । आस्ते वा(बा)लसमुद्र एष विलसद्देवालयालीमिल...जलो
जलेक्षणकृतां देवा...धन्यः ।। समभ्यर्च्य नरो भक्तयान...

६३ विद्वान् । दुर्लभां लभते कां कां न हि सिद्धिं विशुद्ध[धीः¶]...
रगणितानि देवश्चिरा...भरणं गरीयः श्रीराघवोऽमंस्त
कृतार्थमुच्चैः । ¶

¶ या पुढील बारा (६४–७५) ओळी अतिशय खंडित झाल्या आहेत त्यामुळें त्या येथें दिल्या नाहींत. ६९ व ७१ व्या ओळींत माइदेव नामक अधिकाऱ्याचा उल्लेख आहे. ७० व्या ओळींत 'मैथिलीनाथस्तुष्यति येन मे कुरु...' असे शब्द स्पष्ट वाचतां येतात, त्यावरून श्रीरामचंद्रास संतोष होईल असें एखादें कृत्य गडावर करण्याविषयीं राघवदेवानें माइदेवास आज्ञा केलेली दिसते.

शिलालेखांत उल्लेखिलेल्या देवळांची, नद्यांची व तीर्थांची यादी.

रामेश्वर रामटेक गांवांत रामाळें नावाच्या तळ्याजवळ असलेलें हें शिवलिंग होय. सि. मा.$ (अ. ६, ओ. ४) मध्येहि रामेश्वर नामक शिवलिंगाचा उल्लेख आहे, पण तें नंदिवर्धन गांवांत आहे असें म्हटलें आहे.

घंटेश्वर सिंदूरमाहात्म्यांत (२,१) हा रामटेकच्या पूर्वेस आहे असें म्हटलें आहे. अ. २ श्लो. १९ वरून हा कलिपा व सुरनदी यांच्या संगमाजवळ होता. तें देवालय आतां खिडसी तलावांत बुडालें आहे.

सुधेश्वर सिं. मा. (२,१) मध्यें याला सिद्धेश्वर म्हटलें आहे. अ. ३ श्लो. २२ वरून सुधेश्वराचें मंदिर दक्षिणेस होतें असें दिसतें. नंदिवर्धनांत पुष्करणीजवळचें मंदिर विवक्षित असावें.

केदारेश हें मनसर येथील शिवालय होय.

आंजनेय याचें मंदिर उत्तरेस होतें (सिं. मा. २,१). सध्यां जपाळें तीर्थाजवळ हनुमान् आहे तोच येथें विवक्षित असावा.

शंखतीर्थ हें अंबाळ्याच्या पूर्वेला आहे (सिं. मा. ५, ४).

अग्नितीर्थ हें अंबाळ्याच्या आग्नेयेस आहे (सिं. मा. ५, ४).

अंबतीर्थ हें अंबाळा तळ्याच्या दक्षिणेच्या काठावर आहे (सिं. मा.५,४).

वरुणतीर्थ हें अंबाळा तळ्याच्या पश्चिम काठावर आहे (सिं. मा. ५, ५).

शुक्लतीर्थ हें अंबाळ्याच्या पश्चिमेस आहे (सिं. मा. ५,५). येथे यात्रेच्या सहाव्या दिवशीं स्नान करतात (सिं. मा. ५,२२).

नृसिंहतीर्थ हें अंबाळ्याच्या उत्तरेला आहे (सिं. मा. ५.५; २५).

$ श्रीयुत जोशी यांनीं कांहीं वर्षांपूर्वी छापलेल्या पोथीचा येथें सिं. मा. असा निर्देश केला आहे. कंसांतील आंकड्यांपैकीं पहिला अध्यायाचा व दुसरा श्लोकाचा आहे.

कुरुक्षेत्र हें अंबाळ्याच्या उत्तरेस आहे (सिं. मा. ५,६).

लक्ष्मीतीर्थ
हंसतीर्थ } यांचीं स्थानें सध्यां निश्चितपणें समजत नाहींत.

चक्रतीर्थ याला सिं. मा. (७,२६)त चक्रालय म्हटलें आहे. येथें चक्रेश्वर नामक शिवालय होतें (सिं. मा. ७,२६). सध्या याला चाकोरडें म्हणतात. हें रामगिरीच्या दक्षिणेस एका मैलावर आहे.

धनुस्तीर्थ हें चक्रतीर्थाजवळ आहे (सिं. मा. ७,२८). याच्याजवळ धन्वीशाचें मंदिर आहे (सिं. मा. ७,३४). याच्याजवळ पिप्पल नामक तळें होतें (सिं. मा. ७.३५).

पितृतीर्थ सिं. मा. (४,५) त हें तीर्थ पर्वतामध्यें (शैलस्याभ्यन्तरे) आहे असें म्हटलें आहे. याला रामगया असें नंतर म्हणूं लागले (सिं. मा. ४,१५). सध्यां अंबाळ्यापासून खिडसी तलावाला जाण्याचा जुना मार्ग आहे त्या मार्गावर हें तीर्थ आहे. सध्यां याला गायखुरी म्हणतात. कारण सिंदूरगिरिमाहात्म्यांत वर्णिलेल्या पादुका खडकावर उमटलेल्या गाईच्या पावलां-सारख्या दिसतात.

वाजिमेध हें गडाच्या पश्चिमेस आहे असें प्रस्तुत शिलालेखांत (ओ. ३९) म्हटलें आहे. नंदिवर्धनास राज्य करणाऱ्या राजानें येथें अश्वमेध केला, त्याचा यूप व विहीर जवळ दिसतात असें सिंदूरमाहात्म्यांत (८–७,१४) म्हटलें आहे. हें रामटेकहून नंदिवर्धनास जाण्याच्या वाटेवर लागतें.

कलिपा नदी रामटेकच्या उत्तरेस वाहणारी नदी. प्रस्तुत लेखांत कलीपासून धर्माचें रक्षण केलें म्हणून तिला हें नांव प्राप्त झालें असें म्हटलें आहे. याच्या उलट सिं. मा. (३,२–२६) मध्ये धर्माचा पाठलाग करणारा कलि रामाच्या हुंकाराने नदी झाला. त्यामुळें सुरनदीशीं संगम होईपर्यंत कलिपेचें जल अपेय आहे असें म्हटलें आहे.

सुरनदी हिला सि. मा. मध्यें एके ठिकाणीं सूर्यनदी (२,२) व इतरत्र सुरनदी (२,१६) म्हटलें आहे. हिचा पुढें कलिपेशीं संगम होतो.

मणिकालकुंड मणिकालांत स्नान करून हिंडिबेची पूजा करावी असें सिंदूर-माहात्म्यांत (२,६) म्हटलें आहे. सध्यां याला मनसर म्हणतात. सध्यां येथें हिंडिबेचें मंदिर नाहीं, पण या तीर्थाला हिंडिबा-तीर्थ असेंहि म्हणतात.

मोक्षकुंड हें दक्षिणेस आहे असें प्रस्तुत शिलालेखांत म्हटलें आहे (ओळ ४१). हें दक्षिणद्वाराजवळ आहे. त्याजवळच्या देवीला मोक्षजा म्हणतात (सि. मा. २, ४). हें नगरधनच्या किल्ल्या-मध्ये असावें.

रामतीर्थ याचें प्रथम ईशाल असें नांव होतें. यालाच पुढें पुष्कर व शेवटीं रामतीर्थ म्हणूं लागले (सि. मा. १५, ४०). कार्त्तिक महिन्यांत विशेषत: शुक्लपक्षांत येथील स्नानाचें विशेष महत्त्व आहे (सि. मा. १५, ५१). सध्यां याला रामतळें किंवा राम-पुष्कर म्हणतात.

सिंदूरवापी ही गडावर नृसिंहमंदिराच्या ईशान्येस आहे (सि. मा. ५, २). सध्यां हिला सेंदूरबावली म्हणतात व येथून पूजेचें व पिण्याचें पाणी नेतात. हिला स्थानपोथींत सिंदुर्वावी म्हटलें आहे.

कर्पूरवावी ही गडाच्या खालीं जैनमंदिराहून घंटेश्वरास जाण्याच्या रस्त्यावर आहे. हिला स्थानपोथींत कापूरवावी म्हटलें आहे.

गजेंद्रवदन याचें मंदिर शेवटच्या प्राकारांत मारुतीच्या मंदिरासमोर आहे.

धर्मेश्वर याचें मंदिर लक्ष्मण–मंदिराच्या दक्षिणेस आहे.

धूम्राक्ष याला सि. मा. (५, ८) मध्यें धूम्रपंकेश्वर म्हटलें आहे. प्राकाराबाहेर दक्षिणेच्या पठारावर याचें मंदिर आहे.

मुक्तेश्वर रामलक्ष्मणांच्या देवळांना प्रदक्षिणा घालतांना पश्चिमेस याचें मंदिर लागतें.

गोपाल नगारखान्याजवळ याचें मंदिर आहे.

आदिकोल (वराह) याचें मंदिर पूर्वदिशेस आहे (सिं. मा. १६, ६५). गडावर पूर्वेकडून जातांना तें उजव्या बाजूस लागतें.

दशरथ याचें मंदिर सध्या गडावर नाहीं. सध्या दशरथाचें म्हणून जें मंदिर दाखवितात त्यांत हरिहरांच्या मूर्ति आहेत.

कुशलव ह्यांचें मंदिर सध्यां गडावर नाहीं. सध्या यांचें म्हणून दाखवितात त्या मंदिरांत गरुडारूढ नारायण आहे.

महाभैरव याचें मंदिर उत्तरेस होतें (सिं. मा. १६, ६५). भैरवदरवाज्याजवळ याची मूर्ति आहे. भैरवाचें मंदिर भोगरामाच्या मंदिराजवळ होतें असें स्थानपोथींत म्हटलें आहे.

चंद्रमौलि अंबाळच्याचे पश्चिमेस सूर्यनारायणाच्या देवळाजवळ पंचमुखी महादेवाचें देऊळ आहे.

भोगराम अंबाळच्याकडून गडावर जाणाऱ्या रस्त्यावर डाव्या बाजूस लागणारें हें मंदिर होय. याच्याजवळ महानुभावांचें देवालय आहे. 'भोगरामाच्या मंदिराजवळ श्रीचक्रधरांनीं दहा महिने वास्तव्य केलें. भोगरामाचें देऊळ पूर्वाभिमुख आहे,' असें स्थानपोथींत म्हटलें आहे.

गुप्तराम याचें मंदिर पुष्करतीर्थाजवळ आहे (सिं. मा. १०-११). सध्यां याला कपटराम म्हणतात. धूम्रेश्वराच्या मंदिराला गांवांतून गेलेल्या वाटेवर हें मंदिर लागतें. स्थानपोथींत याचा उल्लेख आहे. पण तेथें गुप्तरामाचें मंदिर भोगरामाच्या ईशान्येस आहे असें म्हटलें आहे तें बरोबर दिसत नाहीं.

शंखराम याचें निश्चित स्थान सापडत नाहीं. कदाचित् शंखतीर्थाजवळ असावें.§

---

§ याशिवाय सिंदूरगिरिमाहात्म्यांत मार्कंडेयतीर्थ, बृहदालं सरः, गुरुतीर्थ, ऋणमोचनतीर्थ, पापमोचनतीर्थ, पापदाहतीर्थ, नागार्जुन वगैरेंचा उल्लेख आहे.

परिशिष्ट तिसरें

प्रभावतीगुप्तेचा ऋद्धपूर ताम्रपट

उपलब्धि--हा ताम्रपट विदर्भाच्या अमरावती जिल्ह्यांतील ऋद्धपूर गांवीं महानुभाव पंथाचे महंत दत्तराज यांच्या संग्रहीं होता. श्री. य. रा. गुप्ते यांनी त्यांचें संपादन दोनदां–प्रथम भारत इतिहास संशोधन मंडळ त्रैमासिक, पु. ३, क्रमांक २–४, पृ. ८९ इ. मध्ये आणि नंतर बंगाल एशियाटिक सोसायटीचें जर्नल, नवी माला, पु. २०, पृ. ५३ इ. यामध्ये–केलें आहे. बंगाल एशियाटिक सोसायटीच्या जर्नलमध्ये त्यांनी या ताम्रपटाच्या पत्र्यांचे उलटे ठसे व इंग्रजी भाषांतरहि प्रसिद्ध केलें आहे. त्याच ठशांवरून हा ताम्रपट येथे संपादिला आहे. हा ताम्रपट सध्या पुणे येथे भारत इतिहास संशोधन मंडळाच्या संग्रहीं आहे.

वर्णन--या ताम्रपटाचे चार पत्रे असून त्यांची लांबी ६$\frac{3}{4}$ इंच व रुंदी ३$\frac{3}{4}$ इंच आहे. पहिल्या व चौथ्या पत्र्यांच्या एका बाजूवर व बाकीच्यांच्या दोन्ही बाजूंवर कोरलें आहे. लेखाच्या एकंदर बत्तीस ओळी असून त्यांपैकी पहिल्या पत्र्यावर पांच, दुसऱ्या व तिसऱ्या पत्र्यांच्या प्रत्येक बाजूवर सहा आणि चौथ्या पत्र्यावर तीन ओळी आहेत. सर्व लेख चांगल्या स्थितींत आहे. प्रत्येक पत्र्याला कडीकरितां $\frac{1}{6}$ इंच व्यासाचें छिद्र आहे, पण कडी किंवा तिच्यावर फिरणारी मुद्राहि सांपडली नाही. चारी पत्र्यांचें वजन ११६ तोळे आहे.

लिपी व भाषा--या लेखाची लिपी द्वितीयप्रवरसेनाच्या ताम्रपटांतल्याप्रमाणें पेटिकाशीर्षक (box–headed characters) प्रकारची आहे. या लेखाची भाषा संस्कृत असून शेवटच्या शापाशीर्वादात्मक श्लोकाखेरीज त्याचा सर्व भाग गद्यांत आहे.

विषय--प्रभावतीगुप्तेच्या पुणें ताम्रपटांतल्याप्रमाणें प्रस्तुत ताम्रपटाच्या लेखाचा आरंभ 'जितं भगवता' 'भगवान् विष्णूचा विजय झाला' या शब्दांनी झाला आहे. प्रस्तुत लेख वाकाटक महाराज द्वितीय रुद्रसेन

याची अग्रमहिषी आणि वाकाटक महाराज दामोदरसेन–प्रवरसेन याची जननी प्रभावतीगुप्ता हिचा आहे. हा ताम्रपट वाकाटक महाराज द्वितीय प्रवरसेनाच्या एकोणिसाव्या शासनवर्षी दिला होता. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, या लेखाच्या प्रास्ताविक भागांत वाकाटकांची वंशावळ दिली नसून गुप्तांची दिली आहे. हाच प्रकार प्रभावतीगुप्तेच्या पुणें ताम्रपटांतहि आढळतो. तो ताम्रपट ती आपला अल्पवयी मुलगा युवराज दिवाकरसेन याच्या तर्फे राज्यकारभार पाहत होती तेव्हा दिला होता. त्या काळीं तिचा पिता द्वितीय चन्द्रगुप्त–विक्रमादित्य याने तिला राज्यशासनांत साहाय्य करण्याकरितां पाठविलेल्या अधिकाऱ्यांचें वाकाटक दरबारीं प्रस्थ असल्या-मुळें त्यांनी पुणें ताम्रपटांत वाकाटकांची वंशावळ न घालतां गुप्तांची घातली असावी. कदाचित् या बाबतींत प्रभावतीगुप्तेचाहि आग्रह असेल. पण या ताम्रपटाच्या वेळीं द्वितीय प्रवरसेन वयांत आला होता. एवढेंच नव्हे तर तो एकोणीस वर्षें राज्य करीत होता. त्याच्या सर्व ताम्रपटांत वाकाटकांचीच वंशावळ दिली आहे. तेव्हा प्रस्तुत ताम्रपटांत गुप्तांची वंशावळ घालण्याचें कारण प्रभावतीगुप्तेचा स्वतःच्या पितृकुलाविषयी अभिमान हेंच असावें.

या ताम्रपटांतील गुप्तांची वंशावळ पुणें ताम्रपटांतल्याप्रमाणे आहे. फरक एवढाच कीं यांत 'महाराजाधिराज' ही सम्राट्पदनिदर्शक पदवी द्वितीय चन्द्रगुप्तालाच लावली आहे. प्रभावतीगुप्तेचें वर्णन 'भगवत्पादा-नुध्याता' (भगवान् विष्णूच्या चरणांचें चिंतन करणारी) या शब्दांनी केलें आहे, त्यावरून ती विष्णूपासक होती, हें उघड आहे.

हा ताम्रपट रामगिरिस्वामीच्या पादुकांजवळ (रामगिरिस्वामिनः पादमूलात्) दिला होता. हा रामगिरिस्वामी म्हणजे भगवान् रामचंद्र होय. प्रस्तुत लेखाचा उद्देश कौशिक मार्गामधील अश्वत्थनगरांतील एक शेत, त्यांतील घर व शेतकऱ्यांकरितां बांधलेल्या चार झोपड्या यांसह, प्रभावतीगुप्तेने कांही ब्राह्मणांना दान दिलें हें नमूद करण्याचा होता. हे ब्राह्मण तैत्तिरीय शाखेचे व पाराशर गोत्राचे होते असें म्हटलें आहे; पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, यांत त्यांचीं नांवें दिलीं नाहीत. लेखाचा काळ

द्वितीय प्रवरसेनाच्या एकोणिसाव्या शासनवर्षी कार्त्तिक शुक्ल द्वादशी असा दिला आहे. प्रभावतीगुप्ता विष्णूपासक असल्याने तिने हें दान प्रबोधिनी एकादशीस उपोषण करून द्वादशीस पारण्याच्या वेळीं दिलेलें दिसतें. तिचा पुणें ताम्रपटहि अशाच प्रसंगीं दिला होता. प्रस्तुत लेखाचा दूतक (सचिवालयांत राजाज्ञा कळविणारा) देवनन्दस्वामी व लेखक प्रभुसिंह होता.

चर्चा––प्रस्तुत ताम्रपटांत प्रभावतीगुप्तेला 'साग्रवर्षशतजीवपुत्रपौत्रा' असें विशेषण लावलें आहे. यांतील 'जीवपुत्रपौत्रा' या भागाचा अर्थ 'जिचे पुत्र व पौत्र जिवंत आहेत' असा होतो. याच अर्थाचीं 'जीवसुता' व 'जीवपुत्रा' हीं विशेषणें ऋग्वेद, महाभारत व रामायण या प्राचीन ग्रंथांत तसेंच कांही कोरीव लेखांतहि आढळतात. स्वत:चे पुत्र व पौत्र जिवंत असणें हें भाग्याचें लक्षण मानलें जात असल्याने यासारखीं विशेषणें स्त्रियांच्या वर्णनांत अनेक ठिकाणीं येतात. 'जीवपुत्रपौत्रा' याच्यापूर्वीच्या दीर्घायुष्यवाचक 'साग्रवर्षशत' या सामासिक शब्दाचा संबंध पुढील 'जीव' पदाशीं आहे. तेव्हा या सबंध शब्दसमूहाचा उद्देश, कांही विद्वान् म्हणतात त्याप्रमाणें, प्रभावतीगुप्तेचें दीर्घायुष्य सांगण्याचा नसून तिचे पुत्रपौत्र दीर्घायुषी होते हें सांगण्याचा असावा. प्रभावतीगुप्तेसारख्या गतभर्तृका स्त्रीला शंभर वर्षांचें आयुष्य लोभनीय वाटणें शक्य नाही. कोणतीहि भारतीय स्त्री वैधव्यांतील आपल्या दीर्घायुष्याचा उल्लेख स्वत:च्या लेखांत अभिमानाने करणार नाही. तेव्हा या शब्दसमूहांत उल्लेखिलेलें शंभर वर्षांचें आयुष्य तिचें नसून तिच्या पुत्रपौत्रांचें आहे हें उघड आहे हा उल्लेखहि वाच्यार्थाने घ्यावयाचा नसून लहान मुलांना 'दीर्घायु' किंवा 'आयुष्मान्' हीं विशेषणें ज्या अर्थाने लावतात त्या अर्थी घेतला पाहिजे. अशा ठिकाणीं मुलांना दीर्घायुष्य लाभो, अशी इच्छा व्यक्त करणें हा उद्देश असतो. तेव्हा प्रस्तुत विशेषणाचा अर्थ 'पूर्ण शंभर वर्षे आयुष्य उपभोगितील असे पुत्र व पौत्र जिला आहेत अशी' असा केला पाहिजे. [१]

---

१ यासंबंधी सविस्तर विवेचन आमच्या 'वाकाटक नृपति आणि त्यांचा काळ' या ग्रंथांतील पृ. २३६–२३७, आणि संशोधनमुक्तावलि, सर दुसरा, पृ. १८७–१८८ यांवर पाहा.

प्रभावतीगुप्तेच्या वर्णनांतील दुसरें विशेषण 'वाकाटकानां महाराज-श्रीदामोदरसेनप्रवरसेनजननी' हें आहे. या विशेषणाचाहि अर्थ संशोधकांनी भिन्न भिन्न प्रकारांनी केला आहे. त्याची चर्चा इतरत्र [1] केली आहे. तींत दाखविलें आहे कीं दामोदरसेन व प्रवरसेन हे एकच होते आणि दामोदरसेनाने राज्याभिषेकप्रसंगीं आपल्या कीर्तिमान् पूर्वजाचें 'प्रवरसेन' हें नांव धारण केलें होतें.

स्थलनिश्चय—प्रस्तुत ताम्रपटांत उल्लेखिलेल्या स्थलनामांपैकी **रामगिरि** हें नागपूरपासून २७ मैलावरचें रामटेक होय. हें गाव वाकाट-कांची पूर्वकालीन राजधानी नन्दिवर्धन या नगरापासून अवघें तीन मैल आहे. रामगिरीचा उल्लेख निर्वासित यक्षाचें निवासस्थान म्हणून कविकुलगुरु कालिदासाने मेघदूतांत केला आहे. त्या काव्यांतील वर्णनावरुन रामगिरीवर भगवान् रामचंद्राच्या पादुकांची पूजा होत असे, असें दिसतें. प्रस्तुत ताम्रपटहि रामगिरिस्वामीच्या (म्हणजे भगवान् रामचंद्राच्या) पादुकां-जवळच दिला होता. मेघदूतांतील रामगिरीचें व तेथून उत्तरेस जाणाऱ्या मार्गावरच्या स्थलांचें वर्णन रामटेकाच्या बावतींत उत्तम प्रकारें जुळतें, हें इतरत्र दाखविलें आहे. शिवाय रामटेक हें कित्येक शतकांपासून आजपर्यंत पवित्रक्षेत्र म्हणून मानलें गेलें आहें. म्हणून तेंच रामगिरि होय यांत संशय नाही. प्रभावतीगुप्तेचीं तशीच द्वितीय प्रवरसेनाचीं कित्येक दानें प्रथम भगवंताच्या पादुकांना अर्पण करून नंतर ब्राह्मणांना दिलीं होतीं. हा भगवान् म्हणजे ज्याच्या पादुका रामगिरीवर स्थापल्या होत्या तो रामप्रभु होय. **अश्वत्थनगर** हें अमरावती जिल्ह्याच्या अचलपुर तहसिलींतील असतपुर असावें. ज्या **कौशिक** नामक 'मार्गा' त तें वसलें होतें त्याचा पत्ता मात्र लागत नाही.

१ वाकाटक नृपति आणि त्यांचा काल, पृ. २३७–२३८ पाहा.

वाचन[1]

ओळ पहिला पत्रा

१ जित(तं)भगवता ।। रामगिरिस्वामिनऽपादमूलाद्गुप्तान(ना)मादि-

२ राजो[2] महाराजश्रीघटोत्कचस्तस्य पुत्रो महाराजश्रीचन्द्र-

३ गुप्त[:*] तस्य पुत्रस्तत्पादपरिगृहि(ही)त(तो) लिच्छविदौहित्रो

४ महादेव्या(व्यां) कुमारदेव्यामुत्पन्नो महाराजश्रीसमुद्रगुप्तस्तस्य पुत्र-

५ स्तत्पादानुद्ध्यातो न्यायागतानेकगोहिरण्यकोटिसहस्त्रप्रदस्सर्वराजो-

दुसरा पत्रा : पहिली बाजू

६ च्छेत्ता पृथिव्यामप्रतिरथऽपरमभागवतो महादेव्या(व्यां) दत्तदेव्यामु-

७ त्पनो(न्नो) महाराजाधिराजश्रीचन्द्रगुप्तस्तस्य दुहिता धारणसगोत्रा

८ नागकुलोत्पन्नाया(यां) कुबेरा(र)नाग(गा)देव्यामुत्पन्ना उभयकु-
लाल-

९ ङ्कारभूता वाकाटकाना(नां) महाराजश्रीरुद्रसेनस्याग्रमहिषी

१० वाकाटकानाम्महाराजश्रीदामोदरसेनप्रवरसेनजननी भग-

११ वत्पादानुद्ध्याता स(सा)ग्रवर्षशतजीवपुत्रपौत्रा श्र(श्री)महादेवी
प्रभ(भा)वती-[3]

दुसरा पत्रा : दुसरी बाजू

१२ गुप्ता ।। कौशिकमार्ग(र्गे) अश्वत्थनगरे सब्रह(ब्राह्म)णपुर(रो)-
गग्रामम्महत्तरा(रां)श्च

---

१. बंगाल एशियाटिक सोसायटीच्या जर्नल पु, २०, मध्ये पृ. ५८ व ६८ यांसमोरील ठशांवरून.

२. पुणें ताम्रपटांत 'गुप्तादिराजो' असें आहे.

३. ठशांवरून 'प्रभावती' मधील 'ती'चा इकार दीर्घ दिसतो श्री. गुप्ते 'प्रभावति' असें वाचतात.

१३ कुशलमुक्त्वा सम(मा)ज्ञापयत(ति) [।*] ऐहिकामुत्रिकमस्मि-
न्नगरे स्वपुण्याप्य[यना]र्थ(र्थं)

१४ पराशरगोत्राणा(णां) तैत्तिरीयब्राह्मणानामप्यपुत्रापुत्राणां[1] अभ्य-

१५ न्तरनिवेशने[न*] सह कर्षकनिवेशनानि च[2] चत्वार(रि)

१६ भुक्ता(क्त)काभोगक्षेत्रमुदकपूर्व्व(र्व्वं) शासनेनो(न) सति(नि)-
बद्धं(द्धम्) । उचितांश्चास्य[3]

१७ पूर्व्वराजानुमतान्चातुर्व्विद्यग्राममर्य्यादान्वितरामस्तद्यथा[4]

तिसरा पत्रा : पहिली बाजू

१८ अकरदायी[5](यि) अभटच्छत्रप्रावेश्य(श्यं) अपुष्पक्षीरसन्दोह(हं)
अचारा-

१९ सनचर्म्माङ्गार(रं) अलवणक्लिन्नक्रेणिखनक(कं) सर्व्वविष्टिःपरि-
हारा(र)-

२० परिहृत(तं) सनिधानं सोपनिधानं सक्ल(क्लृ)प्तोपक्लि(क्लृ)प्तम-
(मा) चन्द्रा-

२१ दित्यकालीय(यं) पुत्रपौत्रानुगामि भुजन्ता(तां) न केनचिद्व्याघात-

२२ ऽ कर्त्तव्यः सर्व्वक्रियाभिस्संरक्षितव्यऽपरिवर्द्धयितव्यश्च [।*]
यश्च(श्चा)स्मा(स्म)-

२३ च्छासनमगणयमान[:*] स्वल्पामपि परिबाधा(धां) कुर्य्यात्का-
रयि(ये)त वा तस्य

१. 'ब्राह्मणानां सपुत्रापुत्राणां' असें वाचावें.

२. हा शब्द निरर्थक आहे.

३. 'उचितां चास्य' असें वाचावें.

४. 'मर्यादां वितराम'–असें वाचावें.

५. हें व यानंतरचीं विशेषणें नपुंसकलिंगीं एकवचनीं असावीं; कारण त्यांचें विशेष्य ओ. १६ मधील 'भुक्तकाभोगक्षेत्रं' हें आहे.

तिसरा पत्रा : दुसरी बाजू

२४ ब्राह्मण(णै)रावेदितस्य सदण्डनिग्रहं करिस्याम(ष्यामः) [।*] अस्मि(स्मि)श्च धर्म्मादर–

२५ करणे अनी(ता)तानेकराजदत्ता(त्त)सञ्चित(न्त)नपरिपालनं पुण्यानुकीर्त्तन–

२६ परिहारार्त्थं न कीर्त्तयामः [।*] सङ्कल्पाधि(भि)योगपराक्क्रमोपजि-

२७ तान्वर्त्तमानामा(ना)ज्ञापयामः । व्यासगीतश्चात्र श्लोकᳶप्रमाणं (णम् ।)

२८ स्वदत्ता(त्तां) परदत्तां वा यो हरेत वसुन्धराम् [।*] गवां शतसहस्रस्य

२९ हन्तुᳶपिबति दुष्कृतमिति[१] ।। वाकाटकाना (नां) महाराजश्रीप्रवर–

चौथा पत्रा

३० सेनस्य राज्यप्रशासतसव्वत्सरे[२] एकुर्नाविशतिमे[३] ।। कार्त्तिकमा–

३१ सशुक्लपक्षद्वादश्या(श्याम् ।) दूतक(को) देवनन्दस्वामि(मी)[४] [।*] ली(लि)खितं

३२ प्रभुसिङ्घेन[५] ।।

---

१. 'दुष्कृतम् ।। इति' असें वाचावें. वृत्त: अनुष्टुभ्.

२. 'राज्यं प्रशासत: संवत्सरे' असें वाचावें.

३. 'एकोनविंशतितमे' असें वाचावें.

४. श्री गुप्ते यांनी हें नांव 'वेवन्दस्वामि' असें आपल्या दोन्ही लेखांत दिलें आहे. पण खरें वाचन वर दिल्याप्रमाणें आहे.

५. 'प्रभुसिंहेन' असें वाचावें.

परिशिष्ट चौथें

रामटेक येथील देवालयें व तीर्थं यासंबंधीं महानुभावीय ग्रंथांतील उतारे

१. लीळाचरित्र : एकांक

'लीळाचरित्र' हा ग्रंथ माहींभटांनी सुमारें शके १२०६ ते १२१० (सन १२८४–१२९४) मध्ये लिहिला. याचा पहिला भाग 'एकांक' यांत चक्रधरांचें चरित्र शके ११८६ पर्यंत आलें आहे. चक्रधर रामटेक येथे गडावर दहा महिने भोगरामाच्या देवळाजवळ राहत होते म्हणून तेथील ओटा अत्यंत पूज्य गणला जात असे. त्यासंबंधीं एकांकांतील सव्वीसावी लीळा पाहा--

भोगरामीं अवस्थान[१]

मागां हें रामीं[२] होतें. हे जया वोटेया वरि होतें तया वोटेयासि बडुवा[३] धुपार्ति करी: तया वोटेयावरि ब्राह्मणु येकू बैसला: तेयासि स्तीति जाली[४] : तेणें वोटेयासि धुपार्ति करितां देखीलें : मग बडुवातें पुसीलें : 'तुम्ही धुपार्ति कवणासि करीत असा' : तेणें म्हणीतलें : 'एथ एकु पुरुष[५] होते : तेयासि करूं[६] : मग : भोगरामांसि करूं : ते पुरुषू निगाले[७] : मग तेयाचीया वोटेयासि करूं : 'ते केउते[८] गेले' : तेणें म्हणीतलें : 'मनसीळेसि गेले' : मग तो ब्राह्मण मनसीळेसि आला : दर्शन जालें : मग : त्या स्थीति

---

१ लीलाचरित्र, भाग पहिला : एकांक (संपाहक : कै. ह. ना. नेने, शके १८७५), पृ. २४

२ रामटेकच्या गडावर.

३ पुजारी.

४ तो आपलें देहभान विसरला.

५ श्रीचक्रधर हेच ते पुरुष.

६ त्यांना मी (प्रथम) धूपार्ति करतों.

७ येथून गेले.

८ कोणीकडे ?

सूभर[1] जाली : सर्वज्ञें म्हणीतलें : 'ऐसें हें एथचेचा नामातवं होए : कां स्थानातवं होए[2] :''

२. लीळाचरित्र : पूर्वार्ध[3]

या घटनेचा उल्लेख पुढे लीळाचरित्राच्या पूर्वार्धांत (पृ. ११०) पुढीलप्रमाणे आला आहे

'हें पूर्वी रामीं[4] होतें : ब्राह्मणाची स्तीति सांघीतली : सर्वज्ञें म्हणीतलें : ऐसें एथीया नामापासौनि होए कीं स्थानापासौनि : हीराइ-सापाठ : लुखदेवोबायें मागोल गोष्टि सांघीतली[5] : त्याउपरि सर्वज्ञें म्हणीतलें : आति[6] : हें एथीचेया[7] नामापासौनि होए : ।। : बाइसीं पुसीलें : बाबा स्थानापासौनि होए : तें कैसें : सर्वज्ञें म्हणीतलें : हें पूर्वी[8] : भोगरामीची गोष्टि सांघीतली[9] : सर्वज्ञें म्हणीतलें : ऐसीया एकी भूमी[10] : ।। १३ ।। :

३. स्थानपोथी[11]

स्थानपोथींत श्रीचक्रधर जेथे जेथे गेले होते त्या सर्व स्थानांचें सविस्तर वर्णन आहे. श्रीचक्रधर कांही काळ गडावर भोगरामाच्या मंदिरा-

---

१ विशेष बहराला आली.

२ असें माझ्या नामामुळे किंवा स्थानामुळे होतें.

३ खंड २ (संपादक–कै. ह. ना. नेने), पृ. ११०.

४ रामटेकच्या गडावर.

५ आपला स्वत:संबंधाचा मागील अनुभव सांगितला.

६ होय.

७ माझ्या स्वत:च्या.

८ मी पूर्वी (रामगडला होतों).

९ (असा आरंभ करून) त्यांनी भोगरामाची गोष्ट सांगितली.

१० अशा कांही (सुपीक अंत:करणाच्या) जागा असतात.

११ (संपादक : डॉ. वि. भि. कोलते), पृ. ४–५.

जवळ राहिले होते व नंतर मनसर येथे गेले होते. म्हणून या दोन्ही स्थानांचें वर्णन स्थानपोथींत पुढीप्रमाणें आले आहे. या स्थानपोथीच्या टांचणांचा आरंभ बाइदेव बासांनी केला व पुढे मुनिव्यास कोठी यांनी ती पूर्ण केली. स्थानपोथींतील रामटेकच्या देवळांचें व तीर्थांचें वर्णन यथातथ्य आहे हें पहिल्या प्रकरणांत दाखविलें आहे. त्यांतील सीतेच्या न्हाणीचा उल्लेख अत्यंत महत्त्वाचा असून मेघदूतांतील 'जनकतनयास्नान-पुण्योदकेषु आश्रमेषु' या वर्णनास जुळणारा आहे. स्थानपोथींत उल्लेखिलेंली भोगराम व गुप्तराम यांचीं देवालयें आणि 'सेंदुरवावी' व 'कापूरवावी' हीं तीर्थें लक्ष्मणाच्या देवळांतील शिलालेखांतहि वर्णिलीं आहेत, हें पहिल्या प्रकरणांत दाखविलें आहे. तेव्हा स्थानपोथी व तो शिलालेख परस्परांस उपोद्बलक आहेत.

भोगरामीं अवस्थान मांस[१] १० : भोगराम् पूर्वाभिमूख : दक्षीणिले भींतीसि रीगतां डावेया हाता पुर्व पसीम[२] उत्तराभिमूख ओटा : तेथ गोसावियांसी अवस्थान : दोहीं देऊळांची संदि[३] : संदी पसीमे बोनेवाइ-यांची गुंफा[४] : जवळीचि बैरवांची देउळी पटिसाळ[५] : जगतीचा[६] दारवठा : उत्तराभिमूख : जगती आंतु मढामागे बोनेवाइयांची गुफा : पुर्वाभिमुख : संदीहुनि प्रतदीन बीजें करणें[७] : जगतिची खीडकी पुर्वे : खीडकियेहुनि परीश्रया[८] बीजें करणें ।। लघु परीश्रये[९] जगती आंतु ।। गुपीत भैरउं[१०] ।। गुपीत रामू[११] ।। भोगरामा इसान्ये : रामां पूर्वे

१ महिने.
२ पश्चिम.
३ दोन देवळांच्या मधील जागा.
४ देवाला नैवेद्य दाखविणाऱ्या बाईची राहण्याची जागा.
५ ओवरी.
६ आवाराच्या भिंतीचा.
७ रोज जाणें.
८ शौचास.
९ लघुशंकेकरितां.
१० गुप्तभैरव.
११ गुप्तराम.

सेंदुरवावी ।। उत्तरें कापुरवावि ।। गांवा पूर्वे दुरस्त[१] आंबाळें ।। आंबाळेचीए पसिमीली पाळी लींगाची देउळी[२] पूर्वाभिमूख : तेथ आसन : विहरण : अवस्थान ।। भांडारांचा मार्ग[३] ।। देउळां पुर्वे आसन : तोचि मार्गु : रामाचें देउळ पूर्वाभिमुख : रामांचेया देउळा पुढें लक्ष्मनाचे देउळ पुर्वाभिमूख : लक्षीमनाचेया देउळा दक्षीने[४] न्हाणि : न्हानिये उत्तरे आसन : न्हाणि सीतेची ।। भोगरामीचीं स्थानें २०[५] ।।×।।

---


१ दूर अंतरावर.

२ पश्चिमेकडील बांधावर लिंगाचें देऊळ.

३ तेथून भंडाऱ्यास रस्ता जातो.

४ दक्षिण दिशेस.

५ भोगरामाजवळ श्रीचक्रधराशीं संबंध आलेलीं स्थानें एकूण वीस आहेत.



७६°
७८°
८०°
८२°
२४°
२२°
मंदसोर
(दशपुर)
चंबळा (चर्मण्वती) नदी
वेत्रवती नदी
विदिशा
उज्जयिनी
देवगिरि
गंभीरा
शिप्रा
कालीसिंध
विंध्य पर्वत
नर्मदा (रेवा) नदी
महादेव
टेकडी
सातपुडा पर्वत
आम्रकूट
अमरवाडा (आम्रवाटक)
माळ
रामटेक (रामगिरि)
१५०८ फूट
नागपुर
जबलपुर
अमरकंटक
अंबिकापुर
रामगड
रामगिरि पासून
दशपुर पर्यंत
मेघाचा मार्ग

विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर

स्वीय ग्रंथ

१ नागपूरकर भोसल्यांची बखर
विदर्भांतील नामवंत इतिहासकार **कै. यादव माधव काळे** यांनी संपादिलेली द्वितीयावृत्ति, **किंमत अडीच रुपये.**

२ नागपूरचा सांस्कृतिक इतिहास लेखक--**श्री. दे. गो. लांडगे.**
भोसल्यांच्या राज्यस्थापनेपासून सुमारें दीडशें वर्षांचा नागपूरच्या सांस्कृतिक इतिहासाचा सर्वांगीण परामर्श. **किंमत दोन रुपये**

३ संशोधनमुक्तावलि : सर पहिला **म. म. वा. वि. मिराशी**
यांच्या सोळा संशोधनपर लेखांचा संग्रह. **किंमत चार रुपये**

४ मध्यप्रदेशांतील संशोधनकार्य (सन १९३४ ते १९५४)
जुन्या मध्यप्रदेशांतील संशोधकांनी वीस वर्षांत विविध विषयांत केलेल्या संशोधनाचा आढावा. **किंमत सव्वा रुपया.**

५ संशोधनमुक्तावलि : सर दुसरा **म. म. वा. वि. मिराशी**
यांच्या वीस संशोधनपर लेखांचा संग्रह. **किंमत चार रुपये.**

६ औपनिषदिक जीवनसौख्य **कै. डॉ. के. ल. दप्तरी**
यांनी वस्तुनिष्ठ आणि बुद्धिप्रत्ययक पद्धतीने लिहिलेला उपनिषदांचा उपसंहार. **किंमत चार रुपये**

७ संशोधनलेखसंग्रह : भाग पहिला **कै. हरि नारायण नेने**
यांनी लिहिलेल्या संशोधनपर लेखांचा संग्रह **किंमत चार रुपये.**

८ संशोधनमुक्तावलि : सर तिसरा **म. म. वा. वि. मिराशी**
यांच्या सतरा संशोधनपर लेखांचा संग्रह. **किंमत चार रुपये.**

प्राप्तिस्थान--१ चिटणीस, **विदर्भ संशोधन मंडळ,**
विदर्भ साहित्य मंदिर, सीताबर्डी, नागपूर १.
२ **डेनेट आणि कंपनी,** सीताबर्डी, नागपूर १.

महामहोपाध्याय प्रा. वा. वि. मिराशी यांचीं इतर संशोधनपर पुस्तकें

इंग्रजी

1. **Inscriptions of the Kalachuri–Chedi Era** (Corpus Inscriptionum Indicarum, Vol. IV) (published by the Archaeological Department, Government of India) Rs. 125/–

2. **Inscriptions of the Vakatakas** (Corpus Inscriptionum Indicarum, Vol. VI) (in the press).

मराठी

३. **कालिदास** (द्वितीयावृत्ति) (प्रकाशक, व्हीनस प्रकाशन, पुणें), रु. ६.

४. **कलचुरि नृपति आणि त्यांचा काल** (प्रकाशक, मध्यप्रदेश शासन साहित्य परिषद, नागपूर), रु. २.

५. **वाकाटक नृपति आणि त्यांचा काल** (महादेव हरि वाठोडकर व्याख्यानमाला, पुष्प ५) (प्रकाशक, नागपूर विश्वविद्यालय, नागपूर), रु. ५

६. **संशोधनमुक्तावलि, सर पहिला** (प्रकाशक, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर), रु. ४.

७. **संशोधनमुक्तावलि, सर दुसरा** (प्रकाशक, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर), रु. ४.

८. **संशोधनमुक्तावलि, सर तिसरा** (प्रकाशक, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर), रु. ४.

हिन्दी

९. **कालिदास** (द्वितीयावृत्ति) (प्रकाशक, हिंदी ग्रंथरत्नाकर, हीराबाग, मुंबई ४), रु. ४.

विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर

स्वीय ग्रंथ

१ **नागपूरकर भोसल्यांची बखर**

विदर्भांतील नामवंत इतिहासकार **कै. यादव माधव काळे** यांनी संपादिलेली द्वितीयावृत्ति. **किंमत अडीच रुपये.**

२ **नागपूरचा सांस्कृतिक इतिहास** लेखक—**श्री. दे. गो. लांडगे.**

भोसल्यांच्या राज्यस्थापनेपासून सुमारें दीडशें वर्षांचा नागपूरच्या सांस्कृतिक इतिहासाचा सर्वांगीण परामर्श. **किंमत दोन रुपये**

३ **संशोधनमुक्तावलि : सर पहिला** **म. म. वा. वि. मिराशी**

यांच्या सोळा संशोधनपर लेखांचा संग्रह. **किंमत चार रुपये**

४ **मध्यप्रदेशांतील संशोधनकार्य** (सन १९३४ ते १९५४)

जुन्या मध्यप्रदेशांतील संशोधकांनी वीस वर्षांत विविध विषयांत केलेल्या संशोधनाचा आढावा. **किंमत सव्वा रुपया.**

५ **संशोधनमुक्तावलि : सर दुसरा** **म. म. वा. वि. मिराशी**

यांच्या वीस संशोधनपर लेखांचा संग्रह. **किंमत चार रुपये.**

६ **औपनिषदिक जीवनसौख्य** **कै. डॉ. के. ल. दप्तरी**

यांनी वस्तुनिष्ठ आणि बुद्धिप्रत्ययक पद्धतीने लिहिलेला उपनिषदांचा उपसंहार. **किंमत चार रुपये**

७ **संशोधनलेखसंग्रह : भाग पहिला** **कै. हरि नारायण नेने**

यांनी लिहिलेल्या संशोधनपर लेखांचा संग्रह. **किंमत चार रुपये.**

८ **संशोधनमुक्तावलि : सर तिसरा** **म. म. वा. वि. मिराशी**

यांच्या सतरा संशोधनपर लेखांचा संग्रह. **किंमत चार रुपये.**

प्राप्तिस्थान—१ चिटणीस, **विदर्भ संशोधन मंडळ,**
विदर्भ साहित्य मंदिर, सीताबर्डी, नागपूर १.
२ **डेनेट आणि कंपनी,** सीताबर्डी, नागपूर १.